


# जनमाध्यम

e paper www.janmadhyam.com

एक प्रतिष्ठित सवय



✦ अमरावती, बुधवार २३ सप्टेंबर २०२६ ✦ मूल्य ४.०० ✦ पृष्ठ १०


## सण उत्सवासह मिरवणुकीत सार्वजनिक स्थळी फटाके वाजवण्यास बंदी

### उपकरणे जप्त करा : मुंबई हायकोर्ट

**मुंबई/प्रतिनिधी :**मुंबई उच्च न्यायालयानं धार्मिक सण-उत्सव आणि मिरवणुकांदरम्याना होणा-या ध्वनी प्रदूषणाची गंभीर दखल घेतली आहे. उच्च न्यायालयानं काल सुमोटो दाखल करुन घेत सरकारला आज बाजू मांडण्यास सांगितलं होतं. न्यायमूर्ती जीएस कुलकर्णी आणि न्यायमूर्ती



नीला गोखले यांच्या खंडपीठानं ध्वनीप्रदूषण प्रकरणावर दोनवेळा सुनावणी घेतली. मुंबई उच्च न्यायालयानं धार्मिक सण-उत्सव आणि मिरवणुकांदरम्यान सार्वजनिक स्थळी फटाके वाजवण्यास बंदी घातली आहे.मुंबई हायकोर्टात राज्य सरकारनं बाजू मांडताना परवानगी फक्त मिरवणुकीला देण्यात आली असून ध्वनिक्षेपकांना कोणतीही परवानगी नाही असं म्हटलं. ध्वनिक्षेपकांचा वापर करताना मर्यादेच्या अधीन राहणे बंधनकारक असल्याचं राज्य सरकारनं कोर्टात बाजू मांडताना म्हटलं. तसेच लेसर लाईटच्या वापरला तसेच मिरवणुकीत फटाके फोडायला कोणतीही परवानगी नाही, असं राज्य सरकारकडून उच्च न्यायालयामध्ये स्पष्ट केलं. राज्य सरकारच्या शांतता क्षेत्रांच्या यादीत रुग्णालय आणि शाळांसह धार्मिक स्थळ देखील शांतता क्षेत्रात मोडतात. मग गणपती मंडप देखील शांततात क्षेत्रात मोडू शकतात मात्र त्यासाठी ते सूचीबद्ध करावं लागेल अशी भूमिका राज्य सरकारनं कोर्टात मांडली. धार्मिक सण-उत्सव आणि मिरवणुकांदरम्यान सार्वजनिक स्थळी फटाके वाजवण्यास बंदी उच्च न्यायालयानं घातली आहे. तसेच ध्वनी प्रदूषणाची मर्यादा उल्लंघन करणा-यांवर कठोर कारवाईचे तसेच उपकरणांची जप्ती करण्याचे आदेश उच्च न्यायालयानं राज्य सरकारला दिले आहेत. ढोल ताशा पथकांमध्ये हातोड्याने बडवण्यात येणा-या सिलेंडरवर देखील बंदी घालण्यात आली आहे. मंडळांना त्यांना दिलेली परवानगी जाहीर प्रदर्शित करावी लागेल. परवानगी प्रदर्शित न केल्यास ध्वनिक्षेपक लावता येणार नाही उच्च न्यायालयाकडून स्पष्ट करण्यात आलं आहे. तसेच भविष्यात परवानगी देताना अनामत रक्कम घेण्याच्या सूचना उल्लंघन समोर आल्यास अनामत रक्कम जप्त करण्याच्या सूचना ➪(पान २ वर)

## केदारनाथ यात्रेला विक्रमी प्रतिसाद

**चीरबासा :** यंदाच्या केदारनाथ यात्रेला भाविकांचा मोठा प्रतिसाद मिळत असून आतापर्यंत १५ लाख १९ हजार ३२१ भाविकांनी बाबा केदारनाथांचे दर्शन घेतले आहे. २२ एप्रिलपासून सुरू झालेल्या या यात्रेत



दररोज मोठ्या संख्येने भाविक केदारनाथ धामकडे रवाना होत आहेत. केदारनाथ यात्रा सुरळीत आणि सुरक्षित पार पडावी यासाठी प्रशासनाकडून विविध उपाययोजना करण्यात येत आहेत. जिल्हाधिकारी विशाल मिश्रा यांनी सांगितले की, सर्व संबंधित विभाग परस्पर समन्वयाने काम करत आहेत. मान्सूनमुळे ज्या भागांमध्ये मार्गांचे नुकसान झाले आहे, तेथे दुरुस्ती आणि सुरक्षेशी संबंधित कामांना वेग देण्यात आला आहे. चीरबासा परिसरातील मार्ग दुरुस्तीचे कामही प्राधान्याने सुरू आहे. भाविकांना ये-जा करताना कोणतीही अडचण निर्माण होउ नये, यासाठी प्रशासन विशेष लक्ष देत आहे. दरम्यान, केदारनाथच्या पायी जाण्याच्या मार्गावर सीसीटीव्ही कॅमे-यांच्या माध्यमातून सतत देखरेख ठेवली जात आहे. यात्रामार्गाची सद्यस्थिती, भाविकांची ये-जा आणि सुरक्षा व्यवस्थेवर प्रशासन बारकाईने लक्ष ठेवून आहे.

## एनडीआरएफच्या निकषानुसार शेतक--यांना मदत देणार: कृषिमंत्री

**पुणे /प्रतिनिधी-**राज्यात दुष्काळसदृश स्थिती असून एनडीआरएफच्या निकषानुसार शेतक--यांना मदत दिली जाणार असल्याची माहिती सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी सांगितली. दरम्यान कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितले की, येत्या ३० सप्टेंबरपर्यंत परिस्थितीचा आढावा घेउन पुढील आठवडाभरात निर्णय घेण्यात येणार आहे.सहकार मंत्री पाटील यांनी सांगितले की, राज्यात सध्या विद्यार्थी शुल्क माफी, वीज बिल माफी, टँकरला परवानगी अशा विविध उपाययोजना सुरू आहेत. कर्जमाफीसाठी सुमारे ६ लाख शेतक-यांची यादी तयार करण्यात येत असून योजनेपासून कोणीही वंचित राहणार नाही याची काळजी घेतली जाईल.कृषिमंत्री भरणे यांनी सांगितले की, राज्यात पावसाचा मोठा खंड पडला असून सोयाबीन, कापूस आणि अन्य खरीप पिके अडचणीत आली आहेत. नुकसानग्रस्तांना योग्य ती मदत दिली जाणार आहे. मराठवाडा, पश्चिम विदर्भ भागात सोयाबीन आणि कापूस पिकाचे नुकसान तसेच उसाच्या पिकाला काही प्रमाणात फटका बसला आहे .राज्यातील शेतक--यांच्या अडचणीकडे राज्य शासनाने लक्ष द्यावे आणि त्यांना तातडीची मदत देण्यात यावी अशी मागणी काँग्रेस पक्षाचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनी पत्रकारांशी बोलताना केली आहे. राजकीय टीका अथवा तशी भूमिका न घेता सरसकट कर्जमाफी आणि हेक्टरी १ लाख रुपये मदत करण्यात यावी. कारण राज्यातील संभाव्य दुष्काळी स्थितीमुळे शेतकरी अडचणीत आला आहे.

## कुंभमेळ्यावर खर्च होणारा पैसा दुष्काळग्रस्तांसाठी वापरा

**मुंबई / प्रतिनिधी-** राज्यातील अनेक तालुक्यांमध्ये पावसाचा मोठा खंड पडला असून, काही भागांत ४० दिवसांपासून पावसाने ओढ दिल्याचे प्रशासनाच्या आढाव्यात समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर आता राज्यात तत्काळ दुष्काळ जाहीर करावा, अशी मागणी विरोधकांकडून



करण्यात आली आहे. तर, दुष्काळग्रस्त शेतक-यांनी सुद्धा हीच मागणी लावून धरली आहे. अशातच आता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे खासदार संजय राउत यांनी राज्य सरकारला महत्त्वाचा सल्ला दिला. कुंभमेळ्यावर खर्च होणारा पैसा दुष्काळग्रस्त शेतक-यांसाठी वापरा. यामुले देव काही रागवणार नाही, असा सल्ला राउतांनी सरकारला दिला आहे. शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राउत यांनी मंगळवारी (२२ सप्टेंबर) प्रसार माध्यमांशी संवाद साधला. यावेळी त्यांनी राज्यातील दुष्काळावर भाष्य करत राज्य सरकारला सल्ला देत म्हटले की, कर्नाटक सरकारने दिल्लीच्या पथकाची वाट न पाहता, केंद्राची परवानगी न घेता दुष्काळ जाहीर केला आणि शेतक-यांना दिलासा देणा-या योजना जाहीर केल्या. कर्नाटकाचे मुख्यमंत्री स्वतः दुष्काळाचे मानिटरिंग करत आहेत. महाराष्ट्रात अजून तीन पक्षाचा समन्वय नाही. कॅबिनेटमध्ये चर्चा होत नाही. शेतक-यांचा आक्रोश मंत्रालयाच्या भिंती फाडून आत जात नाही. शेतकरी रस्त्यावर उतरेल आणि मंत्रालयावर धडकेल अशी स्थिती आहे. शेतक-यांना दिलासा देण्याबाबत मुख्यमंत्र्यांकडून ब्र काढला जात नाही, असे संजय राउत म्हणाले.

# विधान परिषदेच्या 5 जागांसाठी 23 ऑक्टोबरला मतदान

## पदवीधर व शिक्षक मतदारसंघातील निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर




**मुंबई/प्रतिनिधी :** भारत निवडणूक आयोगाने महाराष्ट्र विधान परिषदेतील पदवीधर व शिक्षक मतदारसंघातील पाच जागांसाठी द्विवार्षिक निवडणुकीचा कार्यक्रम जाहीर केला आहे. त्यानुसार औरंगाबाद विभाग पदवीधर, पुणे विभाग पदवीधर, नागपूर विभाग पदवीधर, अमरावती विभाग शिक्षक आणि पुणे विभाग शिक्षक या पाच मतदारसंघांसाठी २३ ऑक्टोबर २०२६ रोजी मतदान होणार आहे. विद्यमान सदस्यांचा कार्यकाळ ६ डिसेंबर २०२६ रोजी संपुष्टात येणार आहे.या निवडणुकीसाठी २९ सप्टेंबर २०२६ रोजी अधिसूचना प्रसिद्ध होईल. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख ६ ऑक्टोबर, अर्जांची छाननी ७ ऑक्टोबर, तर उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख ९ ऑक्टोबर २०२६ आहे. मतदान २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते सायंकाळी ४ या वेळेत होईल. मतमोजणी २७ ऑक्टोबर २०२६ रोजी करण्यात येणार असून, निवडणूक प्रक्रिया ३१ ऑक्टोबर २०२६ पूर्वी पूर्ण केली जाणार आहे.

महाराष्ट्रातील या पाच जागांमध्ये औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघातून सतीश चव्हाण, पुणे विभाग पदवीधर मतदारसंघातून अरुण लाड, नागपूर विभाग पदवीधर मतदारसंघातून अभिजीत वंजारी, अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघातून किरण सरनाईक आणि पुणे विभाग शिक्षक मतदारसंघातून जयंत आसगावकर या विद्यमान सदस्यांचा समावेश आहे. भारत निवडणूक आयोगाने या निवडणुकांची घोषणा केल्यापासून संबंधित मतदारसंघांमध्ये आदर्श आचारसंहिता तत्काळ लागू झाली आहे. पदवीधर व शिक्षक मतदारसंघांसह विधान परिषद निवडणुकांसाठी आदर्श आचारसंहितेच्या तरतुदी लागू करण्याबाबत आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांमध्येही स्पष्टता देण्यात आली असल्याचे मुख्य निवडणूक अधिकारी कार्यालयाने कळविले आहे.

**● निवडणुकीचे वेळापत्रक ●**

- अधिसूचना : 29 सप्टेंबर
- नामनिर्देशनाची अंतिम तारीख : 6 ऑक्टोबर
- अर्जांची छाननी : 7 ऑक्टोबर
- अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख : 9 ऑक्टोबर
- मतदान : 23 ऑक्टोबर, सकाळी 8 ते दुपारी 4
- मतमोजणी : 27 ऑक्टोबर
- निवडणूक प्रक्रिया पूर्ण : 31 ऑक्टोबर.

## तीच आमची मोठी चूक ठरली

### IIT मुंबईत आत्महत्या केलेल्या साहिल वाकोडेच्या आई-वडिलांचा आक्रोश!

**यवतमाळ/प्रतिनिधी :**आयआयटी मुंबई मधील २२ वर्षीय विद्यार्थी साहिल वाकोडे याच्या आत्महत्येनंतर राज्यभरातून तीव्र संताप व्यक्त होत आहे. साहिलने वसतिगृहातील आपल्या खोलीत जीवन संपवल्यानंतर त्याच्या पालकांनी संस्थेतील प्राध्यापकांवर गंभीर जातीभेदाचे आणि मानसिक छळाचे आरोप केले आहेत. या प्रकरणी एफआयआर मध्ये नाव असलेले प्राध्यापक सूर्यनारायण दुल्ला यांना तात्काळ अटक करावी, अशी मागणी साहिलच्या कुटुंबीयांनी पत्रकारांशी बोलताना केली आहे.आयआयटीमध्ये प्रवेश मिळणे कठीण असते, म्हणून



सहन कर असे सांगितले.आम्हीच आमच्या मुलाला सहन करायला सांगत राहिलो, हीच आमची मोठी चूक झाली, असा हृदयद्रावक आक्रोश साहिलच्या आई-वडिलांनी केला आहे. साहिलचे वडील रवींद्र वाकोडे यांनी अत्यंत भावुक होत आपल्या भावना व्यक्त केल्या. साहिलने यापूर्वीही प्राध्यापकांकडून होणा-या जातीभेदाची आणि मानसिक छळाची माहिती आम्हाला दिली होती. पण, आयआयटीमध्ये प्रवेश मिळणे हे अत्यंत कठीण असते, त्यामुळे थोडं सहन कर, असे आम्हीच त्याला सांगत राहिलो, असे सांगताना त्याच्या वडिलांना अश्रू अनावर झाले.➪(पान २ वर)

## मी जगभरातील आठ युद्धे थांबवली,

### डोनाल्ड ट्रंप यांचा मोठा दावा

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :**संयुक्तराष्ट्रांच्या आमसभेचं ८१ वे अधिवेशन आज पार पडले. या अधिवेशनात अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. जगभरातील आठ युद्धे मी थांबवल्याचा दावा त्यांनी केला केला. आपला देश आज पूर्वीपेक्षा अधिक मजबूत आहे. व्हेनेझुएला, इराण, गाझा आणि भारत-पाकिस्तान युद्धांचा संदर्भ देत ते म्हणाले की, आम्ही जकातींच्या माध्यमातून आठ युद्धे थांबवली आहेत. तसेच ट्रम्प यांनी इराणला दहशतवादाला प्रोत्साहन देणारा देश संबोधून त्याच्यावर निशाणा साधला. त्याचबरोबर होर्मुझच्या सामुद्रधुनीवर जकाती लावण्याचाही उल्लेख केला. ट्रम्प यांच्या भाषणावेळी इराणचे प्रतिनिधी उपस्थित होते. ट्रम्प यांनी सर्व देशांना इराणला आर्थिक मदत देणे थांबवण्याचे आणि त्याला एकाकी पाडण्याचे आवाहन केले आहे. अमेरिकेने गेल्या १२ महिन्यांत आपल्या लष्करावर पूर्वीपेक्षा जास्त पैसा खर्च केला आहे. यावेळी हा खर्च १.५ ट्रिलियन डालर्स असेल. नवीन उर्जा आणि प्रचंड शक्ती असलेल्या अमेरिकेच्या संपत्ती, सामर्थ्य, उत्साह आणि गतीमुळे संपूर्ण जग पुढे जात आहे. आपल्या भाषणात इराणचा उल्लेख करत राष्ट्राध्यक्ष म्हणाले, इराणला सामर्थ्यवान बनण्याची आणि जगासाठी धोका निर्माण



करण्याची परवानगी दिली गेली असली तरी, वाशिंग्टनने त्याला दहशत पसरवण्यापासून रोखण्यासाठी पावले उचलली आहेत. अमेरिकेने बॅलिस्टिक क्षेपणास्त्र संरक्षणाच्या आधाराने इराणला अणुबाम्ब बनवण्याचा प्रयत्न करण्यापासून रोखले आहे. जर ते यशस्वी झाले असते, तर ती दुष्ट राजवट कायमस्वरूपी दहशत आणि मृत्यू पसरवण्यासाठी मोकळी राहिली असती.'गरज पडल्यास, अमेरिका आपल्या महत्त्वपूर्ण राष्ट्रीय हितांचे रक्षण करण्यासाठी लष्करी बळाचा वापर करेल.

## आता फक्तकॉलिंग आणि एसएमएससाठी रिचार्ज प्लॅन

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** मोबाइल युजर्ससाठी भारतीय दूरसंचार नियामक प्राधिकरणाने (टीआरएआय) महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. ट्रायने दूरसंचार ग्राहक संरक्षण (तेरावे संशोधन) विनियम, २०२६ जारी केला असून त्यानुसार सर्व दूरसंचार कंपन्यांना आता फक्त व्हाइस कॉलिंग आणि एसएमएसची सुविधा असलेले, डेटा नसलेले रिचार्ज प्लॅन उपलब्ध करून देणे बंधनकारक असणार आहे.ट्रायच्या म्हणण्यानुसार, सध्या अशा प्रकारचे प्लॅन फार कमी उपलब्ध आहेत. विशेषतः कमी वैधता असलेल्या प्लॅनमध्ये केवळ कालिंग आणि स्टरची सुविधा असलेले पर्याय कमी असल्याचे आढळून आले. त्यामुळे ग्राहकांच्या गरजा लक्षात घेउन हा निर्णय घेण्यात आला आहे. नव्या नियमांनुसार, ज्या ग्राहकांना ३० दिवस किंवा त्यापेक्षा कमी वैधतेचा रिचार्ज हवा आहे, त्यांच्यासाठी प्रत्येक दूरसंचार कंपनीला व्हाइस आणि स्टर सुविधा असलेला प्लॅन उपलब्ध करून द्यावा




लागणार आहे. या प्लॅनमध्ये डेटा देणे बंधनकारक असणार नाही. याशिवाय ग्राहकांना दर महिन्याला ठरावीक तारखेला रिचार्जचे नूतनीकरण करता येईल, असा एक पर्यायही कंपन्यांना द्यावा लागणार आहे. त्यामुळे ग्राहकांना दरवेळी वेगवेगळ्या तारखांना रिचार्ज करण्याची गरज भासणार नाही.

**३० दिवसांपेक्षा जास्त वैधतेचा प्लॅनही अनिवार्य-** केवळ कमी वैधतेचेच नाही, तर ३० दिवसांपेक्षा जास्त वैधता असलेला किमान एक व्हाइस-स्टर ओन्ली प्लॅन प्रत्येक दूरसंचार कंपनीला उपलब्ध करून द्यावा लागणार आहे. त्यामुळे दीर्घ वैधतेचा रिचार्ज हवा असलेल्या ग्राहकांनाही डेटा नसलेला पर्याय मिळणार आहे. ट्रायने कंपन्यांना या प्लॅनच्या किमती योग्य प्रमाणात कमी ठेवण्यास सांगितले आहे. त्यामुळे डेटा असलेल्या प्लॅनच्या तुलनेत केवळ कालिंग आणि एसएमएससाठीचे प्लॅन ग्राहकांना स्वस्तात उपलब्ध होणे अपेक्षित आहे. ट्रायच्या या निर्णयाचा फायदा विशेषतः➪(पान २ वर)

## दिल्लीच्या कालकाजी मंदिराजवळ अल्पवयीन मुलीवर गँगरेप

**नवी दिल्ली**-दिल्लीतील कालकाजी मंदिरालगतच्या 'आस्था कुंज पार्क'मध्ये एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलीवर सामूहिक बलात्कार झाल्याची घटना समोर आली आहे. ही घटना सोमवारी सायंकाळी घडली. मंगळवारी सकाळी झालेल्या चकमकीनंतर पोलिसांनी आसिफ या एका आरोपीला अटक केली.पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अटकेच्या प्रयत्नादरम्यान आरोपीने तीन गोळ्या झाडल्या. त्यातील एक गोळी एका हेड कान्स्टेबलच्या बुलेटप्रूफ जॅकेटला लागली. प्रत्युत्तरादाखल पोलिसांनी आरोपीच्या पायावर गोळी झाडली. जखमी आरोपीला एम्स ट्रामा सेंटरमध्ये दाखल ➪(पान २ वर)

## एसीच्या स्फोटामुळे रुग्णालयात आग

**आदिलाबाद :** तेलंगणातील आदिलाबाद येथील राजीव गांधी इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्सेस (आरआयएमएस) रुग्णालयाच्या स्पेशल न्यूबार्न केअर युनिटला(एसएनसीयू) सोमवारी रात्री उशिरा भीषण आग लागली. या दुर्घटनेत तीन नवजात बालकांचा मृत्यू झाला. आगीच्या वेळी वार्डमध्ये असलेल्या २८ बालकांना सुरक्षितपणे बाहेर काढण्यात आले.सोमवारी रात्री सुमारे ११.५० वाजण्याच्या सुमारास रठउमध्ये अचानक आग लागली. प्राथमिक



माहितीनुसार, एसीमध्ये झालेल्या विद्युत शार्टसर्किटमुळे आग लागली असावी, असा अंदाज आहे. आगीमुळे काही वेळातच संपूर्ण वार्डमध्ये मोठ्या प्रमाणात धूर आणि ज्वाळा पसरल्या. मात्र, आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. आग लागल्याचे लक्षात येताच रुग्णालयातील कर्मचारी आणि पालकांनी तातडीने बचावकार्य सुरू केले. बालकांना बाहेर काढण्यासाठी वार्डच्या काचा फोडण्यात आल्या. खबर मिळताच अग्निशमन दलाची गाडी रुग्णालयात दाखल झाली आणि जवानांनी आग आटोक्यात आणली. आगीचा रुग्णालयाच्या इतर भागात फैलाव होउ नये, यासाठीही उपाययोजना करण्यात आल्या. या दुर्घटनेत तीन नवजात बालकांचा मृत्यू झाला. त्यापैकी एका बालकाचे वय अवघे पाच दिवस होते. आगीतून वाचवण्यात आलेल्या इतर बालकांना तातडीने उपचारासाठी विविध रुग्णालयांमध्ये हलवण्यात आले. काही बालकांना धुरामुळे श्वसनाचा त्रास झाल्याची माहिती समोर आली आहे. दरम्यान, पोलिसांनी या प्रकरणी गुन्हा दाखल करून तपास सुरू केला आहे. आगीमागील नेमके कारण काय होते, तसेच दुर्घटनेच्या वेळी रुग्णालयातील विद्युत यंत्रणा, एसी यंत्रणा आणि अग्निसुरक्षा व्यवस्था योग्य प्रकारे कार्यरत होती का, याची तपासणी केली जात आहे. कोणत्याही प्रकारची हलगर्जी किंवा निष्काळजीपणा या दुर्घटनेला कारणीभूत ठरला का, याचाही तपास केला जाणार आहे.

## भारतीय महिला क्रिकेट संघाने रचला इतिहास!




**नवी दिल्ली / वृत्तसंस्था-** आशियाई क्रीडा स्पर्धेच्या अंतिम सामन्यात श्रीलंका संघाचा धुव्वा उडवत भारतीय महिला क्रिकेट संघाने सुवर्णपदकावर मोहोर उमटवली आहे. टीम इंडियाने दिलेल्या २१७ धावांच्या लक्ष्याचा पाठलाग करताना श्रीलंकेचा संघ १५.४ षटकांत ६९ धावांत सर्वबाद झाला. भारतीय महिला संघाने १४७ धावांच्या फरकाने विजय मिळवला. हरमनप्रीत कौरच्या नेतृत्वाखालील नेतृत्वाखालील संघाने केलेल्या दमदार कामगिरीमुळे भारताने या स्पर्धेत सुवर्ण पदकाचे खाते उघडले आहे.

आशियाई क्रीडा स्पर्धेच्या अंतिम सामन्यात भारतीय महिला संघाने श्रीलंकेसमोर विजयासाठी २१७ धावांचे लक्ष्य ठेवले होते. नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेतल्यानंतर, भारतीय संघाने २० षटकांत ३ गडी गमावून २१६ धावा केल्या. सलामीवीर स्मृती मानधनाने अर्धशतक झळकावले, तर रिचा घोष आणि शफाली वर्मा यांनी प्रभावी फलंदाजी केली. मानधना आणि शफाली यांनी पहिल्या विकेटसाठी ९९ धावांची भागीदारी करत भारताला भक्कम सुरुवात करून दिली. मानधनाने ३० चेंडूंत आपले अर्धशतक पूर्ण केले. मात्र, शफालीचे अर्धशतक हुकले आणि ती ४८ धावांवर बाद झाली. त्यानंतर कर्णधार हरमनप्रीत कौर १९ धावांवर बाद झाल्याने भारताला दुसरा धक्का बसला. मानधनाने आपली खेळी सुरू ठेवली, पण अखेरीस ती ४५ चेंडूंत ७९ धावा करून बाद झाली; तिने या खेळीत पाच चौकार आणि सात षटकार लगावले. त्यानंतर रिचा घोषने आक्रमक फलंदाजी करत भारताची धावसंख्या २०० च्या पार नेली. रिचा आणि भारती फुलमाली यांनी चौथ्या विकेटसाठी ५३ धावांची भागीदारी केली. रिचा २२ चेंडूंत ४९ धावांवर (सहा चौकार आणि तीन षटकारांसह) नाबाद राहिली, तर भारती ७ धावांवर नाबाद राहिली. श्रीलंकेकडून सुगंधिका कुमारी, कविशा दिलहारी आणि चामुडी प्रबोधा यांनी प्रत्येकी एक बळी घेतला.

**श्रीलंकेची अडखळत सुरुवात**

भारताने दिलेल्या विशाल आव्हानाचा पाठलाग करताना श्रीलंकेची सुरुवात अडखळत झाली. १८ धावांवर शफाली वर्माने इमिशा दुलानीला बाद करून पॅव्हेलियनमध्ये धाडले. यानंतर शफाली वर्माने हसिनी परेरा बाद केले आहे; हसिनीला खातेही उघडता आले नाही . दोन झटपट गडी गमावल्यानंतर श्रीलंकेची कर्णधार चमारी अथापथ्थूने डाव सावरण्-याचा प्रयत्-न केला. मात्र दीप्ती शर्माने तिला २९ धावांवर बाद करत श्रीलंका संघाला मोठा धक्-का दिला. तिने २१ चेंडूचा सामना करत पाच चौकारांसह २९ धावा केल्या. श्रेयंका पाटीलने हर्षिता समरविक्रमाला बाद करून श्रीलंकेला चौथा धक्का दिला. ४४ धावांच्या धावसंख्येवर श्रीलंकेने चार विकेट्स गमावल्या.










# ‘प्रेमाचे काव्य’ने रंगली आझाद हिंद गणेशोत्सव मंडळाची मैफल





**अमरावती/प्रतिनिधीः-** ९९ वर्षांची गौरवशाली परंपरा असलेल्या आझाद हिंद गणेशोत्सव मंडळाच्या गणेशोत्सवात रविवारी नामवंत पत्रकार व निवेदक बाळासाहेब कुलकर्णी यांच्या ‘प्रेमाचे काव्य’ या हिंदी-मराठी कविता व शायरींच्या बहारदार मैफलीने रसिकांना भावनांचा सुंदर अनुभव दिला. जवळपास दीड तास चाललेल्या या कार्यक्रमात प्रेम, विरह, आठवणी, नाती, विश्वासघात, जीवनविषयक चिंतन आणि विनोद अशा विविध भावछटांतून कुलकर्णी यांनी रसिकांना खिळवून ठेवले.

कार्यक्रमाच्या प्रारंभी माजी खासदार नवनीत राणा यांच्या हस्ते श्री गणेश व खाटू श्याम महाराजांची आरती व पूजन झाले. त्यानंतर माजी खासदार अनंतराव गुढे यांनी आझाद हिंद गणेशोत्सव मंडळाच्या गौरवशाली ९९ वर्षांच्या परंपरेचा आणि मंडळाच्या सांस्कृतिक वाटचालीचा आढावा घेतला.

बाळासाहेब कुलकर्णी यांनी प्रेमाच्या हळुवार भावनेने मैफलीला सुरुवात केली. पहिल्याच शायरीने सभागृहात प्रेमाचा रंग भरला.

‘इश्क दो दिलों का नशा है,
जिसका पहले उतर गया, वो बेवफा है’

प्रेमाच्या नशेपासून सुरू झालेली ही मैफल पुढे प्रेमातील भेटी-विरहाच्या भावनेपर्यंत पोहोचली. प्रेमात जवळीक जितकी महत्त्वाची, तितकीच कधी कधी विरहाची हुरहूरही महत्त्वाची ठरते, हे सांगताना त्यांनी म्हटले-

‘मिल जाए सबकुछ तो फरियाद किसकी करोगे,
मुलाकात अगर रोज होगी तो याद कैसे करोगे’

सततची भेट आठवणींची तीव्रता कमी करते, तर अंतर एखाद्या नात्याला अधिक गहिरे बनवते, या आशयाने त्यांनी या शायरीचा धागा पुढे नेला. त्यांच्या निवेदनाला रसिकांकडून उत्स्फूर्त दाद मिळत होती.

प्रेमाच्या हळुवार छटांनंतर मैफलीचा सूर नात्यांच्या वास्तवाकडे वळला. प्रत्येक नात्यात आपले स्थान सारखेच असेल असे नाही. कधी आपण एखाद्यासाठी महत्त्वाचे असतो, तर कधी केवळ गरजेपुरते.

याच भावनेला शब्द देत त्यांनी म्हटले-

‘हम तो सिर्फ जरूरत थे,
जरूरी तो कोई और था’

अवघ्या दोन ओळींतून नात्यांमधील अपेक्षा आणि वास्तवातील अंतर त्यांनी उलगडले. यानंतरच्या निवेदनातून त्यांनी बदलत्या भावनांवर आणि माणसांच्या नात्यांतील गुंतागुंतीवर भाष्य केले. मैफलीचा सूर पुढे चिंतनशील झाला. बाहेरचा प्रकाश पुरेसा नसतो; माणसाच्या विचारांत बदल झाला तरच खऱ्या अर्थाने नवा दिवस उगवतो, हा आशय व्यक्त करत त्यांनी शायरी सादर केली.

‘खयालातोंको बदलने से भी निकलता है नया दिन,
सिर्फ सूरज के चमकने से सवेरा नहीं होता’

विचारांमध्ये परिवर्तन घडले तरच आयुष्यात नवी सुरुवात होऊ शकते, असे सांगत कुलकर्णी यांनी या शायरीला जीवनानुभवांची जोड दिली.

विश्वास आणि त्यातून मिळणाऱ्या जखमांवर भाष्य करताना त्यांनी आणखी एक प्रभावी शायरी सादर केली.

‘अपनी पीठ से निकले खंजरों को, जब गिना मैंने,
उतने ही निकले, जितनों को गले लगाया था मैंने’

जवळच्या माणसाकडून झालेली फसवणूक अधिक वेदनादायी असते. विश्वास ठेवलेल्या व्यक्तीकडूनच झालेला वार मनाला अधिक खोलवर जखमी करतो, या भावनेला त्यांच्या सादरीकरणाने परिणामकारकता मिळाली.

गंभीर भावनांच्या या प्रवासात प्रेमाचा मिश्कील रंगही उमटला. प्रेमातील नजर आणि तिच्या परिणामाचे वर्णन करताना त्यांनी म्हटले-

‘तिरछी नजर का तीर है, बड़ी मुश्किल से निकलेगा,
दिल को साथ लेकर निकलेगा, अगर दिल से निकलेगा’

या शायरीला रसिकांनी टाळ्यांची उत्स्फूर्त दाद दिली. त्यानंतर प्रेमाचीच एक वेगळी, विनोदी व्याख्या करत कुलकर्णी म्हणाले-

‘मैं मोहब्बत के अलावा कुछ नहीं करता,
और लोग हमेशा पूछते हैं - और तुम क्या करते हो?’

गंभीर प्रेमकवितांमधून अचानक विनोदाकडे घेतलेल्या या वळणाने सभागृहात हास्याची लकेर उमटली. माणसाची खरी पारख त्याच्या बाह्य झगमगाटात नव्हे, तर प्रतिकूल परिस्थितीत होते, हा आशय व्यक्त करणारी शायरीही त्यांनी सादर केली.

‘तू अगर हीरे का पारखी है, तो अंधेरे में मिल,
धूप में तो काँच के टुकड़े भी चमक जाते हैं’

बाह्य चमक आणि खरी किंमत यातील फरक सांगणाऱ्या या शायरीचा आशय त्यांनी आपल्या खास निवेदनातून उलगडला.

मैफलीच्या अखेरीस उपरोधाचा तडका देत त्यांनी म्हटले-

‘दुःख इस बात का नहीं कि कुछ लोग कुत्ते निकले,
दुःख इस बात का है कि कुत्ते होकर भी वफादार नहीं निकले’

या शायरीने सभागृहात हास्याचे फवारे उडाले. माणसांच्या स्वभावातील विसंगतीवर मिश्कील भाष्य करणाऱ्या या शायरीला रसिकांनी भरभरून दाद दिली.

प्रेमापासून सुरू झालेली ही मैफल विरह, आठवणी, नाती, विश्वासघात, विचार आणि विनोद अशा विविध भावछटांतून पुढे सरकत गेली. बाळासाहेब कुलकर्णी यांच्या प्रभावी आवाजातील चढ-उतार, नेमकी शब्दफेक, प्रसंगानुरूप निवेदन आणि शायरीच्या आशयाचे केलेले विवेचन यामुळे ‘प्रेमाचे काव्य’ ही केवळ कविता-शायरींची मैफल न राहता माणसांच्या भावविश्वाचा रम्य प्रवास ठरली.

कार्यक्रमाला माजी मंत्री यशोमती ठाकूर, मनपातील विरोधी पक्षनेते विलास इंगोले, नगरसेवक बबलू शेखावत, ज्येष्ठ पत्रकार प्रदीप देशपांडे यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर आणि रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पाहुण्यांचा परिचय अविनाश दुधे यांनी करून दिला. प्रास्ताविक व संचालन प्रा. गोविंद तिरमनवार यांनी केले.

## नातवाने घेतला आजीचा जीव,लाकडी पाटीने हल्ला

### -दर्यापूरच्या पारधीपूरा परिसरातील धक्कादायक घटना



**खल्लार/प्रतिनिधीः-** दर्यापूर शहरातील पारधीपुरा परिसरात मंगळवारी (वय २२) सकाळी आठ वाजताच्या सुमारास घडलेल्या एका धक्कादायक घटनेने परिसरात खळबळ उडाली. आहे. ७८ वर्षीय आजीवार नातवाने लाकडी पाटीने हल्ला करुन जीव घेतला.

शिताबाई दौलतराव चौहान (वय ७८) यांच्यावर त्यांच्या नातवाने लाकडी पाटीने हल्ला केला. या प्रकरणी आरोपी नातू विलास विट्ठलराव चौहान (वय ३२ रा. दर्यापूर) याला पोलिसांनी अटक केली आहे. घटनेची माहिती मिळताच दर्यापूर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली. मृतदेहाची आवश्यक कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केली. घटनेमागील नेमके कारण काय, याचा तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे.

दरम्यान वृद्ध आजीवर नातवानेच हल्ला केल्याच्या घटनेने पारधीपुरा परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. या घटनेमागे कौटुंबिक वाद, मानसिक कारण किंवा अन्य काही कारण होते का, याबाबत पोलिस तपासातूनच स्पष्टता होणार आहे. दर्यापूर पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेतले असून पुढील तपास सुरू आहे.

## नारायणनगरातील घरावर पोलिसांचा छापा; दोन महिलांची सुटका

### तीन पुरुष ताब्यात; २ लाखांचा मुद्देमाल जप्त

**अमरावती/प्रतिनिधीः-** नारायणनगर परिसरातील एका घरात महिलांना बोलावून देहव्यापार सुरू असल्याची माहिती मिळाल्यानंतर अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने कारवाई केली. गाडगेनगर पोलिस ठाण्याच्या हद्दीत करण्यात आलेल्या या कारवाईत दोन महिलांची सुटका करण्यात आली असून, तीन पुरुषांना ताब्यात घेण्यात आले. पोलिसांनी २ लाख १ हजार ३० रुपयांचा मुद्देमाल जप्त केल्याची माहिती दिली. पोलीस आयुक्त राकेश ओला, उपायुक्त यशवंत सोळंके, शाम घुगे आणि मुख्यालयाच्या उपायुक्त प्रांजली सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाच्या निरीक्षक ज्योती विल्लेकर यांच्या नेतृत्वाखाली पथकाने मिळालेल्या गोपनीय माहितीची पडताळणी केल्यानंतर संबंधित ठिकाणी छापा टाकला. पोलिसांच्या माहितीनुसार, घरात तीन पुरुषांकडून आर्थिक फायद्यासाठी महिलांना आणून त्यांच्याकडून देहव्यापार करून घेतला जात असल्याचा संशय होता.

## १ व १० वरिल उर्वरित

### सण उत्सवासह मिरवणुकीत

ऊच्च न्यायालयानं दिल्या आहेत.

ध्वनी प्रदूषण तसेच पर्यावरणासंदर्भात नियमावली स्पष्ट आहे. तरी ध्वनी प्रदूषणाच्या तक्रारी येतात, मग हे थांबवणार कसं? असा सवाल मुंबई ऊच्च न्यायालयानं राज्य सरकारला विचारला आहे. मुंबईत ९१ पोलीस ठाणी असून प्रत्येक पोलीस ठाण्याची भरारी पथक कारवाई करतात अशी माहिती राज्य सरकारनं न्यायालयात दिली.तसेच कायद्यानुसार ऊपकरण जप्त करण्याची देखील तरतूद आल्याची माहिती राज्य सरकारनं कोर्टात दिली. सुनावणीदरम्यान ऊच्च न्यायालयाकडून पंढरपूरच्या वारीचा ऊल्लेख करण्यात आला. वारी हजारो लोक करतात त्यात टाळ वाजवला जातो आणि तिथे ध्वनी प्रदूषण होत नाही, असं कोर्टानं म्हटलं.

### तीच आमची मोठी चूक

ते पुढे म्हणाले, एफआयआरमध्ये सर्व गोष्टी स्पष्टपणे लिहिल्या आहेत. संशयित आरोपीला तात्काळ ताब्यात घेउन त्याची चौकशी झाली पाहिजे. एफआयआरमधील प्रत्येक शब्द सत्य आहे. साहिल अत्यंत हुशार विद्यार्थी होता. जेईई ॲडव्हान्स्ड परीक्षा ऊत्तीर्ण होउन ऑल इंडिया रँक मिळवणे ही सामान्य गोष्ट नाही. आता प्रकरण भरकटवण्यासाठी त्याच्यावर विविध प्रकारचे खोटे आरोप केले जातील, पण आमची एकच मागणी आहे दोषींना तात्काळ अटक झाली पाहिजे.

**माझा मुलगा अत्यंत गुणवंत होता, त्याला न्याय द्या! आईची आर्त हाक**

साहिलची आई सोनाली वाकोडे, ज्या स्वतः एक शिक्षिका आहेत, त्यांनी दोन्ही हात जोडून समाजाला आणि प्रशासनाला न्यायाचे आवाहन केले. मी एक आई आणि शिक्षिका आहे. मी माझा काळजाचा तुकडा गमावला आहे. आईचे हे दुःख केवळ एक आईच समजू शकते. साहिलला तुमचाच मुलगा माना आणि त्याला न्याय मिळवून द्या, असे सांगत त्यांनी टाहो फोडला. आयआयटीमधील वातावरणावर प्रश्न ऊपस्थित करत त्या म्हणाल्या, आयआयटीसारख्या नामांकित संस्थेत इतके विद्यार्थी आत्महत्या का करत आहेत, याच्या मुळाशी जाउन चौकशी करा. तुम्हीही या समाजाचे नागरिक आहात, तुमची मुलेही चांगल्या शिक्षण संस्थांमध्ये जातात. तिथे जर अशी परिस्थिती असेल, तर पालकांनी काय करायचे? आम्ही आमच्या मुलाला मानसिक आधार दिला, आपले भविष्य खूप ऊज्ज्वल असेल बाळा असे सांगत राहिलो. कदाचित हीच आमची चूक ठरली. त्या दिवशी जर आम्ही त्याला सोबत घरी घेउन गेलो असतो, तर आज माझा मुलगा जिवंत असता.

### आता फक्त कॉलिंग आणि

मोबाइल डेटा वापरत नसलेल्या किंवा अत्यल्प डेटा वापरणा-या ग्राहकांना होणार आहे. ज्येष्ठ नागरिक आणि कमी ऊत्पन्न असलेल्या ग्राहकांसाठीही हा निर्णय महत्त्वाचा मानला जात आहे. आतापर्यंत डेटा वापरत नसतानाही अनेक ग्राहकांना डेटा असलेले रिचार्ज प्लॅन घ्यावे लागत होते. मात्र, नव्या नियमांमुळे ग्राहकांना आपल्या गरजेनुसार केवळ कालिंग आणि एसएमएसची सुविधा असलेला प्लॅन निवडता येणार आहे. त्यामुळे अनावश्यक डेटासाठी पैसे खर्च करण्याची गरज राहणार नाही.

**११३२ प्रतिक्रिया मिळाल्यानंतर निर्णय-** ट्रायने सांगितले की, या नव्या नियमांच्या मसुद्यावर नागरिक आणि संबंधितांकडून एकूण १,१३२ प्रतिक्रिया प्राप्त झाल्या होत्या. या प्रतिक्रियांचा विचार केल्यानंतर ट्रायने अंतिम नियम जारी केले आहेत. नव्या नियमांमुळे मोबाइल ग्राहकांना त्यांच्या वापरानुसार रिचार्ज प्लॅन निवडण्याचे अधिक पर्याय ऊपलब्ध होणार असून, विशेषतः डेटाची गरज नसलेल्या ग्राहकांसाठी स्वतंत्र आणि दीर्घ वैधतेचे पर्याय ऊपलब्ध होणार आहेत.

### दिल्लीच्या कालकाजी मंदिराजवळ

करण्यात आले आहे. ऊर्वरित दोन आरोपींचा शोध सुरू आहे. दिल्लीत या महिन्यात अल्पवयीन मुलीवर बलात्कार झाल्याची ही तिसरी घटना आहे. १२ सप्टेंबर रोजी स्वरूप नगर येथे एका १४ वर्षीय अल्पवयीन मुलीवर सामूहिक बलात्कार करून तिची हत्या करण्यात आली होती. तसेच, १६ सप्टेंबर रोजी सदर बाजार भागात एका १० वर्षीय मुलीवर बलात्कार झाला होता. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित अल्पवयीन मुलगी सोमवारी सायंकाळी ७ वाजता तिच्या १७ वर्षीय मित्रासोबत कालकाजी मंदिरात गेली होती. त्यानंतर, सायंकाळी साडेसातच्या सुमारास ते दोघे गेट क्रमांक ७ मधून ’आस्था कुंज पार्क’मध्ये गेले. तिथे तीन तरुणांनी त्यांच्याकडे जाउन स्वतःची ओळख पोलीस कर्मचारी अशी करून दिली. तक्रारीनुसार, त्या तरुणांनी अल्पवयीन मुलगी आणि तिच्या मित्राला धमकावले. त्यानंतर त्यांनी त्या मुलीला तिच्या मित्रापासून वेगळे केले आणि एका निर्जन ठिकाणी नेले. आसिफने पिस्तूल आणि चाकूचा धाक दाखवून तिला धमकावले. त्यानंतर त्या तिघांनी तिच्यावर बलात्कार केला. अखेरीस, तिला धमकावून त्यांनी सोडून दिले.

### २०० जिल्ह्यांत अध्यात्मवर

जोडण्यात आला आहे. ३ कोटी रुपयांचे रोख बक्षीस सर्व पाच समूहात ठेवण्यात आले आहे. विद्यार्थ्यांसह त्यांचे माता-पिताही सहभागी होऊ शकतात.IESO २०२६-२७ साठी उमेदवारांची नोंदणी पाच गटांमध्ये केली जात आहे.ग्रुप C इयत्ता ६ वी ते ८ वी,ग्रुप D इयत्ता ९ वी ते १२ वी,ग्रुप E -पदवी, PG, संशोधन, डिप्लोमा इत्यादी विद्यार्थी, ग्रुप F माता पित्यांसाठी राखीव,ग्रुप A आणि B -इयत्ता १ ली ते ५ वी साठी नोंदणी पुढील सत्रात उपलब्ध होईल. आयएसओ प्रिलिम्सची ऑफलाइन परीक्षा भारतातील ३६ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांमधील सुमारे २०० निवडक जिल्ह्यांमध्ये २९ ऑगस्ट २०२७ रोजी एकाच दिवशी, एकाच वेळी आयोजित केली जाईल. परीक्षेचे माध्यम हिंदी आणि इंग्रजी असेल. सर्व गटांसाठी पाठ्य पुस्तकही स्वतंत्रपणे हिंदी व इंग्रजी भाषेत तयार केले जात आहे. सर्व नोंदणीकृत विद्यार्थ्यांना त्यांची पुस्तके आणि पुस्तक मोफत दिली जातील. या पुस्तकात वस्तुनिष्ठ प्रश्नोत्तरे असतील आणि या अध्याय आणि मॉडेल प्रश्नपत्रिकेच्या आधारावरच IESO प्रिलिम्सची परीक्षा होईल. प्रथम पारितोषिक आंतरराष्ट्रीय अध्यात्म ऑलिम्पियाडच्या फायनल स्पर्धेत सर्व पाच गटांत प्रथम येणाऱ्या प्रत्येक विजेत्याला १०-१० लाख रुपये,द्वितीय क्रमांक ५-५ लाख रुपये, तृतीय क्रमांक - अडीच- अडीच लाख,चौथा क्रमांक - २-२ लाख रुपये,पाचवा पुरस्कार १.५ - १.५ लाख रुपये रोख बक्षीस दिले जाणार आहे.

अधिक माहितीसाठी रचना मेहरोत्रा ८०९०६३३०९२, सोनाली सिंह ९९१९८३५९९४ किंवा हर्षित जैन ९०३११९९०२९ यांच्याशी संपर्क साधावा.

जिल्ह्यातील सर्व साधू-संत या आयोजनाशी जोडले गेले आहेत. त्यात जगद्गुरु राज राजेश्वर माऊली सरकार, राजेश्वरलाल मोरडिया, आचार्य सागर देशमुख महाराज, इस्कॉनचे अद्वैताचार्य दास आणि महानुभाव पंथाचे कारंजकर महाराज हे देखील सहभागी आहेत. अध्यात्मचा प्रचार प्रसार करण्याच्या उद्देशाने ही स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. २९ ऑगस्ट २०१७ रोजी होणाऱ्या स्पर्धेचे निकाल ३० सप्टेंबर रोजी घोषित होणार आहे. त्यानंतर १२ आणि १३ डिसेंबरला ४८० स्पर्धकांची फायनल परीक्षा होणार आणि या नंतर स्पर्धेचे पुरस्कार वितरित करण्यात येणार आहे. स्पर्धेमध्ये सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले आहे.पत्रकार परिषदेत पूज्य डॉ. संतोष महाराज, रामप्रिया जी, डॉ. कुंजन वेद, शक्ती महाराज, चंद्रकुमार जांगडीया लम्पी सेठ, रचना मेहरोत्रा, सोनाली सिंह, हर्षित जैन आणि मान्यवर उपस्थित होते.

### अखेर कमलेशची झुंज संपली;

व्यक्त करण्यात आली. त्यांच्या अकाली निधनामुळे कुटुंबीय, नातेवाईक व मित्रपरिवारावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

### वडिलोपार्जित जमिनीचा

त्यांचा मृत्यू झाला.

कौटुंबिक आणि वडिलोपार्जित मालमत्तेचा वाद सामोपचाराने मिटविण्याचे प्रयत्न झाले असतानाही तो टोकाला गेल्याने या घटनेने गंभीर प्रश्न उपस्थित झाले आहेत. किरकोळ स्वरूपात सुरू झालेला वाद थेट सख्ख्या भावाच्या मृत्यूपर्यंत पोहोचल्याने मंदर गावात हळहळ व्यक्त होत आहे.

दरम्यान, या प्रकरणातील संशयित आरोपी रविंद्र बुरडकर याला पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. यापूर्वी दाखल असलेल्या गुन्ह्यात वाढ करून खुनाचे कलम लावण्यात आल्याची माहिती आहे. पोलिसांनी घटनेचा तपास सुरू केला असून हल्ल्याचा नेमका घटनाक्रम, वादाचे मूळ कारण आणि घटनेपूर्वी घडलेल्या घटनांची माहिती घेतली जात आहे.

या प्रकरणाचा पुढील तपास ठाणेदार भानुदास पिदूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली वणी पोलीस करीत आहेत.

### जिल्हाधिकारी कार्यालयासमोर

यांनी राहुल गांधींवर बिनबुडाचे आरोप केले आहेत. अशा प्रकारे सातत्याने बेताल वक्तव्ये करणाऱ्या भाजप नेत्यांना आता मेंटल हॉस्पिटलमध्ये ट्रीटमेंट घेण्याची गरज निर्माण झाली आहे, असा घणाघाती टोला यावेळी आंदोलकांनी लगावला. येत्या काळात जनता आणि राहुल गांधी या भाजप नेत्यांना त्यांची खरी जागा दाखवून दिल्याशिवाय राहणार नाही, असा थेट इशारा यावेळी देण्यात आला.

या आंदोलनात युवक काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष राहुल येवले, कार्याध्यक्ष अनिकेत ढेंगळे, प्रदेश महासचिव निलेश गुहे, NSUI प्रदेश उपाध्यक्ष संकेत कुलट, जिल्हा उपाध्यक्ष नितिन काळे, अमरावती विधानसभा अध्यक्ष वैभव देशमुख, बडनेरा अध्यक्ष आशिष यादव, सत्यजीत विधळे, संदीप मुंडे, लोकेश केणे, सुनील मानकर, प्रीतम कुकडे, सुरज खैरे, मयूर गुनखडे, हर्षल यावलीकर, हर्षल साखरकर,पवन ढोबले, चेतन इतनारे,आदित्य भिड़कर, ओम उंबरकर, विक्की तायडे, मनोज केदार, राजू तंबाखे, राम बोबडे, वैभव भोरे, योगेश घोडेस्वार, वेदांत साखरे, ओम उमळेकर, ओम खराटे, लकी फुले यांच्यासह अमरावती जिल्हा युवक काँग्रेस व NSUI चे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### भटवाडी परिसरातून २६ वर्षीय

परिसरातून दोन वर्षांसाठी तडीपार असल्याचे समोर आले. तडीपारीचा आदेश असतानाही शहरात आढळून आल्याने पोलिसांनी त्याच्याविरुद्ध महाराष्ट्र पोलीस कायद्याच्या कलम १४२ अन्वये कारवाई केली. याप्रकरणी राजापेठ पोलीस ठाण्यात अपराध क्रमांक ८१८/२०२६ नुसार महाराष्ट्र पोलीस अधिनियमाच्या कलम १४२ व १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सार्वजनिक उत्सवांच्या काळात कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होऊ नये, यासाठी राजापेठ पोलिसांकडून तडीपार केलेल्या इसमांवर विशेष लक्ष ठेवण्यात येत आहे. तडीपार केलेला कोणताही इसम परिसरात आढळून आल्यास नागरिकांनी तत्काळ राजापेठ पोलीस ठाण्याला माहिती द्यावी, असे आवाहन पोलिसांनी केले आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला, पोलीस उपायुक्त शाम घुगे व सहायक पोलीस आयुक्त संजय खताळे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या आदेशाने करण्यात आली. पोनी उमेश मुंढे, सपोनि नितीन शिंदे तसेच डीबी पथकातील अधिकारी व अंमलदारांनी कारवाईत सहभाग घेतला.

### ‘बोलायचे नाही’ म्हणताच फोटो-

तिने सांगितल्याचे पोलिसांनी नमूद केले आहे. त्यानंतर आरोपीने फोटो व्हायरल करण्याची धमकी दिल्याचा आरोप आहे. तरुणीने या धमकीकडे दुर्लक्ष केल्यानंतर आरोपीने तिच्या आईशी संपर्क साधल्याचेही तक्रारीत म्हटले आहे. मुलगी आपल्याशी बोलत नसल्याचा राग व्यक्त करत त्याने फोटो व व्हिडीओ प्रसारित करण्याची धमकी दिली तसेच शिवीगाळ केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या घटनेनंतर तरुणीने गाडगेनगर पोलिसांकडे धाव घेत तक्रार दाखल केली. तिच्या जबानीवरून पोलिसांनी बीएनएसच्या संबंधित कलमांनुसार गुन्हा नोंदविला आहे. धमकी देण्यासाठी नेमका कोणता डिजिटल माध्यमांचा वापर करण्यात आला, संबंधित फोटो-व्हिडीओ अस्तित्वात आहेत का आणि आरोपीने ते प्रसारित करण्याचा प्रयत्न केला का, यासह अन्य बाबींचा तपास पोलिसांकडून सुरू आहे.

### फोन-पेच्या दोन व्यवहारांनी

त्यांच्या खात्यातून ९३ हजार ३३३ रुपये डेबिट झाले. त्यानंतर २० ऑगस्ट रोजी आणखी ९५ हजार ५५५ रुपयांचा व्यवहार झाला.

२० ऑगस्ट रोजी दुपारी साडेएकच्या सुमारास मोठी रक्कम खात्यातून कमी झाल्याचे शेख यांच्या लक्षात आले. त्यांनी बँकेत जाऊन खात्याची माहिती घेतली असता, यापूर्वीच्या दिवशीही मोठी रक्कम डेबिट झाल्याचे समोर आले. दोन्ही व्यवहारांची एकत्रित रक्कम १ लाख ८८ हजार ८८८ रुपये असल्याचे स्पष्ट झाले. यानंतर शेख यांनी विलंब न करता सायबर हेल्पलाइन क्रमांक १९३० वर संपर्क साधून तक्रार नोंदविली. त्यांच्या जबानीवरून पोलिसांनी बीएनएस कलम ३१८(४) तसेच माहिती तंत्रज्ञान कायद्यातील कलम ६६(सी) आणि ६६(डी) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. या व्यवहारांमागे कोण आहे, रक्कम कोणत्या खात्यात वळती झाली आणि डिजिटल व्यवहारासाठी कोणत्या माध्यमाचा वापर झाला, याचा तपास पोलिसांकडून करण्यात येत आहे.

### तीन हजार मीटर केबल चोरीचा

आधारे पोलिसांनी अनसिंग श्याम पवार (वय ३०), फरिस्ता मनसजन पवार (वय २५) आणि मच्छिंद्र मनसजन पवार (वय ३०), तिघेही रा. तरोडा, ता. चांदूर रेल्वे, यांना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी ऋषी चंदन पवार याच्यासह विविध ठिकाणी केबल चोरी केल्याची माहिती दिल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. तपासात चांदूर रेल्वे पोलिस ठाण्यातील एक तसेच मंगरुळ चव्हाळा पोलिस ठाण्यातील दोन, अशा चार गुन्ह्यांचा उलगडा झाल्याचे पोलिसांनी सांगितले. चोरीची तार अमरावतीतील हैदरपुरा येथील भंगार व्यावसायिक रिझवान खान रहेमान खान (वय १९) याला विकल्याची माहिती तपासात पुढे आल्याचे पोलिसांचे म्हणणे आहे. पोलिसांनी ४५ किलो तांब्याची तार, ६० हजार रुपये किमतीची मोटारसायकल आणि दोन मोबाईल असा मुद्देमाल जप्त केला. ऋषी पवार फरार असून त्याचा शोध सुरू आहे.

### जुन्या वादात तरुणाच्या हत्येचा प्रयत्न

माहितीनुसार रहाटगाव येथील शिवाजी चौक परिसरात राहणारा नहुष किशोर दिवाडे (वय २३) याला त्याच्याच जुन्या ओळखीच्या गजेंद्र पवार आणि अजय थोरात या दोघांनी १९ सप्टेंबर रोजी रात्री सुमारे ९ वाजता लोहार लाईन, विलास नगर परिसरात बोलावले होते. तिथे जुन्या वादावरून त्यांच्यात बाचाबाची झाली.या वादातून गजेंद्र आणि अजय यांनी त्यांच्या इतर दोन साथीदारांसह एकत्र येऊन नहुष दिवाडे याच्यावर चाकूने हल्ला करून त्याला जीवे मारण्याचा प्रयत्न केला.घटनेनंतर जखमी नहुष याने दिलेल्या तोंडी तक्रारी आणि वैद्यकीय प्रमाणपत्राच्या आधारे गाडगेनगर पोलिसांनी संबंधित कलमांन्वये गुन्हा दाखल करून तपास सुरू केला.ठाणेदार गोरखनाथ जाधव यांच्या मार्गदर्शना खाली गाडगेनगर पोलिसांच्या डीबी पथकाने आरोपींचा शोध सुरू केला. या पथकाने तात्काळ कारवाई करत तिघांना अटक केली असून, एका अल्पवयीन मुलालाही ताब्यात घेतले आहे.पोलीस चौकशीत आरोपींनी गुन्ह्यात आपला सहभाग असल्याची कबुली दिली आहे. अरोपीकडून हल्ला करण्यासाठी वापरण्यात आलेला चाकू देखील जप्त करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस आयुक्त राकेश ओला,उपायुक्त यशवंत सोळंके, सहा आयुक्त निलेश ब्राह्मणे यांचे निर्देशानुसार वरिष्ठ पोलीस निरीक्षक गोरखनाथ जाधव, क्राईम पो.नि.विजया पंधरे, पो.नि. प्रमोद पाचकवडे यांचे मार्गदर्शनात डी.बी. पथक प्रमुख सपोनि संदिप हिवाळे, पोहवा. भारत वानखडे, पो.ना. राजेश गुरेले, पो.शि. मतिन शेख, पो.शि. सुशांत प्रधान, पो.शि. धनराज कुमरे, पो.शि. महेश शर्मा, पो.शि. प्रताप तायखेडे, चालक पो.हवा. अजय निस्ताने व सैनिक रुपनारायण यांनी कारवाईमध्ये सहभाग घेतला.

### पांढरीजवळ कारची मोपेडला

पडले. अपघाताचा आवाज ऐकून परिसरातील नागरिक घटनास्थळी जमा झाले. नागरिकांनी जखमींना तातडीने जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीनंतर दोघांनाही मृत घोषित केले. दरम्यान, घटनेची माहिती मिळाल्यानंतर भातकुली पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. प्राथमिक पाहणीनंतर अपघाताचे ठिकाण बडनेरा पोलिस ठाण्याच्या हद्दीत येत असल्याचे स्पष्ट झाले. त्यानंतर बडनेरा पोलिसांना माहिती देण्यात आली. बडनेरा पोलिसांनी घटनास्थळी पंचनामा करून अपघाताची माहिती संकलित करण्यास सुरुवात केली. मोपेडची झालेली अवस्था पाहता धडक अत्यंत जोरदार असल्याचे स्पष्ट झाले. अपघात नेमका कोणत्या कारणामुळे झाला, कारचा वेग किती होता आणि दोन्ही वाहनचालकांकडून वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन झाले होते का, याचा तपास बडनेरा पोलिसांकडून करण्यात येत आहे. दोन्ही मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात ठेवण्यात आले आहेत.

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

अकोला । वाशिम । बुलडाणा

■ बुधवार, २३ सप्टेंबर २०२६ ■ मूल्य ३.०० ■ पृष्ठे ४

paper : www.janmadhyam.com
mail : Jmakola.thakur@gmail.com


# शेतकरी आक्रोश मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला

## अधिकारी गैरहजर असल्याने आ. नितीन देशमुख संतापले

### ५ ऑक्टोबरपर्यंत दुष्काळ जाहीर न केल्यास समृद्धी महामार्गावर आंदोलनाचा इशारा

■ प्रतिनिधी | वाशिम ■

पश्चिम विदर्भात पावसाने मोठी दडी मारल्याने खरीप हंगामातील पिके संकटात सापडली असून, शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने सोमवारी (दि. २१) वाशिम येथे शेतकरी आक्रोश मोर्चा काढण्यात आला. शिवसेना उपनेते तथा आमदार नितीन देशमुख यांच्या नेतृत्वाखाली काढण्यात आलेल्या या मोर्चात जिल्ह्यातील शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.



शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातून मोर्चाला सुरुवात झाली. पाटणी चौक, अकोला नाका मार्गे मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. वाशिम जिल्ह्यात पावसाने मोठी दडी मारल्याने सोयाबीन, तूर, कपाशी यासह खरीप पिकांना पावसाच्या खंडाचा फटका बसला आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी, पीकनुकसान भरपाई जाहीर करावी तसेच दुष्काळी परिस्थितीवर तातडीने उपाययोजना कराव्यात, अशा विविध मागण्या यावेळी करण्यात आल्या.

मोर्चानंतर आमदार नितीन देशमुख यांच्यासह शिवसेना पदाधिकारी व शेतकरी जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देण्यासाठी पोहोचले. मात्र, संबंधित अधिकारी कार्यालयात उपस्थित नसल्याचे समोर आल्यानंतर कार्यकर्त्यांमध्ये नाराजी पसरली. निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे हे कार्यालयात नसल्याचे सांगण्यात आल्यानंतर आमदार देशमुख यांनी प्रशासनाच्या कार्यपद्धतीवर नाराजी व्यक्त केली. हजारो शेतकरी आपल्या मागण्यांसाठी जिल्हाधिकारी कार्यालयावर आले असताना संबंधित अधिकारी कार्यालयात उपस्थित नसणे योग्य नसल्याचे सांगत देशमुख यांनी संताप व्यक्त केला. अधिकारी ऑन ड्युटी असताना जेवणासाठी गेले असल्याचे सांगण्यात आल्यानंतर वातावरण आणखी तापले. काही वेळाने निवासी उपजिल्हाधिकारी विश्वनाथ घुगे कार्यालयात दाखल झाले.

यावेळी आमदार नितीन देशमुख यांनी, 'साहेब, ऑन ड्युटी असताना तुम्ही जेवायला कोणत्या नियमाने गेले होते?' असा सवाल उपस्थित केला. यावर निवासी उपजिल्हाधिकारी घुगे यांनी दिलगिरी व्यक्त केली. त्यानंतर वातावरण निवळले आणि आमदार देशमुख व शेतकऱ्यांनी प्रशासनाकडे निवेदन सादर केले.

दरम्यान, शासनाने ५ ऑक्टोबरपर्यंत दुष्काळ जाहीर न केल्यास समृद्धी महामार्गावर आंदोलन करण्यात येईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला. मोर्चात शिवसेना जिल्हाप्रमुख बालाजी वानखेडे, सुधीर कवर, कॅप्टन प्रशांत सुर्वे, नगरसेवक, पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

# वेदनेपासून उपचाराच्या दिशेने; रुग्ण कल्याण समितीचा संवेदनशील पुढाकार

■ प्रतिनिधी | कारंजा ■

आजारीपणाची वेदना शरीराला असते; मात्र त्याची चिंता संपूर्ण कुटुंबाला असते. हीच जाणीव केंद्रस्थानी ठेवून कारंजा लाड येथील उपजिल्हा रुग्णालयात रुग्ण कल्याण समितीने आरोग्यसेवेच्या क्षेत्रात एक संवेदनशील आणि लोकाभिमुख पाऊल पुढे टाकले.

हर्निया तसेच शरीरावर असलेल्या विविध गाठींच्या समस्येने त्रस्त असलेल्या रुग्णांना तज्ज्ञ वैद्यकीय तपासणी आपल्या परिसरातच उपलब्ध व्हावी, उपचारासाठी दूरवर जाण्याचा आर्थिक व मानसिक त्रास कमी व्हावा आणि गरजू रुग्णांना पुढील उपचाराची स्पष्ट दिशा मिळावी, या उद्देशाने रुग्ण कल्याण समितीच्या पुढाकाराने विशेष शस्त्रक्रिया तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. कारंजा मानोरा मतदार आमदार सई ताई डहाके यांच्याद्वारे नामनिर्देशित रुग्ण कल्याण समिती सदस्य यांच्या पुढाकाराने आयोजित या शिबिराला रुग्णांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

शिबिरात एकूण ६५ रुग्णांची वैद्यकीय तपासणी करण्यात आली.



सर्जन डॉ. नितेश गायकी यांनी रुग्णांची तपासणी करून आजाराचे स्वरूप, आवश्यक उपचार आणि शस्त्रक्रियेबाबत सविस्तर वैद्यकीय सल्ला व मार्गदर्शन केले.

तपासणीनंतर ४५ रुग्णांची पुढील वैद्यकीय सल्ला, मार्गदर्शन व शस्त्रक्रियेसाठी निवड करण्यात आली. आवश्यकतेनुसार संबंधित रुग्णांच्या शस्त्रक्रिया कारंजा उपजिल्हा रुग्णालयात करण्यात येतील.

येथे शस्त्रक्रिया करणे शक्य नसलेल्या रुग्णांना पुढील उपचारासाठी वाशिम येथे पाठविण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. यामुळे अनेक रुग्णांच्या मनातील उपचाराबाबतची अनिश्चितता दूर होऊन पुढे काय करायचे, कुठे उपचार घ्यायचे आणि शस्त्रक्रियेची आवश्यकता काय आहे, याबाबत स्पष्टता मिळाली.

### 'रुग्ण हा केवळ आकडा नाही; तो एका कुटुंबाची आशा आहे'

शासकीय रुग्णालयात येणारा प्रत्येक रुग्ण हा केवळ नोंदणी क्रमांक किंवा वैद्यकीय अहवाल नसतो. त्याच्यासोबत त्याच्या कुटुंबाची चिंता, अपेक्षा आणि उपचाराची आशा जोडलेली असते. त्यामुळे रुग्णाला योग्य वेळी योग्य तपासणी, योग्य सल्ला आणि पुढील उपचाराची दिशा मिळणे हीच खरी रुग्णसेवा, या भावनेतून रुग्ण कल्याण समितीच्या माध्यमातून हा उपक्रम राबविण्यात आला. ग्रामीण व सर्वसामान्य नागरिकांना उपचारासाठी मोठ्या शहरांकडे धाव घ्यावी लागू नये, आर्थिक परिस्थितीमुळे उपचार लांबणीवर पडू नयेत आणि उपलब्ध शासकीय आरोग्यसेवेचा अधिकाधिक लाभ नागरिकांना मिळावा, यासाठी अशा उपक्रमांची गरज अधोरेखित झाली.

# कारंजा रुग्णालयात नेत्रसेवेची नवीन दिशा

■ प्रतिनिधी | कारंजा ■

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली वाशिम जिल्हा प्रशासन आणि जेएम फायनान्शियल फाऊंडेशन यांच्यात वाशिम जिल्ह्यातील नेत्रसेवा सुविधा बळकट करण्यासाठी महत्त्वपूर्ण सामंजस्य करार करण्यात आला. यावेळी कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री मा .देवेंद्र फडणवीस साहेब यांच्या यांच्या मार्गदर्शनात आमदार सईताई डहाके यांनी

या उपक्रमाचा विशेष लाभ कारंजा तालुक्यातील व परिसरातील नागरिकांना होणार आहे. उपजिल्हा रुग्णालय, कारंजा-लाड येथे स्वतंत्र व सुसज्ज नेत्रचिकित्सा विभाग तसेच ऑपरेशन थिएटर सुरू करण्यात येणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील नागरिकांना घराजवळच नेत्र तपासणी आणि शस्त्रक्रियेची सुविधा उपलब्ध होणार आहे.यासोबतच जिल्हा रुग्णालय, वाशिम येथील नेत्रशस्त्रक्रियांची क्षमता वाढविण्यात येणार असून, आर्थिक वर्ष २०२७-२८ मध्ये वाशिम आणि कारंजा-लाड येथे एकत्रितपणे ४,४०० नेत्रशस्त्रक्रिया करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.


प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामीण रुग्णालये आणि व्हिजन सेंटरच्या माध्यमातून शेवटच्या घटकापर्यंत नेत्रसेवा पोहोचविण्यासाठी तपासणी, उपचार व संदर्भसेवा व्यवस्था अधिक सक्षम केली जाणार आहे.

# मालेगाव नाक्यावर रिसोड-अकोला एसटी बस पंचर

### प्रवाशांना नाहक त्रास; नादुरुस्त एसटी बसेसमुळे प्रवासी वैतागले; वेळापत्रकाचा बोजवारा उडाल्याने संताप

■ प्रतिनिधी | रिसोड ■

रिसोड शहरातून अकोल्याकडे जाणारी एसटी बस सोमवारी दि.२१ सप्टेंबर रोजी दु.१ वा मालेगाव नाका परिसरात अचानक पंचर झाल्याने प्रवाशांना नाहक त्रास सहन करावा लागला. बस रस्त्यातच थांबल्याने प्रवाशांना बराच वेळ प्रतीक्षा करावी लागली. काही वेळानंतर दुसऱ्या बसने सर्व प्रवासी रवाना करण्यात आले. मात्र रिसोड आगाराच्या बसगाड्यांच्या देखभालीचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.रिसोड आगारातून विविध मार्गांवर धावणाऱ्या एसटी बसेसपैकी काही बसेस वारंवार नादुरुस्त होत असल्याच्या तक्रारी प्रवाशांकडून करण्यात येत आहेत. कधी बसमध्ये तांत्रिक बिघाड, कधी टायर पंचर तर कधी अन्य कारणांमुळे प्रवासातच बस थांबण्याचे प्रकार घडत असल्याचे प्रवाशांचे म्हणणे आहे. परिणामी विद्यार्थ्यांसह नोकरी, व्यवसाय आणि दैनंदिन कामासाठी प्रवास करणाऱ्या नागरिकांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागत आहे.रिसोड आगारातील काही बसफेऱ्या वेळेवर न सुटणे,



मार्गात बस बंद पडणे किंवा नादुरुस्तीमुळे फेऱ्यांमध्ये बदल होणे, यामुळे प्रवाशांचे वेळापत्रक कोलमडत आहे. विशेषतः ग्रामीण भागातून शहरात येणाऱ्या प्रवाशांना पुढील प्रवासासाठी दुसरे वाहन उपलब्ध करून घेणे आर्थिकदृष्ट्याही जड जात आहे.एसटी महामंडळाच्या बससेवेवर सर्वसामान्य नागरिक, विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक आणि ग्रामीण भागातील प्रवासी मोठ्या प्रमाणात अवलंबून आहेत. त्यामुळे बसेसची नियमित तपासणी, टायर व इतर तांत्रिक बाबींची वेळोवेळी देखभाल तसेच बसफेऱ्या नियोजित वेळेत सुरू ठेवणे आवश्यक असल्याची मागणी प्रवाशांकडून होत आहे.रिसोड-अकोला मार्गावरील बस मालेगाव नाका येथे पंचर झाल्याच्या घटनेमुळे प्रवाशांमध्ये नाराजी व्यक्त होत आहे. वारंवार उद्भवणाऱ्या नादुरुस्तीच्या समस्येकडे एसटी महामंडळाच्या रिसोड आगार प्रशासनाने गांभीर्याने लक्ष देऊन बसेसची पूर्वतपासणी व देखभाल व्यवस्था अधिक सक्षम करावी, तसेच वेळापत्रकानुसार बससेवा सुरळीत ठेवावी, अशी मागणी प्रवाशांनी केली आहे.'एसटी ही सर्वसामान्यांची वाहतूक व्यवस्था आहे. त्यामुळे बस नादुरुस्त होऊन प्रवाशांना रस्त्यात ताटकळत ठेवण्याचे प्रकार थांबविण्यासाठी आगार प्रशासनाने ठोस उपाययोजना कराव्यात,' अशी अपेक्षा प्रवाशांकडून व्यक्त होत आहे.

# क्षयरोग, एड्स तपासणी शिबीर



■ प्रतिनिधी | वाशिम ■

दि.२२ सप्टेंबर रोजी प्राथमिक आरोग्य केंद्र मांगुळ झनक येथे फिरते डिजिटल क्ष किरण वाहनाद्वारे संशयित क्षयरुग्नाचे एक्स रे तपासणी शिबिर घेण्यात आले.जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ ठोंबरे,जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ परभणकर यांचे मार्गदर्शनाखाली जिल्हा क्षयरोग केंद्राचे आरोग्य निरीक्षक रामदास गवई यांनी शिबिराचे नियोजन केले.वैद्यकिय अधिकारी डॉ सोनल रूहाटीया, डॉ हरीश शिंदे,डॉ मगर, डॉ दिपक भूतडा यांचे उपस्थितीत क्ष किरण वैज्ञानिक अधिकारी सतीश सैबेवार यांनी ४० संशयितांचे एक्स रे काढले. यावेळी उपस्थित फार्मसी ऑफिसर, लॅब टेक्निशियन, आरोग्य सहाय्यक, सहाय्यिका, आरोग्य सेवक, आरोग्य सेविका, उपचार पर्यवेक्षक, गटप्रवर्तक, वाहनचालक, परिचर तसेच आशा कार्यकर्ती उपस्थित होत्या.

यावेळी २२ संशयीतांचे स्पुटम गोळा करण्यात आले.लिंक वर्कर यांनी २९ व्यक्तींची एच आय व्ही तपासणी केली.

# अनधिकृत बांधकामाबाबत जिल्हाधिकाऱ्यांकडे तक्रार



■ प्रतिनिधी | रिसोड ■

शहरातील सर्व धर्मीयांचे श्रद्धास्थान असलेले 'कालुशाह बाबा दर्गा परिसरात सुरू असलेल्या कथित अनधिकृत दूकान बांधकामास नगर परिषद रिसोडचे मुख्याधिकारी यांच्याकडून दुर्लक्ष होत असुन या संदर्भात स्वतंत्र चौकशी करून मुख्याधिकारी यांच्यावर प्रशासकीय कारवाई करण्यात यावी अशी मागणी रिसोड शहरातील मुस्लिम समाजाच्या वतीने दि. २२ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी वाशिम यांना तक्रार अर्जाद्वारे केली आहे. अर्जात नमूद करण्यात आले आहे की,रिसोड शहरातील कालुशाह बाबा दर्गा परिसरात

अनधिकृत/परवानगीविना दूकान बांधकाम होत असल्याबाबत नगर परिषद रिसोडकडे वारंवार तक्रारी करण्यात आलेल्या आहेत. या संदर्भात नगर परिषद प्रशासनाने संबंधितांना नोटीसदेखील बजावलेली आहे.आमच्या माहितीनुसार सदर बांधकामाबाबत नगर परिषद प्रशासनाकडून अनधिकृत दूकान बांधकाम असल्याचे सांगण्यात आलेले/नोंदविण्यात आलेले असतानाही प्रत्यक्ष प्रभावी कारवाई झालेली नाही. या विषयाकडे प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी लोकशाही मार्गाने उपोषण केले होते परंतु अजूनही कोणत्या प्रकारची कारवाई झालेली नाही. त्यामुळे सदर प्रकरणाची निष्पक्ष आणि वरिष्ठ अधिकाऱ्यामार्फत चौकशी होणे आवश्यक आहे. असे अर्जात नमूद करण्यात आले आहे.

# पत्नी-मुलीची हत्या; आरोपीला फाशीची शिक्षा

## अकोला जिल्हा व सत्र न्यायालयाचा ऐतिहासिक निकाल; १० हजार रुपयांचा दंडही

■ प्रतिनिधी | अकोला ■

पत्नी व नऊ वर्षीय मुलीची कुऱ्हाडीने वार करून हत्या केल्याप्रकरणी आरोपी मनिष किसनराव म्हात्रे (३५, रा. देशमुख फैल, संतोषी माता मंदिराजवळ, हनुमान बस्ती, अकोला) याला अकोला जिल्हा व सत्र न्यायालयाने मंगळवारी (२२ सप्टेंबर) दोषी ठरवत फाशीची शिक्षा सुनावली. तसेच त्याच्यावर १० हजार रुपयांचा दंडही ठोठावण्यात आला. या निकालामुळे अकोला जिल्हा व सत्र न्यायालयातील या प्रकरणाला विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे.

या प्रकरणाची घटना २४ एप्रिल २०२४ रोजी पहाटेच्या सुमारास घडली होती. आरोपी मनिष म्हात्रे याने कौटुंबिक वादातून पत्नी रश्मी मनिष म्हात्रे (३०)

### पोलिसांच्या पाठपुराव्याला यश

या प्रकरणाच्या न्यायालयीन पाठपुराव्यासाठी पोलीस अधीक्षक अर्चित चांडक, अपर पोलीस अधीक्षक बी. चंद्रकांत रेड्डी, शहर विभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी सुदर्शन पाटील आणि रामदासपेठ पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शिरीष खंडारे यांच्या मार्गदर्शनाखाली पैरवी अधिकारी ग्रेड पोलीस उपनिरीक्षक सुनील दीपकवार (सीएमएस सेल, अकोला) तसेच पोलीस हवालदार अजय वानखडे यांनी काम पाहिले.

आणि मुलगी कु. माही मनिष म्हात्रे (९) यांच्यावर कुऱ्हाडीने डोक्यावर व मानेवर वार करून त्यांची हत्या केली होती, असा आरोप होता.

घटनेनंतर आरोपी स्वतः आपल्या दोन चुलत भावांसह रामदासपेठ पोलीस ठाण्यात पोहोचला आणि पत्नी व मुलीला कुऱ्हाडीने मारल्याची माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता दोघीही घरात रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या आढळून आल्या. घटनास्थळावर रक्ताने माखलेली लाकडी दांड्याची कुऱ्हाड तसेच रक्ताचे डाग असलेली लोखंडी सुरी आढळून आली.

पोलिसांच्या तपासात आरोपी हा मागील काही वर्षांपासून कौटुंबिक कारणांमुळे पत्नीपासून विभक्त राहत होता. तो पत्नीच्या चारित्र्यावर संशय घेत असल्याची माहितीही तपासात समोर आली होती. याप्रकरणी रामदासपेठ पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १६९/२०२४ अन्वये भारतीय दंड संहिता कलम ३०२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता.

तपास अधिकारी पोलीस निरीक्षक मनोज बहुरे यांनी तपास पूर्ण करून आरोपीविरुद्ध न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.

सुनावणीदरम्यान सरकार पक्षाच्या वतीने सरकारी अभियोक्ता मंगेश मानकर यांनी प्रभावीपणे बाजू मांडली. न्यायालयात एकूण १४ साक्षीदारांच्या साक्षी नोंदविण्यात आल्या. त्यामध्ये वैद्यकीय अधिकाऱ्यांसह अन्य महत्त्वाच्या साक्षीदारांच्या साक्षी निर्णायक ठरल्या.

# मोफत आरोग्य तपासणी शिबिर



■ प्रतिनिधी | मानोरा ■

तालुक्यातील वापटा येथे सार्वजनिक न्यू बाल गणेश मंडळ यांच्या वतीने गावात आयोजित करण्यात आलेले सार्वजनिक मोफत आरोग्य तपासणी शिबिरउत्साहात पार पडला. या शिबिराला ग्रामस्थांचा, विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि विद्यार्थ्यांचा मोठा प्रतिसाद मिळाला.

आयोजीत मोफत आरोग्य शिबिरात रक्तदाब व मधुमेह तपासणी, मोफत औषधी वितरण, डोळ्यांची तपासणी व गरजूंना मार्गदर्शन करण्यात आले. यावेळी अनुभवी व तज्ज्ञ डॉक्टरांच्या टीमने नागरिकांची तपासणी करून आरोग्य जागरूकतेबाबत मार्गदर्शन व समुपदेशन केले.

या शिबिरासाठी डॉ. पवन चौधरी, डॉ. रवी चव्हाण आणि डॉ. नितिन कदम (नेत्रतज्ज्ञ), पंकज ऑप्टिकल्स, मानोरा यांची विशेष उपस्थिती होती.

# गणेश विसर्जनासाठी पोलीस यंत्रणा अलर्ट!

## बाळापूरमधील घाट, पूल अनब मिरवणूक मार्गाची एसपी अर्चित चांडक यांच्याकडून पाहणी

■ प्रतिनिधी | बाळापूर ■

गणेश विसर्जन मिरवणुकीदरम्यान कोणताही अनुचित प्रकार घडू नये आणि विसर्जन सोहळा शांततेत पार पडावा, यासाठी अकोला पोलीस यंत्रणा सज्ज झाली आहे. पोलीस अधीक्षक अर्चित चांडक यांनी सोमवारी बाळापूर शहरातील गणेश विसर्जन घाट, मिरवणूक मार्ग तसेच मन नदीवरील पुलाची पाहणी करून सुरक्षा व्यवस्थेचा आढावा घेतला. यावेळी वाहतूक नियोजन, गर्दी नियंत्रण आणि आपत्कालीन परिस्थितीतील उपाययोजनांबाबत संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना देण्यात आल्या.

### वाहतूक कोंडी, गर्दी नियंत्रणावर विशेष भर; कायदा-सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी अधिकाऱ्यांना सूचना



गणेश विसर्जनाच्या पार्श्वभूमीवर पोलीस अधीक्षक चांडक यांनी बाळापूर पोलीस ठाण्यात भेट देऊन सुरक्षा व नियोजनाचा आढावा घेतला. त्यानंतर शिमला हॉटेलजवळील मन नदीवरील पुलाची पाहणी करण्यात आली. अकोला शहरातील गणेश मंडळांच्या मूर्ती विसर्जनासाठी या मार्गाचा मोठ्या प्रमाणावर वापर होत असल्याने या ठिकाणी संभाव्य गर्दी आणि वाहतूक कोंडी लक्षात घेऊन आवश्यक उपाययोजना करण्याच्या सूचना देण्यात आल्या. यानंतर भिकुंड नदीवरील गणेश विसर्जन घाट तसेच बाळापूर शहरातील मन नदीवरील विसर्जन घाटाची पाहणी करण्यात आली. घाटावरील प्रकाश व्यवस्था, सुरक्षितता, गर्दी नियंत्रण, वाहतूक व्यवस्था, आपत्कालीन परिस्थितीत तातडीने करावयाच्या उपाययोजनांची माहिती घेण्यात आली.

### मिरवणूक मार्गावरही बारकाईने नजर

बाळापूर शहरातील गणेश विसर्जन मिरवणूक मार्गाची पाहणी करताना कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी आवश्यक पोलीस बंदोबस्त, वाहतूक नियोजन आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर चर्चा करण्यात आली. मिरवणुकीदरम्यान नागरिकांची गैरसोय होणार नाही, यासाठी वाहतूक व्यवस्थेचे योग्य नियोजन करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. यावेळी अकोला महानगरपालिका आयुक्त, उपविभागीय पोलीस अधिकारी गजानन पडघन, बाळापूर तहसीलदार फरताडे, महसूल विभागातील अधिकारी, गणेश मंडळांचे पदाधिकारी तसेच बाळापूर पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी व पोलीस अंमलदार उपस्थित होते. गणेशोत्सव व विसर्जन सोहळा शांततेत, सुरक्षित आणि सुरळीत पार पडावा यासाठी पोलीस दलासह सर्व संबंधित यंत्रणा सज्ज असल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. नागरिकांनीही प्रशासनाला सहकार्य करून उत्सव शांततेत साजरा करावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

जनमाध्यम
e paper www.janmadhyam.com
एक प्रतिष्ठित सवय
■ वर्धा ■ वर्षे १४ ■ अंक २९७ ■ बुधवार, २३ सप्टेंबर २०२६ ■ पृष्ठे ४ ■ मुल्य ३.०० रु.

# रेती चोरीवर एलसीबीचा दणका; १०.६५ लाखांचा मुद्देमाल जप्त

## पारडी शिवारात वणा नदीपात्रातून विनापरवाना रेती वाहतूक; चौघांवर गुन्हा

**वर्धा जनमाध्यम :** वणा नदीपात्रातून चोरट्या पद्धतीने रेती उपसा करून विनापरवाना वाहतूक करणाऱ्या टोळीवर स्थानिक गुन्हे शाखेने मंगळवारी धडक कारवाई केली. पारडी शिवारातील चाकूर घाटाच्या पांदण रस्त्यावर सापळा रचून ट्रॅक्टर ट्रॉलीसह १.५ ब्रास रेती असा एकूण १० लाख ६५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. याप्रकरणी चौघांविरुद्ध सिंदी रेल्वे पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पारडी शिवारात कारवाई केली. यावेळी जॉन डिअर ५०५० डी कंपनीचा हिरव्या रंगाचा ट्रॅक्टर क्रमांक एमएच ३२ एएस ८६४७ रेतीची वाहतूक करताना आढळून आला. तपासणीदरम्यान ट्रॉलीमध्ये १.५ ब्रास रेती आढळली. शासनाच्या आधिपत्याखालील वणा नदीपात्रातील चाकूर घाटातून विनापरवाना रेती काढून आर्थिक फायद्यासाठी तिची वाहतूक केल्याचा आरोप आहे.

या प्रकरणी ट्रॅक्टर मालक सचिन चिंदुजी बुचके आणि त्याचा भाऊ मंगेश बुचके दोघेही रा. पारडी, चालक आकाश गजानन खांदवे रा. भोसा आणि वाहक नितेश मोहन वाघमारे रा. पारडी यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलिस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल आणि अपर पोलिस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या निर्देशानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक विनोद चौधरी यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस अंमलदार अरविंद येनुरकर, रवि पुरोहित आणि सागर भोसले यांनी केली.

# एआयच्या पडद्याआड बनावट पत्रकारितेचा धुमाकूळ

## खोट्या वृत्तपत्रांची डिजिटल दुकाने थाटली; बनावट बातम्या, फोटो अन् नावांचा सर्रास वापर




**आष्टी शहीद जनमाध्यम :** कृत्रिम बुद्धिमत्तेचे तंत्रज्ञान माहितीच्या विश्वाला नवी दिशा देत असतानाच त्याच तंत्रज्ञानाचा गैरवापर करून पत्रकारितेच्या विश्वासार्हतेवरच घाला घालण्याचा प्रकार वाढत आहे. एआयच्या मदतीने काही मिनिटांत वृत्तपत्राच्या पानासारखा हुबेहूब डिजिटल बनाव तयार करायचा आणि त्यावर खोटी अथवा दिशाभूल करणारी माहिती टाकून सोशल मीडियावर व्हायरल करायची. या प्रकारामुळे खऱ्या पत्रकारितेच्या नावावरच प्रश्नचिन्ह उभे राहण्याची गंभीर परिस्थिती निर्माण झाली आहे.

विशेष म्हणजे काही ठिकाणी अधिकृत वृत्तपत्र असल्याचा आभास निर्माण करण्यासाठी बनावट नाव, लोगो, बातमीचे लेआउट, पत्रकारांची नावे आणि छायाचित्रांचाही वापर केला जात असल्याचे निदर्शनास येत आहे. भारत सरकारच्या RNI कडे अधिकृत नोंदणी नसतानाही वृत्तपत्राच्या नावाचा आभास निर्माण करून डिजिटल माध्यमातून बातम्या प्रसारित केल्या जात असल्यास त्याची गांभीर्याने दखल घेणे आवश्यक आहे.

**एआयचा वेग, खोटेपणाचा कहर**

पूर्वी बनावट बातमी तयार करण्यासाठी बराच वेळ लागत होता. आता एआयच्या माध्यमातून काही क्षणांत बातमी, मथळा, छायाचित्र आणि वृत्तपत्राचे पान तयार करता येते. परिणामी कोणती माहिती खरी आणि कोणती बनावट, हे सामान्य नागरिकांसाठी ओळखणे दिवसेंदिवस कठीण होत आहे. एखाद्या व्यक्तीचे नाव चुकीच्या पद्धतीने वापरून त्याची बदनामी करणे, बनावट छायाचित्र तयार करणे किंवा एखाद्या घटनेला वेगळे स्वरूप देणे सहज शक्य झाले आहे.

**पत्रकारितेच्या विश्वासावर थेट प्रहार-** अधिकृत माध्यमांनी केलेली पडताळणी, पत्रकाराची जबाबदारी आणि वृत्तसंस्थेची विश्वासार्हता या पत्रकारितेच्या मूलभूत बाबी आहेत. मात्र बनावट डिजिटल वृत्तपत्रांच्या माध्यमातून या संपूर्ण व्यवस्थेलाच बगल दिली जात असल्याने पत्रकारिता क्षेत्रात चिंता व्यक्त होत आहे. अशा बातम्या सोशल मीडियावर वेगाने पसरल्यास त्याचा सामाजिक आणि कायदेशीर परिणाम गंभीर होऊ शकतो.

**नियम कागदावर नव्हे तर कारवाईत दिसावेत**

एआयच्या गैरवापराला आळा घालण्यासाठी शासनाने स्पष्ट नियमावली तयार करावी. बनावट डिजिटल वृत्तपत्रांच्या नावाने मजकूर आणि छायाचित्रे प्रसारित करणाऱ्यांची जबाबदारी निश्चित करून संबंधित कायद्यांनुसार कारवाईची प्रभावी यंत्रणा उभारावी. तसेच अधिकृत वृत्तपत्र आणि बनावट डिजिटल प्लॅटफॉर्म यातील फरक नागरिकांना सहज ओळखता येईल, अशी पडताळणी व्यवस्था विकसित करण्याची गरज आहे.

**नागरिकांनीही व्हायरलला सत्य समजू नये**

सोशल मीडियावर एखादी बातमी दिसली म्हणून ती सत्य मानण्यापूर्वी संबंधित वृत्तपत्र, पत्रकार, अधिकृत संकेतस्थळ किंवा शासकीय विभागाकडून माहितीची पडताळणी करणे गरजेचे आहे. एआयच्या युगात बातमीचा वेग वाढला असला तरी सत्याची खात्री करण्याची जबाबदारी संपलेली नाही. बनावट पत्रकारितेला वेळीच लगाम न घातल्यास उद्या खऱ्या बातमीवरही अविश्वास निर्माण होण्याचा धोका आहे.

# अल्पवयीनाच्या हातात दुचाकी देणे पडले महागात

**हिंगणघाट जनमाध्यम :** अल्पवयीन मुलाच्या हातात दुचाकी देण्याचा प्रकार वाहनमालकाच्या चांगलाच अंगलट आला आहे. परवाना नसतानाही किशोरवयीन मुलाला दुचाकी चालविण्यास दिल्याप्रकरणी मित्राच्या वडिलांविरुद्ध हिंगणघाट पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

हिंगणघाट पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक महेश इटकल हे गस्तीवर असताना आंबेडकर चौकात अल्पवयीन मुलगा दुचाकी चालविताना आढळून आला. पोलिसांनी चौकशी केली असता त्याच्याकडे वाहन चालविण्याचा परवाना नसल्याचे स्पष्ट झाले. तसेच ही दुचाकी मित्राचे वडील इरफान खान मुस्तफा खान यांनी चालविण्यास दिल्याची माहिती समोर आली. अल्पवयीन मुलाच्या हातात वाहन देऊन त्याचा जीव आणि इतरांचा जीव धोक्यात घालण्याचा प्रकार समोर आल्यानंतर पोलिसांनी इरफान खान मुस्तफा खान यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला. या प्रकरणाचा पुढील तपास हिंगणघाट पोलिस करीत आहेत.

# शिवसेनेला धक्का; कैलास उपासे काँग्रेसच्या गोटात

## विरुळच्या राजकारणात नवी समीकरणे; जिल्हा काँग्रेस सचिवपदाची जबाबदारी



**विरुळ आकाजी जनमाध्यम :** विरुळच्या स्थानिक राजकारणात काँग्रेसने संघटनात्मक ताकद वाढविण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल टाकले आहे. येथील ग्रामपंचायत सदस्य कैलास उपासे यांनी शिवसेनेला रामराम ठोकत काँग्रेसमध्ये प्रवेश केला आहे. त्यांच्या कामाची दखल घेत काँग्रेसने त्यांच्यावर जिल्हा काँग्रेस सचिवपदाची जबाबदारी सोपविली आहे.

उपासे यांनी यापूर्वी शिवसेनेकडून पंचायत समितीची निवडणूक लढविली होती. या निवडणुकीत त्यांचा अवघ्या ५२ मतांनी पराभव झाला होता. मात्र, या निवडणुकीच्या माध्यमातून त्यांनी विरुळ परिसरातील आपली राजकीय पकड दाखवून दिली होती.


आता काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यानंतर त्यांच्याकडे जिल्हास्तरीय संघटनात्मक जबाबदारी आल्याने विरुळच्या राजकारणात काँग्रेसला नवी ताकद मिळण्याची चर्चा सुरू झाली आहे.

अनंत मोहड, धर्मपाल ताकसांडे, अनिरुद्ध वनकर, चंद्रशेखर जोरे, सुनील कोल्हे आणि सुधीर पांगुळ यांच्या मार्गदर्शनाखाली उपासे यांची नियुक्ती करण्यात आली.

नियुक्तीनंतर काँग्रेस कार्यकर्ते आणि समर्थकांकडून कैलास उपासे यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. आगामी काळात त्यांच्या नेतृत्वामुळे विरुळ परिसरात काँग्रेसची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# नशामुक्त समाज घडविण्यासाठी युवकांनी पुढे यावे- एसडीपीओ डॉ.वंदना कारखेले

### भिडी येथे गणेशोत्सवात लोकसंवाद कार्यक्रम



**वर्धा जनमाध्यम :** अमली पदार्थांचे सेवन हे व्यक्तीच्या आरोग्यासोबतच कुटुंब आणि समाजाच्या भवितव्यावरही गंभीर परिणाम करणारे आहे. युवक हे देशाची मोठी शक्ती असून त्यांनी व्यसनांपासून दूर राहून नशामुक्त समाजाच्या निर्मितीसाठी पुढाकार घ्यावा. युवकांनी स्वत: व्यसनमुक्त राहण्यासोबतच आपल्या मित्रपरिवारात आणि समाजातही नशाविरोधी जनजागृती करावी, असे आवाहन पुलगावच्या उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.वंदना कारखेले यांनी केले.

नवयुवक गणेशोत्सव मंडळ, भिडी येथे माहिती व जनसंपर्क विभाग आणि पोलीस विभागाच्या संयुक्त विद्यमाने लोकसंवाद कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते, त्यावेळी त्या बोलत होत्या. यावेळी देवळीचे ठाणेदार संदीप कापडे, एनसीसीचे मोहन गुजरकर, सेंटर समन्वयक जोसना वरघट, तालुका समन्वयक लक्ष्मी काकडे, जिल्हा माहिती कार्यालयाचे दिलीप बोंडसे यांच्यासह नवयुवक गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी, युवक आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. युवावस्थेत व्यसनाच्या आहारी जाण्याचे प्रमाण वाढू नये, यासाठी कुटुंब, शाळा-महाविद्यालये, सामाजिक संस्था तसेच युवक मंडळांनी एकत्रितपणे प्रयत्न करण्याची गरज आहे. अमली पदार्थांपासून दूर राहणे ही केवळ वैयक्तिक जबाबदारी नसून समाजाच्या सुरक्षित आणि निरोगी भविष्यासाठी आवश्यक बाब आहे. युवकांनी आपल्या परिसरातील व्यसनाधीन व्यक्तींना योग्य मार्गदर्शन करून त्यांना व्यसनमुक्तीच्या दिशेने आणण्यासाठी प्रयत्न करावेत, असे एसडीपीओ डॉ. वंदना कारखेले यांनी सांगितले. तसेच अमली पदार्थांच्या सेवनामुळे होणारे शारीरिक, मानसिक आणि सामाजिक दुष्परिणाम स्पष्ट केले. लोकसंवाद कार्यक्रमाच्या माध्यमातून नशामुक्ती, अमली पदार्थांचे दुष्परिणाम तसेच डिजिटल व आर्थिक व्यवहारातील सुरक्षितता याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली. एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी नशामुक्त युवा फॉर विकसित भारत या संकल्पनेवर आधारित नुक्कड नाटिका सादर केली.

**म्यूल अकाऊंट व बॅंकिंग लोकपालबाबत माहिती**

कार्यक्रमात सेंटर समन्वयक जोसना वरघट यांनी मनी म्यूल तसेच बॅंकिंग लोकपाल याबाबत माहिती दिली. ऑनलाइन आर्थिक व्यवहार करताना नागरिकांनी घ्यावयाची खबरदारी, अनोळखी व्यक्तींना बॅंक खात्याची माहिती, ओटीपी, पासवर्ड किंवा इतर गोपनीय माहिती न देणे तसेच आर्थिक फसवणूक झाल्यास तक्रार निवारणासाठी उपलब्ध असलेल्या यंत्रणांची माहिती त्यांनी

# पोलिस' म्हणत वृद्ध दाम्पत्याला लुटले; १.२५ लाखांचा ऐवज लंपास

## चोरीच्या भीतीचा बनाव करून रुमाल हिसकावला; रोख आणि सोन्याची अंगठी आणि १ लाख २५ हजारांचा ऐवज लंपास

**हिंगणघाट जनमाध्यम :** 'आम्ही पोलिस आहोत. परिसरात चोऱ्या वाढल्या आहेत. पैसे आणि दागिने सुरक्षित ठेवा,' असा बनाव करून दोन भामट्यांनी ७० वर्षीय वृद्ध आणि त्यांच्या पत्नीचा विश्वास संपादन केला. पोलिस असल्याचे भासवत आधी सुरक्षेचा सल्ला दिला आणि विश्वास बसताच हातचलाखीने रुमाल हिसकावून घेत रोख रक्कम आणि सोन्याची अंगठी असा तब्बल १ लाख २५ हजार रुपयांचा ऐवज घेऊन दुचाकीवरून पोबारा केला. नागपूर हिंगणघाट मार्गावरील रिमडोह परिसरात घडलेल्या या प्रकारामुळे वृद्ध नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

धुमनखेडा येथील पुंडलिक चिडे वय ७० आणि त्यांच्या पत्नी रेखा चिडे वय ६५ हे कामानिमित्त हिंगणघाट येथे आले होते. काम आटोपून दोघे दुचाकीने गावाकडे परतत असताना रिमडोह परिसरात मागून आलेल्या दोन दुचाकीस्वारांनी त्यांना अडविले. दोघांनी आपण पोलिस असल्याचे सांगून परिसरात चोऱ्या आणि लुटमारीच्या घटना वाढल्याचा बनाव केला. सोबतची रोख रक्कम आणि अंगावरील दागिने सुरक्षित ठेवण्याचा सल्ला देत त्यांनी वृद्ध दाम्पत्याचा विश्वास संपादन केला.

अनोळखी व्यक्तींनी पोलिस असल्याचे सांगितल्याने दाम्पत्याला संशय आला नाही. त्यांच्या सांगण्यावरून रोख रक्कम आणि सोन्याची अंगठी रुमालात ठेवण्यात आली. नेमका हाच क्षण साधत भामट्यांनी हातचलाखी केली आणि रुमाल हिसकावून घेतला. काही कळण्याच्या आत दोन्ही आरोपी दुचाकीवरून पसार झाले.

घडलेल्या प्रकाराने हादरलेल्या चिडे दाम्पत्याने तातडीने पोलिसांकडे धाव घेतली. या प्रकरणी हिंगणघाट पोलिस ठाण्यात अज्ञात आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून आरोपींचा शोध सुरू आहे. पोलिस असल्याचा बनाव करून वृद्ध नागरिकांना लक्ष्य करणाऱ्या टोळीचा छडा लावण्याचे आव्हान पोलिसांसमोर उभे ठाकले आहे.

# ग्रामसेवकांची मनमानी थांबवा; कामगारांना प्रमाणपत्र द्या

## शासन स्पष्ट, मग ग्रामपंचायतींचा संभ्रम कशाला

### उमेश अग्निहोत्री यांच्या पाठपुराव्याला यश

**वर्धा जनमाध्यम :** बांधकाम कामगारांच्या ९० दिवसांच्या कामाच्या प्रमाणपत्रावरून सुरू असलेला संभ्रम अखेर शासनाने दूर केला आहे. ग्रामीण भागातील पात्र बांधकाम कामगारांना प्रमाणपत्र देताना ग्रामसेवकांकडून होणारी टाळाटाळ आणि नकाराच्या तक्रारींची दखल घेत ग्रामविकास विभागाने ३ ऑगस्ट २०२६ रोजी महत्त्वपूर्ण पत्र काढले आहे. २२ सप्टेंबर २०१७ रोजीच्या परिपत्रकातील सूचना कायम असल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे.

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या योजनांचा लाभ घेण्यासाठी ९० दिवसांच्या कामाचे प्रमाणपत्र महत्त्वाचे आहे. मात्र २०१७ चे परिपत्रक २३ सप्टेंबर २०२१ च्या शासन निर्णयामुळे अधिक्रमित झाल्याचा गैरसमज झाल्याने काही ग्रामपंचायतींमध्ये प्रमाणपत्रावर स्वाक्षरी करण्यास टाळाटाळ करण्यात आली. परिणामी पात्र कामगार योजनांच्या लाभापासून वंचित राहण्याची वेळ आली.

या प्रश्नावर स्वाभिमानी बांधकाम कामगार संघटनेचे अध्यक्ष उमेश अग्निहोत्री यांनी ग्रामविकास विभागाकडे सातत्याने तक्रारी आणि निवेदने देत पाठपुरावा केला. त्यानंतर शासनाने २०१७ च्या परिपत्रकातील सूचना कायम असल्याचे स्पष्ट केले आहे. ८ एप्रिल २०२५ च्या बैठकीचाही पत्रात संदर्भ देण्यात आला आहे.

शासनाने भूमिका स्पष्ट केली असली तरी आता प्रत्यक्ष अंमलबजावणीचे आव्हान आहे. जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी सर्व ग्रामसेवकांना स्पष्ट लेखी आदेश देऊन पात्र कामगारांना ९० दिवसांचे प्रमाणपत्र देण्याची प्रक्रिया तातडीने सुरळीत करावी, अशी मागणी अग्निहोत्री यांनी केली आहे.

शासनाने संभ्रम दूर केला आहे. आता ग्रामपंचायत स्तरावर टाळाटाळ खपवून घेतली जाणार नाही. पात्र कामगारांना त्यांचा हक्क मिळालाच पाहिजे, असे अग्निहोत्री यांनी स्पष्ट केले.

# एफडीच्या नावाखाली साडेपाच लाखांचा घोटाळा

**हिंगणघाट जनमाध्यम :** एफडीच्या नावाखाली ग्राहकाकडून घेतलेली तब्बल ५ लाख ६० हजार रुपयांची रक्कम मुदत संपल्यानंतरही परत न करता अपहार केल्याचा धक्कादायक प्रकार हिंगणघाटमध्ये समोर आला आहे. या प्रकरणी यादगार महिला नागरी सहकारी पतसंस्था निधी लिमिटेडच्या अध्यक्ष उपाध्यक्ष व्यवस्थापक आणि संचालकांसह आठ जणांविरुद्ध हिंगणघाट पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.

**रक्कम परत करण्याऐवजी पतसंस्थेचा गाशा गुंडाळला; अध्यक्ष उपाध्यक्ष व्यवस्थापकांसह आठ जणांवर गुन्हा**

वीर भगतसिंग वॉर्डातील शेख रोशन शेख अकबर यांनी पोलिसांत तक्रार दिली. श्रीराम टॉकीज कॉम्प्लेक्समधील पतसंस्थेत अध्यक्ष शेख इशाख शेख युसूफ यांच्या सांगण्यावरून त्यांनी स्वतःच्या नावावर २ लाख रुपये पत्नीच्या नावावर २ लाख रुपये दोन मुलांच्या नावावर प्रत्येकी ५० हजार रुपये आणि तिसऱ्या मुलाच्या नावावर ६० हजार रुपये अशा एकूण ५ लाख ६० हजार रुपयांच्या एफडी केल्या.

एफडीची मुदत पूर्ण झाल्यानंतर २९ मे २०२३ रोजी रक्कम काढण्यासाठी गेलेल्या शेख रोशन यांना संस्थेकडे पैसे उपलब्ध नसल्याचे सांगण्यात आले. काही दिवसांत रक्कम देण्याचे आश्वासन देण्यात आले. मात्र दिवस गेले तरी रक्कम मिळाली नाही. त्यानंतर पतसंस्थाच बंद पडल्याने आपली मेहनतीची रक्कम अडकल्याचे त्यांच्या लक्षात आले. या प्रकरणी फसवणूक व अपहाराचा आरोप करत शेख रोशन यांनी पोलिसांत धाव घेतली. त्यांच्या तक्रारीवरून अध्यक्ष शेख इशाख शेख युसूफ उपाध्यक्ष रेहान युसूफ शेख सचिन गुलनान आसीफ व्यवस्थापक शेख साहील ईशाख शेख संचालक मनोज रमेश खोंडे मोहम्मद इमरान मुस्ताक अहमद रंकरेज तनवीर खलील शेख आणि आसीफ याकुब शेख यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. प्रकरणाचा पुढील तपास हिंगणघाट पोलिस करीत आहेत.

# शेतकऱ्यांच्या अश्रूंना कृषी अधिकाऱ्यांच्या वेतनाची साथ

## दुष्काळाच्या झळा तीव्र ; कृषी विभागातील ३०० अधिकारी-कर्मचारी देणार एक दिवसाचे वेतन

**वर्धा जनमाध्यम :** निसर्गाने पाठ फिरवली आणि शेतकऱ्यांच्या डोळ्यांसमोर उभे पीक करपू लागले. अल्प पर्जन्यमान आणि पावसाच्या प्रदीर्घ खंडामुळे जिल्ह्यासह राज्यावर कोरड्या दुष्काळाचे संकट गडद होत असताना हवालदिल शेतकऱ्यांच्या मदतीसाठी कृषी विभागातील अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी पुढाकार घेतला आहे. जिल्ह्यातील सुमारे ३०० अधिकारी आणि कर्मचारी आपले एक दिवसाचे वेतन दुष्काळग्रस्तांच्या मदतीसाठी देणार आहेत.

जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी अरविंद उपरिकर यांच्या नेतृत्वात हा निर्णय घेण्यात आला आहे. पावसाने दडी मारल्याने जलाशयांमध्ये अपेक्षित पाणीसाठा झालेला नाही. अनेक भागांत पिकांना पाण्याची टंचाई भेडसावत असून उभ्या पिकांवर करपण्याची वेळ आली आहे. त्यामुळे यंदाच्या खरीप उत्पादनावर मोठा परिणाम होण्याची शक्यता आहे.

# कर्जमाफीचे नाव यादीत, पण KYC च्या कचाट्यात शेतकरी

## फारमर आयडीच पोर्टलवर गायब

**विरूळ आकाजी जनमाध्यम :** मोठा गाजावाजा करून शासनाने अहिल्याबाई होळकर कर्जमाफी योजना लागू केली. पहिल्या आणि दुसऱ्या यादीत अनेक शेतकऱ्यांची नावे झळकली. काहींच्या खात्यावर कर्जमाफीची रक्कम जमा झाली. मात्र अनेक पात्र शेतकरी अद्याप ख्म्ण च्या तांत्रिक अडचणीत अडकले आहेत.

शेतकऱ्यांनी फारमर आयडी काढूनही कर्जमाफीची ख्म्ण करण्यासाठी पोर्टलवर गेल्यानंतर अनेकांचे फारमर आयडीच दिसत नसल्याची तक्रार आहे. त्यामुळे यादीत नाव असूनही ख्म्ण पूर्ण होत नाही आणि कर्जमाफीची रक्कम खात्यावर जमा होण्यास अडथळा निर्माण झाला आहे. शासनाकडून मागील आठवड्यात दुसरी यादी जाहीर करण्यात आली. मात्र त्यातील काही पात्र शेतकऱ्यांच्या खात्यावर अद्याप रक्कम जमा झालेली नसल्याचेही समोर आले आहे. दरम्यान आता तिसऱ्या यादीची प्रतीक्षा सुरू झाली आहे. पहिल्या आणि दुसऱ्या यादीत नाव न आलेले पात्र शेतकरीही कर्जमाफीच्या प्रतीक्षेत आहेत. त्यामुळे पोर्टलवरील फारमर आयडीची तांत्रिक समस्या तातडीने दूर करून पात्र शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ मिळवून द्यावा अशी मागणी होत आहे.

**अधिकाऱ्यांचे हात वर, शेतकरी मात्र कर्जमाफीच्या प्रतीक्षेत**

कर्जमाफीच्या यादीत नाव नाही म्हणून शेतकरी निबंधक कार्यालयात धाव घेत आहेत. मात्र अधिकारीच आम्ही काहीच करू शकत नाही, असे उत्तर देत असल्याने संताप व्यक्त होत आहे. किमान शेतकऱ्याचे नाव कुठे अडले, फारमर आयडीची अडचण नेमकी काय आहे, याची माहिती घेणे अधिकाऱ्यांचे कर्तव्य नाही का, असा प्रश्न उपस्थित होत आहे. काजू किसमिस खाऊन अधिकारी जब्बर झाले आहेत का, असा संतप्त सवाल शेतकऱ्यांकडून उपस्थित केला जात आहे. पहिली यादी गेली, दुसरीही गेली, आता तिसऱ्या यादीची प्रतीक्षा कायम आहे.

**नावात बदल**

माझे पासपोर्ट नंबर **P1246674** वरील माझे **MOHMMAD IRSHAD** असे नाव होते. माझ्या पॅन कार्ड व आधार कार्ड वरील **MOHAMMAD IRSHAD SHEIKH HAMID** नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता:** वॉर्ड नं ४ ड्रीमलॅंड सिटी सावंगी मेघे वर्धा ४४२००१

**नावात बदल**

माझे पूर्वी **NAJMUNNISA BEGUM MO. SHARIF MO. SHAFI ANSARI** असे नाव होते. माझ्या आधार कार्ड वरील **NAJMUNNISA ASLAMKHAN PATHAN** नाव नमूद असून, या नावाने ओळखले जात आहे.

**पत्ता:**
वॉर्ड नं १६ मालगुजारीपुरा वर्धा

जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# देशात गत 17 वर्षातील सर्वात कोरडा मान्सून

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** देशात यंदा मान्सूनचा पाउस सरासरीपेक्षा १५% कमी झाला आहे. गेल्या १७ वर्षांतील हा सर्वात कमी आकडा आहे. यापूर्वी २००९ मध्ये पावसात १८.३ऽ घट नोंदवण्यात आली होती.यंदा पावसातील कमतरतेचे मुख्य कारण अल निनो मानले जात आहे. १ जून ते २१ सप्टेंबर या कालावधीत झालेला ८२७.२ मिमी पाउस सामान्य मानला जातो. पण आतापर्यंत केवळ ७०३.७ मिमी पाउस झाला आहे. म्हणजेच १२३.५ मिमीची कमतरता आहे. ३० सप्टेंबरपर्यंत संपूर्ण हंगामासाठी सामान्य पाउस ८६८.६ मिमी असतो. हंगाम संपायला ९ दिवस बाकी आहेत. मात्र, आता १५ऽ ची कमतरता भरू न निघेल एवढा पाउस होण्याची शक्यता नाही. कारण, देशाच्या वायव्य भागातून मान्सून वेगाने परतत आहे.



१९ सप्टेंबर रोजी पश्चिम राजस्थानातून मान्सूनच्या परतीला सुरुवात झाली होती. सोमवारी पंजाब, हरियाणाचा निम्मा भाग आणि राजस्थानच्या आणखी काही भागांतून मान्सून परतला. पुढील २४-४८ तासांत हरियाणाचा उर्वरित भाग, दिल्ली, पश्चिम उत्तर प्रदेशासह जम्मू-काश्मीर, लडाख, हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमधूनही मान्सून परतण्याची परिस्थिती निर्माण झाली आहे. मात्र, बंगालच्या उपसागरात एक प्रणाली विकसित झाली असून ती खोल दाबाच्या क्षेत्रात (डीप डिप्रेशन) रूपांतरित होत आहे.ती २४ ते ३६ तासांत ओडिशा आणि आंध्र प्रदेशाच्या किनायावर धडकू शकते. यामुळे देशाच्या पूर्व, मध्य आणि दक्षिणेकडील राज्यांमध्ये पुढील तीन-चार दिवस मुसळधार पाउस पडण्याची शक्यता आहे.

**अल निनो म्हणजे काय?**

प्रशांत महासागराच्या विषुववृत्तीय क्षेत्रात समुद्रावरील वारे कमकुवत पडतात, तेव्हा दक्षिण अमेरिकेच्या किनायाजवळील पाणी असामान्यपणे गरम होउ लागते. समुद्राचे पाणी गरम होण्याला अल निनो म्हणतात. यामुळे जागतिक वारे आणि ढगांच्या पद्धती बदलून जगभरातील हवामान विस्कळीत होते.

**जलाशयांत गेल्या वर्षीपेक्षा २१% कमी पाणी-** ऑगस्टपर्यंत खरीप पेरणी १.७% कमी होती. आयसीआरएच्या मते, लागवड क्षेत्र २% ने घटू शकते. कमी पाउस, अधिक तापमान आणि अल निनोमुळे जमिनीतील ओलावा कमी झाला आहे. त्यामुळे उत्पादन घटेल. तज्ज्ञांच्या अंदाजानुसार, तांदळाचे उत्पादन १ कोटी टनांनी घटून १४.४ कोटी टनांवर येउ शकते. म्हणजेच गेल्या वर्षीच्या तुलनेत ६.५% कमी.

**रबी राम भरोसे-** रबीची पेरणी ऑक्टोबरपासून सुरू होईल. सुरुवातीच्या सिंचनासाठी पाण्याची उपलब्धता कमी आहे. उत्तर आणि दक्षिण भारतातील जलसाठ्यातील घट ही रब्बी हंगामासाठी जोखीम असल्याचे आयसीआरएने म्हटले आहे. गहू, हरभरा यांसारख्या पिकांवर दबाव वाढेल. १७८ प्रमुख जलाशयांमध्ये १३१.१७ अब्ज घनमीटर पाणी आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत हे प्रमाण २१% कमी आहे. यामुळे वीज क्षेत्रावर दोन परिणाम होतील. पहिला, वीजपुरवठ्यात जलविद्युतचा वाटा कमी होण्याचा धोका आहे. दुसरा, विजेची मागणी वाढेल.

# मराठवाड्यात 1972 च्या दुष्काळापेक्षा भीषण स्थिती

**छ. संभाजीनगर / प्रतिनिधी-** राज्यात ब-याच भागात यंदा पाउस चांगला झाल्याचा दावा केला जात असला तरी मराठवाडा आणि विदर्भाकडे पावसाळ्याच्या सुरु वातीपासून पावसाने पाठ फिरविली. आधून-मधून जेमतेम पाउस झाला. त्यामुळे पिके वाढली. परंतु पिके ऐन फुलो-यात असतानाच पाउस गायब झाला. त्यामुळे पिके वाढली तरी सोयाबीनच्या शेंगांची वाढच झाली नाही. ब-याच ठिकाणी तर जागेवरच पिके करपली. त्यामुळे संपूर्ण खरीप हंगामच धोक्यात आला आहे.



आता या दुष्काळाची तुलना १९७२ च्या दुष्काळाशी केली जात आहे. परंतु यंदा त्यापेक्षा भीषण स्थिती आहे. कारण आता शेतीखर्च प्रचंड वाढला आहे. अशा स्थितीत एकही हंगाम हातातून गेल्यास शेतकरी अभूतपूर्व संकटात सापडण्याचा धोका आहे. त्यामुळे चिंता अधिक वाढली आहे.

१९७२ चा दुष्काळही भीषण होता. त्यावेळी अन्नधान्याची मारामार असल्याने खडी फोडून कामाच्या मोबदल्यात सुकडी खावून लोक जगले. त्यावेळीही असाच उशिरा पाउस आला होता.त्यामुळे शेतीपिके हाती लागली नव्हती. उशिरा पाउस झाल्यावर झाडपाला खाउन वेळ निभावून न्यावी लागली. परंतु त्यावेळी शेती खर्च जेमतेम होता. त्या तुलनेत आता शेती खर्च प्रचंड वाढला आहे. मिळणा-या उत्पन्नाच्या आशेने शेतक-यांनीही शेतीची मशागत आणि पेरणी, कोळपणीसह खत, किटकनाशक औषधीसाठी प्रचंड खर्च केलेला आहे. परंतु खरीप पिकेच करपून गेल्याने आता शेतक-यांना अभूतपूर्व संकटाचा सामना करावा लागत आहे. त्यातच अद्याप मोठा पाउसच झाला नसल्याने नद्या, ओढे, प्रकल्प कोरडेठाक पडत आहेत. त्यामुळे पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही अत्यंत गंभीर बनण्याची चिन्हे आहेत.

१९७२ चा दुष्काळ अनुभवलेल्या ज्येष्ठ शेतक-यांच्या मते त्यावेळी पाउस कमी होता. त्यामुळे पेरण्या उशिरा झाल्या होत्या. त्यानंतर चांगला पाउस झाला. त्यामुळे त्यावेळी पाण्याची टंचाई नव्हती. सर्वत्र पाणी उपलब्ध होते. परंतु अन्नधान्याची टंचाई होती. त्यामुळे शेतात येणा-या पिकाचा आधार घेउन सरकारी मदतीवर लोकांनी दिवस काढले. परंतु त्यावेळी गरजा मर्यादित असल्याने वेळ निभावून गेली. आता महागाई प्रचंड वाढली आहे. शेतीखर्चही भरमसाठ झाला आहे. त्यामुळे शेतकरी भीषण संकटात सापडला आहे.सध्या राज्यात अधिकृतपणे कोणत्याही जिल्ह्यात किंवा तालुक्यात दुष्काळ जाहीर झालेला नाही. मात्र, अनेक भागांतील पावसाचा खंड, पिकांची स्थिती, पाणी उपलब्धता आणि चा-याची परिस्थिती यांचा आढावा घेतला जात आहे. कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी ३० सप्टेंबरनंतर परिस्थितीचा आढावा घेउन ५ ऑक्टोबरपर्यंत निर्णय होण्याची शक्यता व्यक्तकेली आहे.

थेट दाणा भरण्याच्या अवस्थेत पिके करपली

पावसाअभावी सोयाबीन, कापसासह मका, बाजरी, मूग, मठ आणि कपाशी यांसारखी पिके दाणा भरण्याच्या अवस्थेतच करपल्याचा दावा स्थानिक शेतकरी करीत आहेत. जोरदार पाउस झाला तरी काही पिकांपासून अपेक्षित उत्पादन मिळणे कठीण असल्याचे शेतक-यांचे म्हणणे आहे.

**चारा, पाण्याचेही आता भीषण संकट**

पाण्याच्या उपलब्धतेनुसार काही भागांत हिरवळ दिसत आहे किंवा चांगल्या जमिनीत शेत शिवारात पिकेही दिसत आहेत. परंतु पावसाअभावी या पिकांना लागणच नाही आणि जिथे लागण झालेली आहे. त्याची वाढच झालेली नाही. त्यामुळे शेती उत्पन्न हाती लागण्याची शक्यता नाही. त्यातच चारादेखील काही दिवस पुरेल इतकाच आहे. तसेच प्रकल्पांतील पाणीही तळाला गेले आहे. त्यामुळे पुढील काळात चारा आणि पाण्याच्या पाण्याचे भीषण संकट उद्भवू शकते.

# समुद्रातील तापमान 3.05 अंशाने वाढले

**कोस्टा रिका /वृत्तसंस्था :** एल निनोने पॅसिफिक महासागरात एक नवीन ऐतिहासिक विक्रम प्रस्थापित केला आहे. या प्रदेशात समुद्राच्या पृष्ठभागाचे सरासरी तापमान सामान्यपेक्षा ३.०५ अंश सेल्सिअसने वाढले आहे. १९९१-२०२० च्या सरासरीच्या तुलनेत, हे आतापर्यंत नोंदवलेले सर्वाधिक दैनिक तापमान आहे. एल निनोने इतिहासातील सर्वोच्च तापमान ३.०४७ अंश सेल्सिअसवर पोहोचवले आहे आणि आपत्ती अटळ आहे असा इशारा संशोधकांनी दिला आहे.एल निनोने समुद्राच्या पृष्ठभागाच्या तापमानाचा इतिहासातील सर्वोच्च विक्रम नोंदवला आहे. पारा ३.०५ अंश सेल्सिअसने वाढला आहे. तो आणखी वाढू शकतो. यामुळे आता जगाची चिंता वाढली आहे. यापूर्वीचा विक्रम नोव्हेंबर २०१५ मध्ये अंदाजे ३.०२ अंश सेल्सिअस होता. यावेळी, ही पातळी सामान्यपेक्षा दोन महिने आधी, सप्टेंबरमध्ये गाठली गेली. शास्त्रज्ञांच्या मते, ही एल निनो घटना अजूनही तीव्र होत आहे आणि डिसेंबरपर्यंत ती आपल्या शिखरावर पोहोचू शकते. एल निनो ही एक नैसर्गिक हवामान घटना आहे, ज्यामध्ये पूर्व आणि मध्य पॅसिफिक महासागराचे पाणी सामान्यपेक्षा जास्त वाढते.वा-यांमधील बदलांमुळे हे घडते. गरम पाण्यामुळे बाष्पीभवन वाढते, ज्यामुळे जागतिक हवामानावर परिणाम होतो. ही घटना नउ महिन्यांपूर्वी पश्चिम पॅसिफिकमधील वा-यांमधील बदलांमुळे सुरू झाली आणि हळूहळू सुपर एल निनोच्या पातळीवर पोहोचली आहे. निनो ३.४ प्रदेश हा पॅसिफिक महासागराचा एक भाग आहे, जिथे एल निनोची तीव्रता तपासण्यासाठी तापमान मोजले जाते. ३.०५ अंश सेल्सिअस हे आधुनिक नोंदींमधील सर्वोच्च तापमान आहे. याने



१९८२, १९९७ आणि २०१५ सारख्या तीव्र घटनांना मागे टाकले आहे.काही अंदाज तर याची तुलना १८७७ च्या ऐतिहासिक घटनेशी करत आहेत, ज्यामुळे मोठ्या प्रमाणावर दुष्काळ आणि उपासमार झाली होती. म?डेल्सनुसार, मासिक सरासरी तापमान याहूनही जास्त असू शकते. काही अंदाजानुसार कमाल तापमान ४ अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचण्याची शक्यता आहे.हा विक्रम महत्त्वपूर्ण आहे कारण एल निनो, हवामान बदलासोबत मिळून, त्याचा परिणाम अधिक तीव्र करू शकतो. वाढत्या तापमानाच्या जगात, समुद्राचे तापमान आधीच जास्त आहे, ज्यामुळे नवीन घटना अधिक तीव्र होतात. शास्त्रज्ञ दररोज माहितीचे निरीक्षण करत आहेत, कारण दैनंदिन माहितीमध्ये चढ-उतार होत असतो. एल निनोचे परिणाम प्रदेशानुसार वेगवेगळे असतात. या हिवाळ्यात अमेरिकेवर सर्वाधिक परिणाम होण्याची शक्यता आहे. उत्तरेकडील प्रदेशात सामान्यपेक्षा जास्त तापमान आणि पश्चिम-मध्य भागात अधिक हिमवृष्टी होउ शकते. दक्षिण अमेरिकेत, पेरू आणि चिलीमध्ये आधीच मुसळधार पाउस आणि पूरस्थिती आहे.

**दुष्काळ वाढणार-** मध्य अमेरिका आणि कॅरिबियनमध्ये दुष्काळ वाढू शकतो, ज्यामुळे पिकांवर परिणाम होईल. आशियामध्ये, भारतासह अनेक देशांमध्ये म?न्सून कमकुवत होउ शकतो. इंडोनेशियामध्ये वणवे आणि धूर वाढू शकतो. ऑस्ट्रेलियामध्ये दुष्काळाची परिस्थिती अधिक गंभीर होउ शकते. आफ्रिकेच्या काही भागांमध्ये पावसाचे स्वरूपही बदलू शकते. एकूणच, पूर, दुष्काळ, उष्णतेची लाट आणि वादळे यांसारख्या घटनांचा धोका वाढतो.

**हवामान प्रणालीवरील दबाव**

काही भागांमध्ये विक्रमी तापमान आणि वादळे आधीच नोंदवली गेली आहेत. हवामान संस्था सतत निरीक्षण करत आहेत. एल निनो हा एका नैसर्गिक चक्राचा भाग आहे, परंतु त्याची तीव्रता चिंतेचे कारण आहे. विक्रमी पातळीवर पोहोचल्यामुळे, जागतिक हवामान प्रणालीवरील दबाव स्पष्टपणे दिसून येत आहे. शास्त्रज्ञ येत्या काही महिन्यांत अधिक माहितीची वाट पाहत आहेत. मात्र, सध्याचे बदल चिंताजनक असल्याचा इशारा संशोधकांनी दिला आहे.

# गुजरातच्या सीमेवरून देशात ड्रग्जची तस्करी

चंदिगड : पंजाबचे अर्थमंत्री हरपाल सिंह चीमा यांनी भाजपवर गंभीर आरोप केले आहेत. गुजरातच्या सीमेवरून देशात अमली पदार्थ येत असून त्यामध्ये भाजपचा सहभाग असल्याचा आरोप चीमा यांनी केला आहे. आज संपूर्ण देशाला माहिती आहे



की गुजरातच्या सीमेवरून देशभरात अमली पदार्थ येत आहेत. संपूर्ण भाजप त्यात सहभागी आहे आणि देशातील तरु णांना अमली पदार्थांच्या आहारी लोटत आहे. आधी तरु णांना अमली पदार्थांच्या विळख्यात ढकलायचे आणि नंतर अमली पदार्थ संपवण्याचा दिखावा करायचा असा आरोप हरपाल सिंह चीमा यांनी केला. पंजाबमधील अमली पदार्थांच्या परिस्थितीवर बोलताना चीमा यांनी २००७ ते २०१७ या काळातील अकाली दल-भाजप सरकारवरही निशाणा साधला. या काळात पंजाबमध्ये अमली पदार्थांचा प्रश्न मोठ्या प्रमाणात वाढला होता, असा दावा त्यांनी केला.ज्यांनी अमली पदार्थ पसरवले, तेच आता अमली पदार्थ संपवण्याची भाषा करत आहेत असे चीमा म्हणाले. दरम्यान, पंजाबमध्ये मुख्यमंत्री गेल्या चार वर्षांपासून अमली पदार्थांविरोधात सातत्याने काम करत असल्याचा दावा चीमा यांनी केला. त्यांच्या सरकारच्या काळात पंजाबमधील अमली पदार्थांचे संकट जवळपास संपुष्टात आले असल्याचेही त्यांनी म्हटले.

# पाक-अफगाणमध्ये तणाव वाढला

**काबूल/वृत्तसंस्था :** अफगाणिस्तानच्या कुनार प्रांतात पाकिस्तानी सैन्याने केलेल्या हवाई हल्ल्यात अमेरिकेच्या जीबीयू-१२ पेववे २ लेझर-गाईडेड बाम्बचा वापर झाल्याचा संशय आहे. हा दावा अफगाण सूत्रांच्या आणि बाम्बच्या अवशेषांच्या तपासणीच्या आधारे केला जात आहे. या हल्ल्यात नागरिकांच्या जीवितहानीचे वृत्त आहे.



प्रकाशित छायाचित्रांमध्ये बाम्बचे अवशेष दिसत आहेत, ज्यावर एमके ८२ फिन गाईडेड बाम्बवर वापरासाठी आणि ९६२१४ हा कोड अशा खुणा आहेत. या खुणा पेववे गायडन्स सिस्टीमच्या कुटुंबाशी आणि रेथियान कंपनीशी संबंधित असल्याचे मानले जाते. जीबीयू-१२ पेववे २ हा सामान्यतः वापरल्या जाणा-या एमके-८२ बाम्बवर आधारित एक लेझर-मार्गदर्शित बाम्ब आहे. त्याचे वजन अंदाजे २२७ किलोग्रॅम आहे. याची एकूण लांबी अंदाजे ३.३ मीटर आणि व्यास अंदाजे २७ सेंटीमीटर आहे.लेझर गायडन्स किटमुळे अचूक मारा करणे शक्य होते. लक्ष्यावर लेझरने खूण केली जाते आणि ब?म्ब त्या संकेतानुसार जातो. हा बाम्ब अनेक देशांच्या हवाई दलाच्या शस्त्रागारात समाविष्ट आहे आणि विविध संघर्षांमध्ये त्याचा वापर केला गेला आहे.अवशेषांच्या छायाचित्रांमुळे जीबीयू-१२ असण्याची शक्यता निर्माण झाली आहे, परंतु तज्ञांचे म्हणणे आहे की केवळ भागांची ओळख पटल्याने संपूर्ण ब?म्ब आणि त्याच्या उगमाची पुष्टी होत नाही. स्वतंत्र चौकशीची मागणी केली जात आहे. पाकिस्तानने या हल्ल्यांना दहशतवादी लक्ष्यांवरील कारवाई म्हटले आहे, तर अफगाण बाजूने त्यांना नागरी भागांवरील हल्ले म्हटले आहे. अमेरिकेने पाकिस्तान आणि इतर देशांना अशी शस्त्रे पुरवली आहेत. लेझर-गाईडेड बाम्बमुळे अचूकता वाढते हे सर्वश्रु त आहे, परंतु दाट लोकवस्तीच्या भागात त्यांच्या वापरामुळे नागरिकांच्या जीवितहानीचा धोका असतो. अवशेषांची चौकशी सुरू आहे. सीमापार हवाई हल्ले हे दोन्ही देशांमधील तणावाचे एक सततचे कारण राहिले आहे. शस्त्रांच्या उगमाबद्दल आणि वापराविषयीचे दावे अनेकदा वादग्रस्त ठरतात. जीबीयू-१२ सारख्या प्रणाली आधुनिक हवाई युद्धाचा एक भाग आहेत. सध्या, हे दावे छायाचित्रे आणि तांत्रिक जुळवणीवर आधारित आहेत. संपूर्ण सत्य समोर येण्यासाठी सखोल चौकशीची प्रतीक्षा आहे.

# बागेश्वर बाबांनी पुत्रयोग लिहिला, पण चौथ्यांदाही झाली मुलगी

## धीरेंद्र शास्त्रींना अंनिसचे 1 कोटींचे आव्हान

**झांशी /वृत्तसंस्था-** प्रसिद्ध कथाकार आणि बागेश्वर धामचे प्रमुख धीरेंद्र कृष्ण शास्त्री पुन्हा एकदा वादाच्या भोव-यात सापडले आहेत. मुलगाच होईल असा दावा करून १० वर्षांनंतर बाळाचे नियोजन करायला लावले, परंतु शेवटी चौथीही मुलगीच झाल्याने आपली फसवणूक



झाल्याचा गंभीर आरोप उत्तर प्रदेशातील एका भक्ताने केला आहे. याप्रकरणी पीडित भक्ताने अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीकडे धाव घेतली आहे.उत्तर प्रदेशातील झांशी येथील मगरवाडा भागातील रहिवासी असलेले राजेंद्र कुमार हे मार्च २०२४ पासून बागेश्वर धाम येथे जात होते. मे २०२४ मध्ये बागेश्वर शास्त्री यांनी राजेंद्र कुमार यांना बोलावून त्यांच्या नावाची पर्ची काढली. त्या पर्चीमध्ये पत्नीला प्रेतबाधा असून २१ पेशी करावी लागेल, त्यानंतर पुत्रयोग बनेगा असा दावा लिखित स्वरूपात करण्यात आला होता.या दाव्यावर विश्वास ठेवून राजेंद्र कुमार यांनी १० वर्षांनंतर पुन्हा बाळाचे नियोजन केले. मात्र, नुकताच त्यांच्या पत्नीने एका मुलीला जन्म दिला. आधीच तीन मुली असताना, बाबांच्या दाव्यानंतर चौथीही मुलगीच झाल्याने आपली आर्थिक व मानसिक फसवणूक झाल्याचे राजेंद्र कुमार यांचे म्हणणे आहे.

**अंनिसचे १ कोटींचे आव्हान-** आपल्यासारखी फसवणूक इतर कोणाचीही होउ नये, या उद्देशाने राजेंद्र कुमार यांनी अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे संघटक हरीश देशमुख यांच्याशी संपर्क साधून तक्रार नोंदवली. या घटनेनंतर अंनिसने आक्रमक भूमिका घेतली आहे. बागेश्वर शास्त्री यांनी आपले कथित चमत्कार वैज्ञानिक पद्धतीने सिद्ध करून दाखवावेत, आम्ही त्यांना १ कोटी रु पयांचे बक्षीस देउ, असे थेट आव्हान अंनिसच्या पदाधिका-यांनी दिले आहे. तसेच, अशा प्रकारच्या भ्रामक दाव्यांवर विश्वास न ठेवण्याचे आवाहनही अखिल भारतीय अंधश्रद्धा निर्मूलन समितीने केले आहे. आता या प्रकरणात आणखी माहिती माहिती समोर येणार? हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे. धीरेंद्र कृष्ण शास्त्री हे मध्य प्रदेशातील छतरपूर जिल्ह्यातील बागेश्वर धाम येथील कथावाचक म्हणून प्रसिद्ध आहेत.

# दिवाळीपूर्वीच महागाईचा बॉम्ब फुटणार

**नवी दिल्ली/वृत्तसंस्था :** दसरा आणि दिवाळीपूर्वी देशात खाद्यतेलाच्या किमती वाढू शकतात. वाढत्या आयात खर्चामुळे कंपन्यांच्या नफयावर दबाव येत आहे. परिणामी, खाद्यतेल कंपन्या अंदाजे ७-८% दरवाढीचा विचार करत आहेत. सुधारित पुरवठा आणि आयात शुल्कात संभाव्य कपात यामुळे ही वाढ मर्यादित राहू शकते.




जर कंपन्यांनी किमती वाढवल्या, तर मार्च महिन्यापासून खाद्यतेलाच्या किमती वाढण्याची ही तिसरी वेळ असेल. फायनान्शियल एक्सप्रेसच्या वृत्तानुसार, कंपन्यांनी यापूर्वी मार्च ते जून दरम्यान दोन टप्प्यांत अंदाजे ५-६% दरवाढ केली होती, ज्यामुळे त्या काळात खाद्यतेलाच्या किमतीत एकूण १०-१२% वाढ झाली होती. तज्ज्ञांच्या मते, कच्च्या खाद्यतेलाच्या दरात अंदाजे ८-११% वाढ झाली आहे. त्यामुळे, कंपन्यांना या वाढीव खर्चाचा काही भाग ग्राहकांवर टाकावा लागू शकतो. त्यांनी सांगितले की दरवाढीची वेळ आणि प्रमाण हे बाजारातील मागणी आणि पुरवठ्याच्या परिस्थितीवर अवलंबून असेल.

उद्योगाच्या मते, येत्या काही दिवसांत कच्च्या खाद्यतेलाची वाहतूक करणा-या जहाजांची संख्या वाढण्याची शक्यता आहे. यामुळे बाजारातील पुरवठा आणि साठ्याची परिस्थिती सुधारू शकते. जर देशांतर्गत बाजारात तेलाची उपलब्धता वाढली, तर वाढलेल्या आंतरराष्ट्रीय खर्चाचा संपूर्ण भार ग्राहकांवर टाकण्याचा कंपन्यांवरील दबाव काही प्रमाणात कमी होउ शकतो. भारत आपल्या एकूण खाद्यतेलाच्या गरजेपैकी ५८% पेक्षा जास्त तेल आयात करतो. यामुळेच आंतरराष्ट्रीय किमती आणि रु पयाच्या हालचालींचा देशांतर्गत बाजारावर थेट परिणाम होतो. भारतात दरवर्षी अंदाजे २५-२६ दशलक्ष टन खाद्यतेलाचा वापर होतो. यामध्ये पाम, सोयाबीन आणि सूर्यफूल तेलाचा मोठा वाटा आहे.ऑगस्ट २०२६ च्या ताज्या आकडेवारीनुसार, देशातील किरकोळ महागाईचा दर वाढून ४.८२% आणि खाद्य महागाईचा दर ५.९५% वर पोहोचला आहे. डाळी, साखर आणि कांदा-लसणाच्या किमती आधीच वाढल्या आहेत. दुसरीकडे, काही प्रमुख एफएमसीजी (रोजच्या वापराच्या वस्तू) कंपन्यांनी सणासुदीच्या काळात विक्री वाढवण्यासाठी किमती स्थिर ठेवण्यावर भर दिला आहे, ज्यामुळे काही अंशी ग्राहकांना तात्पुरता दिलासा मिळू शकतो.

**किमती का वाढू शकतात?**

कच्च्या खाद्यतेलाच्या वाढत्या लँडेड कास्टमुळे खाद्यतेलाच्या किमतींवर सर्वात मोठा दबाव येत आहे. कमकुवत रु पया, महागडी मालवाहतूक आणि विमा, आणि आंतरराष्ट्रीय बाजारात वनस्पती तेलाच्या वाढलेल्या किमतींमुळे कंपन्यांचा खर्च वाढला आहे.

**लँडेड कास्ट किती वाढली?**

एसईएच्या आकडेवारीनुसार, १८ सप्टेंबर रोजी मुंबई बंदरावर कच्च्या पाम, सोयाबीन आणि सूर्यफूल तेलाचे दर अनुक्रमे १,२६५, १,३१४ आणि १,३८० प्रति टन होते. वर्षभरापूर्वीच्या तुलनेत, पाम आणि सोयाबीन तेलाच्या दरात अंदाजे ११ऽ वाढ झाली होती, तर सूर्यफूल तेलाच्या दरात अंदाजे ७% वाढ झाली होती.

# सेवा संकल्प अभियान प्रभावीपणे राबविण्याचे आदिवासी विकास मंत्री अशोक वुईके यांचे निर्देश

**मुंबई/प्रतिनिधी :** आदिवासी विकास विभागामार्फत १७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राबविण्यात येणा-या सेवा संकल्प अभियान अंतर्गत विविध लोकाभिमुख उपक्रमांचे काटेकोर नियोजन करून अभियानाची प्रभावी अंमलबजावणी करावी. अभियानाच्या माध्यमातून शासनाच्या विविध कल्याणकारी योजना, सेवा व उपक्रमांची माहिती आदिवासी समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचविण्यासोबतच लाभार्थ्यांना योजनांचा प्रत्यक्ष लाभ मिळवून देण्यावर भर द्यावा, असे निर्देश आदिवासी विकास मंत्री अशोक वुईके यांनी दिले. सेवा संकल्प अभियानच्या नियोजनाचा आढावा घेण्यासाठी आदिवासी विकास मंत्री अशोक वुईके यांच्या अध्यक्षतेखाली बैठक आयोजित करण्यात आली होती. या बैठकीस आयुक्त लीना बनसोड, नागपूर, अमरावती, नाशिक व ठाणे विभागाचे अपर आयुक्ततसेच, सर्व प्रकल्प अधिकारी तसेच आदिवासी विकास विभागाचे वरिष्ठ अधिकारी दूरदृश्य प्रणालीद्वारे उपस्थित होते. यावेळी विविध प्रकल्प व अपर आयुक्त कार्यालयांच्या वतीने अभियानांतर्गत करण्यात येणा-या उपक्रमांचे सादरीकरण करण्यात आले. सेवा संकल्प अभियानांतर्गत आदिवासी आस्थापना, शासकीय व अनुदानित आश्रमशाळांमध्ये चित्रकला, भाषण, निबंध, वादविवाद, रांगोळी आदी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात येत आहे. स्पर्धा परीक्षा पूर्वतयारी करणा-या विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शनपर मेळावे आयोजित करून त्यांना शासकीय योजना व उपलब्ध संधींची माहिती देण्यात येत आहे. आश्रमशाळा व वसतिगृहांमधील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात येत असून, हिमोग्लोबिन तपासणीवर विशेष भर देण्यात येत आहे. महिला शेतक-यांची नोंदणी तसेच महिला बचत गटांच्या सक्षमीकरणासाठी विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. आदिवासी विकास विभागाच्या योजनांची माहिती तळागाळापर्यंत पोहोचविण्यासाठी चित्ररथ, पथनाट्य, प्रभातफेरी, सेवा यात्रा व लाभार्थी मेळावे आयोजित करण्यात येत आहेत. वनहक्क, पेसा, महिला सक्षमीकरण तसेच विविध कल्याणकारी योजनांबाबत जनजागृती करून पात्र लाभार्थ्यांना आवश्यक मार्गदर्शन व सहाय्य उपलब्ध करून देण्यात येत आहे.

# महिला शेतक-यांना प्रथमच अधिकृत ओळख; प्रमाणपत्रासाठी राज्यव्यापी मोहीम


## २३ सप्टेंबर रोजी राज्यस्तरीय ऑनलाइन वेबिनार

**मुंबई/प्रतिनिधी :** वर्ष २०२६ हे आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष म्हणून साजरे होत असताना, शेती आणि शेतीपूरक क्षेत्रात महिला शेतक-यांनी दिलेल्या मोलाच्या योगदानाला अधिकृत मान्यता देण्यासाठी महाराष्ट्र शासनाने एक ऐतिहासिक पाउल उचलले आहे. महिला शेतक-यांना शासनाच्या विविध योजना, कृषी सेवा, कर्ज, विमा तसेच इतर सुविधांचा सुलभ आणि प्रभावी लाभ मिळावा, या उद्देशाने महाराष्ट्र महिला शेतकरी सक्षमीकरण अधिनियम, २०२६ अंतर्गत महिला शेतकरी प्रमाणपत्र देण्याचा महत्त्वपूर्ण उपक्रम सुरू करण्यात आला आहे.१७ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत राज्यभर सेवा संकल्प अभियान राबविण्यात येत आहे. या अभियानाचा एक महत्त्वपूर्ण भाग म्हणून पात्र महिला शेतक-यांची महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठी नोंदणी तसेच प्रमाणपत्र वितरणाचा विशेष उपक्रम हाती घेण्यात आला आहे.या राज्यव्यापी जनजागृती मोहिमेअंतर्गत बुधवार, २३ सप्टेंबर २०२६ रोजी सायं. ४.०० वाजता राज्यस्तरीय ऑनलाइन वेबिनार आयोजित करण्यात आला आहे. या वेबिनारमध्ये महिला शेतकरी प्रमाणपत्रासाठीची पात्रता, ऑनलाइन अर्ज प्रक्रिया, आवश्यक कागदपत्रे, ग्रामसभा/नगरपंचायतीमार्फत होणारी मान्यता प्रक्रिया, तसेच महिला शेतक-यांचे हक्क, अधिकार आणि सक्षमीकरण याबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात येणार आहे.या वेबिनारमध्ये कृषी विभागाचे सचिव, ग्राम विकास विभागाचे सचिव, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाचे प्रकल्प संचालक तसेच महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान (एमएसआरएलएम उमेद) चे मुख्य कार्यकारी अधिकारी मार्गदर्शन करणार आहेत. महिला शेतकरी सक्षमीकरणासाठी शासनाची भूमिका, तसेच विविध विभागांच्या समन्वयातून राबविण्यात येणा-या या महत्त्वपूर्ण उपक्रमाची सविस्तर माहिती यावेळी देण्यात येणार आहे.

कृषिताई, कृषिसखी, उमेद (सीआरपी), ग्रामसेवक, सरपंच, गट विकास अधिकारी, कृषी विभागातील अधिकारी व कर्मचारी, बचत गट, शेतकरी उत्पादक संस्था (एफपीओ), स्वयंसेवी संस्था तसेच सर्व पात्र महिला शेतक-यांनी या वेबिनारमध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन कृषी विभागाने केले आहे.वेबिनार बुधवार, २३ सप्टेंबर २०२६ रोजी सायं. ४.०० वा होईल, थेट प्रक्षेपण https://www.youtube.com/@PoCRAMaharashtra/streams या युट्यूब लिंक वर होईल.महिला शेतकरी प्रमाणपत्र ही केवळ नोंदणीची प्रक्रिया नाही; तर महिला शेतक-यांच्या योगदानाला अधिकृत मान्यता देणारे, त्यांच्या हक्कांना बळकटी देणारे आणि शासनाच्या विविध योजनांपर्यंत त्यांची प्रभावी पोहोच सुनिश्चित करणारे हे ऐतिहासिक पाउल आहे.

# विजय वडेट्टीवार यांचे 'एक्स' अकाउंट हॅक; तातडीने नागरिकांना केले आवाहन

**मुंबई /प्रतिनिधी-** काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांचे एक्स (ट्विटर) अकाउंट हॅक झाले आहे. इन्स्टाग्रामवर पोस्ट लिहित त्यांनी याबद्दलची माहिती दिली आहे. अकाउंट सुरक्षितपणे पुन्हा माझ्या ताब्यात येईपर्यंत सर्वांनी सहकार्य करावे असे त्यांनी म्हटले आहे.काँग्रेसचे ज्येष्ठ नेते आणि महाराष्ट्रातील विधानसभेतील काँग्रेसचे नेते विजय वडेट्टीवार यांचं अधिकृत (ट्विटर) अकाउंट हॅक झाल्याची माहिती समोर आली आहे. वडेट्टीवार यांनी स्वतःच याबाबत लोकांना सतर्क केले असून, अकाउंट पुन्हा सुरक्षितपणे रिकव्हर होईपर्यंत त्यावरू न होणा-या कोणत्याही हालचालींशी आपला किंवा आपल्या कार्यालयाचा संबंध नसल्याचे स्पष्ट केले आहे. विजय वडेट्टीवार यांच्या सोशल मीडिया अकाउंटला मोठ्या संख्येने फालोअर्स आहेत. त्यामुळे एखाद्या महत्त्वाच्या राजकीय व्यक्तीचे अकाउंट हॅक झाल्यानंतर त्याचा गैरवापर होण्याची शक्यता लक्षात घेता, नागरिक आणि कार्यकर्त्यांना सावध राहण्याचं आवाहन करण्यात आले आहे. विशेषतः हॅक झालेल्या अकाउंटवरून येणा-या संशयास्पद पोस्ट, मेसेज किंवा लिंकवर क्लिक न करण्याचा सल्ला देण्यात आला आहे.



वडेट्टीवार यांनी अकाउंट हॅक झाल्याची माहिती देताना, सध्या त्यांच्या हँडलवरू न होणा-या कोणत्याही पोस्ट, मेसेज किंवा इतर कृतीशी त्यांचा अथवा त्यांच्या कार्यालयाचा संबंध नसल्याचं सांगितलं आहे. त्यामुळे त्यांच्या नावाने एखादी नवी पोस्ट किंवा मेसेज दिसल्यास तो अधिकृत आहे की नाही, याची खात्री केल्याशिवाय त्यावर प्रतिक्रिया देउ नये, असं आवाहन करण्यात आलं आहे. यासंदर्भात त्यांनी इन्स्टाग्रामवर पोस्ट लिहिली आहे.

# संपादकीय

प्रबंध संपादक : प्रदीप देशपांडे

## ‘टॅरिफ कार्ड’चा डाव

**डोनाल्ड ट्रम्प राष्ट्राध्यक्ष बनल्यापासून अमेरिकेच्या पारंपरिक परराष्ट्र धोरणांमध्ये आमूलाग्र बदल झाला. विशेषतः भारतासंदर्भातील अमेरिकेचे धोरण १८० अंशांनी बदलल्याचे दिसते. पाकिस्तानबाबतचे धोरण तसेच व्हिसाबाबत नवी नियमावली असो किंवा मागील काळातील टॅरिफचा निर्णय असो; या सर्व निर्णयांमुळे भारताला खूप मोठी झळ सोसावी लागत आहे. आता ट्रम्प यांनी ‘लिंडसे ओ. ग्रॅहम सँक्शनिंग रशिया अँड इराण ॲक्ट ऑफ २०२६’वर स्वाक्षरी केल्याने या आर्थिक युद्धाला नवे अस्त्र मिळाले आहे. रशियाकडून तेल आणि नैसर्गिक वायू खरेदी करणाऱ्या प्रमुख देशांवर अतिरिक्त टॅरिफ लावण्याचा अधिकार राष्ट्राध्यक्षांना देणारे हे विधेयक अमेरिकन काँग्रेसच्या दोन्ही सभागृहांत मंजूर झाले. रशियन तेलाचा प्रमुख खरेदीदार असल्याने याचा संभाव्य फटका भारताला बसू शकतो. विधेयकाचा मूळ उद्देश रशियाच्या ऊर्जानिर्यातीतून मिळणाऱ्या उत्पन्नावर दबाव आणण्याचा आहे. या तरतुदींनुसार रशियन तेल किंवा वायूच्या ५ सर्वांत मोठ्या खरेदीदारांवर अतिरिक्त टॅरिफ लावण्याचे अधिकार अमेरिकी अध्यक्षांना मिळतात.मूळ प्रस्तावात ५०० टक्क्यांपर्यंत टॅरिफची चर्चा होती; अंतिम स्वरूपात कमाल मर्यादा १०० टक्के करण्यात आली. या कायद्यामुळे ट्रम्प यांच्याकडे मोठे व्यापारी हत्यार आले आहे. कोणत्या देशावर आणि किती प्रमाणात हे आयुध वापरायचे याबाबत त्यांच्याकडे लक्षणीय स्वातंत्र्य असणार आहे. फेब्रुवारी २०२२ पूर्वी भारताच्या तेल आयातीत रशियाचा वाटा तुलनेने नगण्य होता. युक्रेन युद्धानंतर पाश्चिमात्य निर्बंधांमुळे रशियन तेलाला पारंपरिक बाजारपेठांचा काही भाग गमवावा लागला. रशियाने सवलतीच्या दरात तेल विकण्यास सुरुवात केली आणि भारतासारख्या मोठ्या आयातदार देशाला त्यातून व्यावसायिक संधी मिळाली. भारत ८५ टक्क्यांहून अधिक कच्चे तेल आयात करतो. त्यामुळे तेल दरातील काही डॉलरची सवलतही देशाच्या आयात बिलावर मोठा परिणाम करते. ऑगस्टमध्ये भारताच्या कच्च्या तेलाच्या आयातीत रशियन तेलाचा वाटा ४५ टक्के होता. भारत रशियावर पूर्ण अवलंबून नाही. इराक, सौदी अरेबिया, संयुक्त अरब अमिरात, कुवेत, अमेरिका, ब्राझील तसेच आफ्रिकी उत्पादक देश हे पर्यायी स्रोत आहेत. ऑगस्ट २०२६ मध्ये भारताची एकूण कच्च्या तेलाची आयात १९.०१ दशलक्ष टन होती. प्रश्न तेल उपलब्ध होण्याचा कमी आणि ते कोणत्या दराने उपलब्ध होईल याचा अधिक आहे.स्वस्त किंवा तुलनेने अनुकूल दरात उपलब्ध होणाऱ्या पुरवठ्याला अचानक पर्याय शोधणे सोपे नाही. भारताची लोकसंख्या १.४ अब्जहून अधिक असल्याने पेट्रोलियम पुरवठा, वाहतूक खर्च आणि देशांतर्गत महागाई या तिन्हींचा विचार करावा लागतो. भारत सरकारने अमेरिकी विधेयकाची नोंद घेतली असून आपल्या व्यापार आणि आर्थिक हितांचे संरक्षण करण्यासाठी आवश्यक उपाय करण्याची भूमिका मांडली आहे. अमेरिकेसाठीही निर्णय सरळ नाही. रशियन तेलाचे मोठे ग्राहक अचानक इतर पुरवठादारांकडे वळले, तर जागतिक तेल बाजारात मागणीचे समीकरण बदलू शकते. पश्चिम आशियातील पुरवठा मर्यादित असताना रशियन तेल बाजारातून मोठ्या प्रमाणावर बाजूला झाले, तर जागतिक भाव आणखी वाढण्याचा धोका आहे. त्याचा फटका भारत किंवा चीनपुरता मर्यादित राहणार नाही. अमेरिकी ग्राहकांनाही महाग इंधनाचा सामना करावा लागेल.अमेरिकेत डिझेलचे दर वर्षभरात जवळपास ७० टक्क्यांनी वाढले. काही भागांत ते ६.२ डॉलर प्रति गॅलनच्या आसपास पोहोचले. मका आणि सोयाबीन कापणीच्या हंगामात ट्रॅक्टर, हार्वेस्टर आणि इतर कृषी यंत्रांसाठी डिझेलचा खर्च शेतकऱ्यांसाठी संवेदनशील मुद्दा बनतो. मध्यावधी निवडणुका दोन महिन्यांपेक्षा कमी अंतरावर असताना इंधन दर आणखी वाढवणारा निर्णय राजकीयदृष्ट्या ट्रम्प यांच्यासाठीही सोपा नाही. अमेरिकन फेडरल रिझर्व्हने १६ सप्टेंबरला पाव टक्क्याची व्याज दरवाढ केली. ही जुलै २०२३ नंतरची पहिली दरवाढ आहे. महागाई अजूनही वाढलेल्या पातळीवर असल्याचे फेडने स्पष्ट केले आहे. अशा वेळी इंधन आणि ऊर्जा आणखी महाग करणाऱ्या धोरणाचा परिणाम अमेरिकेतील महागाईवर होऊ शकतो. अमेरिका हा भारतीय निर्यातीचे महत्त्वाचे गंतव्यस्थान आहे. शंभर टक्के अतिरिक्त टॅरिफ प्रत्यक्षात लागू झाले, तर अनेक भारतीय उत्पादनांची अमेरिकी बाजारातील स्पर्धात्मकता मोठ्या प्रमाणावर कमी होऊ शकते.भारत-अमेरिका द्विपक्षीय व्यापार करार प्रलंबित आहे. रशियन तेलाचा मुद्दा या वाटाघाटींशी जोडला जाऊ शकतो. मात्र व्यापार करार झाला म्हणजे भविष्यातील टॅरिफपासून कायमचे संरक्षण मिळेल, अशी खात्री नाही. युरोपियन महासंघ, जपान आणि दक्षिण कोरियाबरोबरच्या अमेरिकी व्यापारी व्यवहारांचा अनुभव अशा हमीबाबत सावध राहण्यास सांगतो. त्यामुळे भारताने पुरवठादारांचे विविधीकरण, निर्यातीसाठी पर्यायी बाजारपेठांचा विस्तार आणि अमेरिकेशी वाटाघाटी या तिन्ही आघाड्यांवर तयारी करणे आवश्यक आहे.आजचे जग बहुध्रुवीय होत आहे. ब्रिक्स परिषदेने याबाबतचे रणशिंग नुकतेच नव्याने फुंकले. याचाच वचपा ट्रम्प यांनी या कायद्याच्या माध्यमातून काढल्याचे दिसते. कोणताही देश आपल्या प्रभावाखालीच राहावा, ही वसाहतवादी मानसिकता याच्या मुळाशी आहे. ट्रम्प यांनी पहिल्या कार्यकाळात भारतावर इराणकडून होणाऱ्या तेल आयातीला खोडा घातला. व्हेनेझुएलाच्या तेलालाही बंदी आहे. सौदी अरेबियावर हुती बंडखोरांनी केलेल्या हल्ल्यांमुळे जागतिक तेल पुरवठ्यात अडथळे निर्माण झालेत. आता रशियन तेलाचे दरवाजे बंद करून ट्रम्प चीनसह अन्य विकसनशील देशांची कोंडी करत आहेत. अमेरिकेच्या तालावर जगाने नाचणे ही ट्रम्प यांची ‘मेक अमेरिका ग्रेट अगेन’ची नवी व्याख्या जागतिक नीतिनियमांना, व्यापारी कायद्यांच्या चौकटीला हरताळ फासणारी आहे. ‘सत्तेत आल्यास काही दिवसांत रशिया-युक्रेन युद्ध थांबवेन’, अशी गर्जना ट्रम्प यांनी केली होती. पण ती सपशेल फुसका बार ठरली. अपयश झाकण्यासाठी ट्रम्प यांनी आता टॅरिफचे कार्ड नव्याने हाती घेतल्याचे दिसते. वस्तुतः युरोपियन देश अब्जावधी डॉलरचा रशियन एलएनजी खरेदी करत आहेत. पण त्यांच्यावर एकही निर्बंध अमेरिकेने लादलेला नाही. खुद्द अमेरिकेच्या अणुभट्ट्यांना सर्वाधिक युरेनियम रशियाच पुरवतो. गतवर्षी याचे प्रमाण एकूण युरेनियमच्या २६ टक्के होते. वर्षभरात अंदाजे एक अब्ज डॉलरचे म्हणजेच सुमारे ४०० टन रशियन युरेनियम अमेरिका खरेदी करतो. हा पुरवठा चालू राहावा म्हणून या कायद्यात पळवाट ठेवली आहे. त्यामुळे हा एक सुनियोजित कट आहे. हे लक्षात घेता आपल्या नागरिकांची ऊर्जा सुरक्षा जपण्यास आम्ही पूर्णपणे कटिबद्ध आहोत आणि आपल्या व्यापार व आर्थिक हितांचे रक्षण करण्यासाठी सर्व ‘आवश्यक पावले’ उचलली जातील, ही भारताची भूमिका योग्यच आहे. मागील टॅरिफच्या काळात भारताने पर्यायी बाजारपेठांची निवड करत, मुक्त व्यापार करार करत अमेरिकेला अप्रत्यक्ष शह दिला होता. आताही अमेरिकेपुढे न झुकता मुत्सद्देगिरीचा अचूक वापर करण्याची गरज आहे.**

# दारिद्र्य निर्मूलन ते कृषी परिवर्तन

**दारिद्र्य कमी करण्याच्या संदर्भात भारताने ऐतिहासिक प्रगती केली आहे. कृषी क्षेत्रातही चांगली प्रगती झाली आहे. तरीही भारतीय शेतीसमोर काही गंभीर संरचनात्मक प्रश्न आहेतच.**



### पूर्वार्ध

**आ**जही आपल्या देशाच्या सामाजिक व आर्थिक रचनेत शेतीचे महत्व कायम आहे. सुमारे ४६ टक्के कामगारशक्ती कृषी आणि संबंधित क्षेत्रांवर अवलंबून असताना या क्षेत्राचा अर्थव्यवस्थेतील सकल मूल्यवर्धन मधील वाटा सुमारे १८ टक्के आहे. यावरून भारतीय अर्थव्यवस्थेतील एक मूलभूत विसंगती स्पष्ट होते. मोठ्या लोकसंख्येला रोजगार देणाऱ्या क्षेत्राची उत्पादकता आणि उत्पन्न अजूनही तुलनेने कमी आहे.

स्वातंत्र्यानंतर भारतासमोर अन्नटंचाई आणि दारिद्र्य ही दोन मोठी आव्हाने होती. १९६०च्या दशकातील हरित कवाण, सिंचन, खते आणि आधुनिक कृषितंत्रज्ञान यांच्या साहाय्याने देशाचे कृषी चित्र बदलले. गहू आणि तांदळाच्या उत्पादनात मोठीं वाढ झाली आणि भारत अन्नधान्याच्या बाबतीत आत्मनिर्भर झाला. मात्र,हरित क्रांतीचे पुढील पर्व आता वेगळ्या प्रश्नांसमोर उभे आहे. अन्नाची कमतरता हा प्रश्न राहिलेला नसून शेतकऱ्यांचे उत्पन, मावीचे आरोग्य, पाण्याची उपलब्धता, हवामान बदल आणि ग्रामीण रोजगार हे पुढील आव्हाने बनली आहेत.

**अर्थव्यवस्थेची प्रगती**

गेल्या दोन दशकांत भारताने आर्थिक प्रगतीची मोठी झेप घेतली आहे. २००४ मध्ये भारताचा सकल देशांतर्गत् उत्पादन (जीडीपी) सुमारे ७०९ अब्ज डॉलर होता; २०१४ पर्यंत तो सुमारे २ ट्रिलियन डॉलरवर पोहोचला आणि आज भारताची अर्थव्यवस्था ४ ट्रिलियन डॉलरच्या पुढे गेली आहे. ‘इंटरनॅशनल मनिटरी फंड’च्या २०२६च्या आकडेवारीनुसार भारताचे सकल देशांतर्गत उत्पादन सुमारे २,८१० डॉलर आहे आणि लोकसंख्या सुमारे १.४८ अब्ज आहे. याचा अर्थ भारताची एकूण आर्थिक ताकद मोठी असली तरी दरडोई उत्पन्नाच्या दृष्टीने अजून मोठा प्रवास बाकी आहे. भारताची आर्थिक वाढही तुलनेने मजबूत आहे. २०२५-२६ मध्ये वास्तविक जीडीपी वाढ ७.६ टक्के राहिली असून २०२६-२७ च्या पहिल्या तिमाहीत अर्थव्यवस्था ७.८ टक्क्यांनी वाढली. या वाढीला देशांतर्गत उपभोग, गुंतवणूक, उत्पादन आणि सेवा क्षेत्राचा आधार मिळाला आहे. मात्र जीडीपी वाढीचे खरे यश हे तिचा लाभ ग्रामीण कुटुंबे, लहान शेतकरी आणि निम्न उत्पन्न गटांपर्यंत किती पोहोचतों यावर ठरते.

दारिद्र्य कमी करण्याच्या संदर्भात भारताने ऐतिहासिक प्रगती केली आहे. जागतिक बँकेच्या निकषानुसार दारिद्र्याचे प्रमाण २०११ मधील २७.१ टक्क्यांवरून २०२२ मध्ये सुमारे ५.३ टक्क्यांपर्यंत खाली आले आहे आणि २०२६ पर्यंत या प्रमाणात आणखी घट होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. खरेदी शक्ती समतोल (पर्चेसिंग ताची अर्थव्यवस्था सुमारे पॉवर पॅरिटि) या निकषानुसार भारताची अर्थव्यवस्था सुमारे १८.९० ट्रिलियन अमेरिकन डॉलरच्या जवळ पोहोचत असून जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था म्हणून भारताचा प्रभाव वाढत आहे. दरडोई उत्पनातही सातत्याने वाढ होत असून २०२६ मध्ये प्रति व्यक्ती जीडीपी सुमारे २८०० डॉलर पर्यंत पोहोचल्याचा अंदाज आहे. तथापि, विकसित देशांच्या तुलनेत ही पातळी अद्याप कमी असल्यामुळे समावेशक आणि संतुलित विकासाची आवश्यकता अधोरेखित होते. या परिवर्तनामध्ये सामाजिक सुरक्षा योजनांचा महत्त्वाचा बाटा आहे. प्रधानमंत्री गरीब कल्याण अन्न योजनेद्वारे सुमारे ८० कोटी लोकांना मोफत धान्य मिळत आहे. आर्थिक संकटाच्या काळात अशा योजनांनी गरीब कुटुंबांना आधार दिला आहे. परंतु येथेच पुढील घोरणात्मक प्रश्न निर्माण होतो, सरकारने कायम संरक्षण द्यायचे की संरक्षणाच्या आधारावर आर्थिक क्षमता निर्माण करायची?

थेट लाभ हस्तांतरणाने (डायरेक्ट बेनेफिट ट्रान्सफर-डीबीटी) या व्यवस्थेत महत्त्वपूर्ण बदल घडवला आहे. २३व्या हप्त्याद्वारे ९.४४ कोटी शेतकऱ्यांना १८ हजार पी एम किसान हे त्याचे उदाहरण आहे. जून २०२६मध्ये ८८० कोटी रुपयपिक्षा अधिक रक्कम थेट देण्यात आली; योजनेच्या स्थापनेपासून ४.४६ लाख कोटी रुपयपिक्षा मध्यस्थ आणि गळती कमी करण्यास मदत झाली असली अधिक रक्कम वितरित झाली आहे. डिजिटल डीबीटीमुळे तरी लाभार्थी ओळख, अपात्र लाभार्थी, डेटाची अचूकता आणि अंतिम परिणाम मोजण्याची क्षमता यावर अधिक लक्ष देणे आवश्यक आहे.

**कृषी क्षेत्राची प्रगती**

कृषी क्षेत्रातही प्रगती झाली आहे. २०२४-२५ मध्ये २.७ टक्क्यपिक्षा लक्षणीय जास्त होती. २०२५-२६ मध्ये कृषी वाढ ४.६ टक्क्यांपर्यंत पोहोचली, जी मागील वर्षातील कोटी रुपयांपर्यंत पोहोचल्याचा अंदाज आहे. याच काळात कृषी व संलग्न क्षेत्राचा सकल मूल्यवर्धन सुमारे ५२.०८ लाख देशाचे अन्नधान्य उत्पादन ३७६.५६ दशलक्ष टनांपर्यंत मेलबियांचे उत्पादन ४३.०६ दशलक्ष टनांपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे तरीही भारतीय शेतीसमोर काही गंभीर संरचनात्मक प्रश्न आहेत. युरियाच्या अतिवापरामुळे मातीतील पोषक संतुलन बिघडत आहे. केंद्र सरकारच्या २०२६च्या आकडेवारीनुसार भारताचा राष्ट्रीय एनःपी के वापर गुणोत्तर सुमारे ९.८:३.७:१ आहे, तर काही राज्यांमध्ये ते अत्यंत असंतुलित आहे. भारतीय कृषी संशोधन परिषदने त्यामुळे मृदा परीक्षणावर आधारित खत व्यवस्थापन आणि ‘योग्य मात्रा, योग्य वेळ, योग्य पद्धत आणि योग्य खत’ या ‘४ आर’ तत्त्वांवर भर दिला आहे. या पार्श्वभूमीवर केंद्र सरकार आणि कृषी संस्थांकडून ‘पीएम प्रणाम योजना’ (पी एम अमेलिओरेशन ऑफ मदर अर्थ) आणि ‘संतुलित खत वापर प्रोग्रॅम फॉर रेस्टोरेशन, अवेअरनेस जनरेशन, नरीशमेंट अँड अभियान’ यांसारख्या उपक्रमांना विशेष प्राधान्य दिले जात आहे. ही योजना ‘मातृभूमीचे आरोग्य जपणे’ या संकल्पनेवर आधारित असून रासायनिक खतांचा संतुलित वापर आणि शाश्वत शेती पद्धतींना प्रोत्साहन देण्याचा तिचा उद्देश आहे. संतुलित खत वापरामुळे खत आयातीवरील अवलंबित्व कमी होऊन परकीय चलनाची बचत होईल, तसेच मातीची गुणवत्ता सुधारून दीर्घकालीन कृषी उत्पादकता अधिक शाश्वत बनेल.

पाण्याची समस्या त्याहून गंभीर आहे. २०२४च्या सरासरी पातळी ६०.४७ टक्के असली तरी ७५१ मूल्यांकन युनिट्स ‘अतिउपसा’ श्रेणीत आहेत. पंजाब, हरियाणा आणि राजस्थानसह काही राज्यांमध्ये भूजल उपसा पुनर्भरणापेक्षा अधिक आहे. म्हणूनच भारताच्या कृषी धोरणासमोर आता मूलभूत प्रश्न आहे अनुदान किती वाढवायचे हा नव्हे, तर अनुदानातून उत्पादकता, उत्पन्न आणि स्वावलंबन कसे निर्माण करायचे? याचे उत्तर पुढील भागातील धोरणात्मक बदलात दडलेले आहे.

**डॉ.किरण गायकवाड**
९९५३२५८२३४

# उद्योगांचे ‘किंमत निश्चिती’ मॉडेल आणि शेती

**भा**रतीय अर्थव्यवस्थेत जेव्हा जेव्हा शेतकऱ्यांच्या कर्जमाफीचा किंवा कर्जमुक्तीचा मुद्दा ऐरणीवर येतो, तेव्हा त्याला ‘मोफतची खैरात’, ‘राजकीय लोकानुनय’ किंवा ‘बँकिंग व्यवस्थेवरचा ताण’ अशा नकारात्मक चौकटीत पाहिले जाते. परंतु, देशातील कॉर्पोरेट जगताला ज्या आर्थिक सिद्धांतांच्या आधारे नफा कमावण्याचे आणि स्वतःच्या मालाची किंमत ठरवण्याचे स्वातंत्र्य दिले गेले आहे. त्याच चष्म्यातून कधी कृषी क्षेत्राच्या ताळेबंदाचे मूल्यमापन झाले आहे का? बाजारातील आर्थिक निकष जर सर्वांसाठी समान असतील, तर शेतकऱ्याला मिळणारी कर्जमुक्ती हा सरकारच्या औदार्याचा भाग नसून, सदोष बाजार व्यवस्थेमुळे झालेल्या नुकसानीची ती केवळ कायदेशीर भरपाई ठरते. अर्थात, तो शेतकऱ्याचा अधिकारच आहे. मुक्त बाजारपेठेत कोणत्याही खासगी उत्पादन कंपनीचे आर्थिक गणित पाहिले तर ते ‘कॉस्ट-प्लस प्रायसिंग’ या तत्त्वावर चालते. कोणतीही कंपनी उत्पादनाची अंतिम किंमत (एमआरपी) ठरवताना कच्चा माल, मजुरी, वाहतूक आणि प्रक्रिया खर्चासोबतच ‘गुंतवलेल्या एकूण भांडवलावरील परतावा’ (रिटर्न ऑन कॅपिटल एम्प्लॉइड- आरओसीई) हा किमान १५ टक्के ते १८ टक्के परतावा गृहीत धरते. विशेषतः शेतीशी थेट संबंधित असणाऱ्या मोठ्या खाद्यतेल उत्पादक कंपन्यांची आर्थिक आकडेवारी याचे उत्तम उदाहरण आहे. ‘फॉर्च्यून ऑईल’ (अदानी विल्मर) सारख्या अग्रगण्य कृषी-प्रकिया कंपनीचा, तर ‘गोदरेज ॲग्रोव्हेट’ सारख्या कृषी व तेल क्षेत्रातील मोठ्या कंपनीचा वार्षिक भांडवली परतावा (आरओसीई) साधारण २० टक्क्यांच्या घरात राहिला आहे. या कंपन्या बाजारातील कच्च्या मालाचे दर आणि आंतरराष्ट्रीय घडामोडीनुसार आपल्या तेलाची किंमत एमआरपी) वाढवून स्वतःचा नफा सुरक्षित ठेवतात. याउलट, या कंपन्यांना सोयाबीनसारखा कच्चा माल पुरवणारा मूळ उत्पादक (शेतकरी) मात्र स्वतःच्या मालाचा भाव ठरवण्याच्या अधिकारापासून पूर्णपणे वंचित आहे. सोयाबीनचे ‘औद्योगिक’ अर्थशास्त्र शेतकऱ्याला उद्योजकाचा दर्जा देऊन, एक हेक्टर (अडीच एकर) जमिनीवर, चार महिन्यांच्या सोयाबीन पिकाचे आर्थिक मूल्यमापन खासगी कंपनीच्या धर्तीवर केले, तर येणारे आकडे चक्रावून टाकणारे आहेत. या गणितात आपण कॉर्पोरेट क्षेत्राच्या २० टक्के परताव्याच्या तुलनेत केवळ किमान १० टक्के आरओसीई आणि कुटुंबाच्या श्रमाचे न्याय्य मूल्य गृहीत धरले आहे. शेतकरी कुटुंबाचे मासिक वेतनः १५,००० रु. (४ महिन्यांचा पीक कालवधी = ६०,००० रु.) मजुरांचे मासिक वेतनः १५,००० रु. (४ महिने= ६०,००० रु,)

कच्चा माल व मशागत खर्चः २५,००० रु. (बियाणे, खते, कीटकनाशके व ट्रॅक्टर) स्थिर भांडवल (जमिनीचे बाजारमूल्य): २५,००,००० रु. (२५ लाख रुपये प्रति हेक्टर) सरासरी प्रगत उत्पादनः २५ क्विटल (प्रति हेक्टर) (भारतात सरासरी उत्पादन १० ते १२ क्विटल प्रति हेक्टर आहे)

या निकषांवर आधारित कोष्टक खालीलप्रमाणे मांडता येईलः

एकूण खर्च= ६०,००० ६०,००० २५,००० ८३,३३३ - २,२८,३३३ रु. चार महिन्यांच्या ‘आर ओसीई’ चे प्रमाणशीर गणितः

२५ लाखांवर १० टक्के वार्षिक परतावा= २,५०,००० रु.

चार महिन्यांसाठी प्रमाणशीर परतावा=८३,३३३ रु.

- एकूण उत्पादन खर्च= २,२८,३३३

- प्रति क्विटल न्याय्य भाव (एमआरपी) = ९,१३३ रु./क्विटल

वास्तव आणि विरोधाभास वरील ताळेबंदावरून हे स्पष्ट होते की, औद्योगिक नियम शेतीला लावले तर सोयाबीनला प्रति क्विटल किमान ९,१३३ रुपये (१० टक्के परताव्याप्रमाणे) आणि परतावा २० टक्के गृहित धरल्यास १५,८०० रुपयांचा भाव मिळायला हवा. तरच शेतकरी आपल्या स्थिर भांडवलावर (जमीन) योग्य परतावा मिळवून एका मॅन्युफॅक्चररप्रमाणे सन्मानाने जगू शकेल. परंतु, आजचे वास्तव काय आहे? चालू हंगामात देशातील कृषी उत्पन्न बाजार समित्यांमध्ये सोयाबीनला केवळ ३,८०० ते ४,५०० रुपये प्रति क्विटलचा भाव मिळत आहे. हा भाव शेतकऱ्याचा निव्वळ उत्पादन खर्च (कॉम्प्रीहेन्सिव्ह कॉस्ट - सी२) तर सोडाच, पण वर नमूद केलेल्या हक्काच्या भावाच्या निम्म्याहूनही कमी आहे. जेव्हा बँकिंग क्षेत्रातील कॉर्पोरेट क्षेत्राची आकडेवारी पाहिली जाते, तेव्हा हा विरोधाभास अधिक तीव्र होतो. राज्यसभेतील अधिकृत माहितीनुसार (२०२१ ते २०२६ या पाच वर्षांत), बँकांनी मोठ्या उद्योगधंद्यांचे तब्बल ३ लाख २० हजार ४८१ कोटी रुपयांचे कर्ज निर्लेखित (राईट-ऑफ) केले आहे. उद्योगांना दिलेली सवलत शेती क्षेत्राच्या तुलनेत तब्बल २.७ पटीने जास्त आहे. हे असे असणे जर ‘आर्थिक शिस्त किंवा उद्योगांचे पुनरुज्जीवन’ ठरते, तर मग शेतकऱ्यांच्या कर्जमाफीलाच ‘खैरात’ का संबोधले जावे? अंतिम सूत्र शेतकऱ्याला वारंवार कर्जमाफीची भीक नको आहे, तर त्याला ‘आर्थिक स्वातंत्र्याची’ गरज आहे.

**सूरज खेर**

# अजूनही वेळ गेलेली नाही..पण आत्मपरीक्षणाची गरज

**न**रेंद्र मोदी हे गेल्या बारा वर्षांपासून देशाच्या राजकारणाच्या केंद्रस्थानी असलेले नेतृत्व आहे.२०१४ पासून सुरू झालेला त्यांचा राजकीय प्रवास २०२४ मध्ये तिसऱ्या सलग कार्यकाळापर्यंत पोहोचला. या प्रदीर्घ काळात मोदी सरकारने अनेक मोठे निर्णय घेतले. पायाभूत सुविधा, डिजिटल अर्थव्यवस्था,सरकारी योजनांचे थेट लाभ, उत्पादन क्षेत्र, महामार्ग, रेल्वे आणि सार्वजनिक गुंतवणूक यावर मोठा भर देण्यात आला. या काळात देशाच्या विकासाचा वेग वाढविण्याचा प्रयत्न झाला, अनेक महत्त्वाकांक्षी योजना राबविण्यात आल्या आणि भारताची जागतिक पातळीवरील प्रतिमाही अधिक ठळक झाली.

मात्र कोणत्याही सरकारचे मूल्यमापन केवळ मोठ्या घोषणा, आकडेवारी किंवा प्रसिद्धीच्या आधारे होत नाही. सामान्य माणसाच्या घरातील चूल, तरुणाच्या हातातील रोजगार, शेतकऱ्याच्या उत्पादनाला मिळणारा भाव,छोट्या व्यापाऱ्याचा व्यवसाय आणि मध्यमवर्गाच्या कुटुंबावर वाढणारा खर्च हीसुद्धा विकासाचीच खरी मोजमापे आहेत. देश मोठा होत असताना सामान्य माणसाचे जीवनही अधिक सुरक्षित, सन्मानाचे आणि आर्थिकदृष्ट्या सक्षम झाले पाहिजे.

आणि इथेच एक कठोर प्रश्न उभा राहतो.ज्या विचारसरणीतून मोदी घडले, त्या विचारसरणीत व्यक्तिपूजेला किंवा व्यक्तिकेंद्री मोहाला जवळपास शून्य स्थान होते. संघाच्या परंपरेत प्रसिद्धीच्या झोतात उभे राहण्यापेक्षा राष्ट्रकार्याला स्वतःला वाहून घेण्याला महत्त्व दिले गेले. परमपूज्य डॉ. हेडगेवार असोत किंवा श्रीगुरुजी गोळवलकर त्यांनी व्यक्तीभोवती नशा निर्माण केली नाही; त्यांनी विचार,संघटन आणि राष्ट्रसेवा यांना केंद्रस्थानी ठेवले.

आजही संघात असे असंख्य स्वयंसेवक आहेत, ज्यांनी संपूर्ण आयुष्य राष्ट्रासाठी अर्पण केले; पण प्रसिद्धीचा नाद केला नाही, टाळ्यांचा जयजयकार मागितला नाही आणि स्वतःचे नाव पुढे करण्यासाठी कार्य केले नाही. अनेकांनी अविवाहित राहून राष्ट्रसेवेला जीवन समर्पित केले. कुणी डॉक्टर झाला, पण ‘माझे कुटुंब वाढले तर राष्ट्रकार्य थांबेल’ या भावनेने वैयक्तिक आयुष्याचा त्याग केला. कुणी घरदार सोडले, कुणी गुरुदक्षिणा दिली, कुणी आयुष्यभर संघटन उभी केली पण त्याची जाहिरात केली नाही.

मग आज सत्तेच्या शिखरावर पोहोचलेल्या नेतृत्वाभोवती व्यक्तिपूजेचे एवढे मोठे वलय का निर्माण झाले आहे? प्रत्येक यशाचे श्रेय एका व्यक्तीला आणि प्रत्येक अपयशाची जबाबदारी इतरांवर ही पद्धत संघाच्या संस्कारांशी सुसंगत आहे का? कार्यकर्त्यांच्या त्यागावर उभ्या राहिलेल्या संघटनेत सत्ता ही साधन असते, साध्य नव्हे. पण सत्तेची नशा चढली की विचार मागे पडतात आणि प्रतिमा पुढे येते.

‘अजूनही वेळ गेलेली नाही’ हा केवळ राजकीय वाक्प्रचार नाही; तो आत्मपरीक्षणाचा इशारा आहे. बारा वर्षे हा छोटा कालवधी नाही. या काळात अनेक उपलब्धी झाल्या असतील, अनेक निर्णयांवर मतभेदही झाले असतील. पण आता प्रश्न केवळ भूतकाळाचे समर्थन करण्याचा किंवा विरोध करण्याचा नाही. प्रश्न आहे सत्ता जनतेसाठी आहे की प्रतिमेसाठी?

तरुणांना केवळ स्टार्टअप आणि आत्मनिर्भरतेची भाषा नको; त्यांना त्यांच्या शिक्षणाला आणि कौशल्याला साजेशा स्थिर रोजगाराच्या संधी हव्या आहेत. शेतकऱ्याला केवळ योजना नकोत; त्याला उत्पादन खर्च, योग्य बाजारभाव, सिंचन, साठवणूक आणि प्रक्रिया उद्योगाची मजबूत व्यवस्था हवी आहे. मध्यमवर्गाला केवळ विकासाचे मोठे आकडे नकोत; त्याच्या कुटुंबाच्या बजेटवरचा ताण कमी होणे महत्त्वाचे आहे. शहरांना केवळ मोठे रस्ते आणि उंच पूल नकोत; पाणी, स्वच्छता, वाहतूक,प्रदूषण आणि नियोजनबद्ध विकास यांचीही गरज आहे.

आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे लोकशाहीत सरकार जितके शक्तिशाली असते, तितकीच त्याची उत्तरदायित्वाची भावना महत्त्वाची असते. जनतेने दिलेला जनादेश हा केवळ सत्ता चालविण्याचा अधिकार नसतो; तो जनतेच्या अपेक्षा पूर्ण करण्याची जबाबदारीही असतो. जिथे पराभव झाला, तिथे जनतेला दोष देण्याऐवजी कारणांचा शोध घेणे आवश्यक असते. जिथे प्रश्न विचारले जातात, तिथे टीका दाबण्याऐवजी उत्तर देणे आवश्यक असते. जिथे चुका होतात, तिथे प्रचाराच्या पडद्याआड लपण्याऐवजी त्या मान्य करून सुधारणा करणे आवश्यक असते.

मोदींना देशाने सलग तीन वेळा नेतृत्वाची संधी दिली आहे. ही संधी केवळ राजकीय विजय म्हणून न पाहता एका मोठ्या सार्वजनिक विश्वासाच्या रूपात पाहणे आवश्यक आहे. त्यामुळे पुढील काळात अधिक संवाद, अधिक पारदर्शकता आणि सामान्य नागरिकांच्या प्रश्नांकडे अधिक संवेदनशीलतेने पाहण्याची अपेक्षा स्वाभाविक आहे.कारण इतिहासात मोठी सत्ता मिळवणे महत्त्वाचे असते; पण मिळालेली सत्ता सामान्य माणसाच्या आयुष्यात किती सकारात्मक बदल घडवते, हे त्याहून महत्त्वाचे असते. संघाच्या संस्कारांनी शिकवलेला त्याग, शिस्त, साधेपणा आणि निःस्वार्थ सेवा जर सत्तेच्या वर्तनात दिसली नाही, तर मग विचारसरणीचा उल्लेख केवळ भाषणापुरता उरतो.

मोदींसाठी अजूनही वेळ गेलेली नाही. पण व्यक्तिपूजेच्या मोहातून बाहेर पडण्याची, सत्तेच्या नशेवर नियंत्रण ठेवण्याची आणि संघाच्या मूळ संस्कारांकडे परत पाहण्याची वेळ नक्कीच आली आहे.देशाच्या अपेक्षा मोठ्या आहेत. तरुणांच्या आशा मोठ्या आहेत. शेतकऱ्याचे प्रश्न मोठे आहेत. मध्यमवर्गाच्या चिंता खऱ्या आहेत. व्यापारी, कामगार, महिला आणि सामान्य नागरिक यांच्या दैनंदिन जीवनातील प्रश्नांकडे अधिक गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. आता पुढील काळात घोषणा कमी आणि परिणाम अधिक, प्रचारापेक्षा प्रशासन अधिक, व्यक्तीपेक्षा विचार अधिक आणि राजकारणापेक्षा जनतेच्या जीवनातील प्रत्यक्ष बदल अधिक दिसला, तर या प्रदीर्घ राजकीय प्रवासाला वेगळा अर्थ मिळू शकतो.कारण जनतेचा विश्वास मिळवणे ही मोठी गोष्ट आहे; पण तो विश्वास टिकवणे ही त्याहून मोठी जबाबदारी आहे. आणि राष्ट्रासाठी आयुष्य अर्पण करणाऱ्या त्या असंख्य निनावी स्वयंसेवकांच्या त्यागाला न्याय द्यायचा असेल, तर सत्तेने टाळ्यांचा आवाज नव्हे, तर जनतेच्या आयुष्यातील बदल ऐकला पाहिजे.म्हणूनच अजूनही वेळ गेलेली नाही.कारण देशाला केवळ शक्तिशाली नेतृत्व नको,तर व्यक्तिपूजेपासून मुक्त, उत्तरदायी आणि सामान्य माणसाच्या आयुष्यात जाणवणारा बदल घडवणारे नेतृत्व हवे आहे.

**धनंजय देशमुख**
**मो.९२८४३८२१०२**

बुधवार, दि. २३ सप्टेंबर २०२६
E-mail:-ytljanmadhyam@gmail.com

# जनमाध्यम

एक प्रतिष्ठित सवय

# 56 दिवसांचा खंड, यवतमाळात दुष्काळाची चाहूल!

**३ लाख हेक्टरवरील पिके संकटात, कापूस-सोयाबीनच्या उत्पादनात ५० टक्क्यांपर्यंत घटण्याची शक्यता**

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

**यवतमाळ, दि. २२ : पावसाने सलग दडी मारल्याने यवतमाळ जिल्ह्यात खरीप हंगामावर दुष्काळाची झळ स्पष्टपणे जाणवू लागली आहे. तब्बल ५६ दिवसांच्या पावसाच्या खंडामुळे सुमारे तीन लाख हेक्टरवरील पिके संकटात आली असून कापूस, सोयाबीन, तूर, मूग, उडीद आणि ज्वारीची अवस्था बिकट झाली आहे. कापूस व सोयाबीनच्या उत्पादनात ५० टक्क्यांपेक्षा अधिक घट होण्याची शक्यता प्रशासनाने व्यक्त केली आहे.**

राज्यात दीर्घ पावसाच्या खंडामुळे दुष्काळसदृश स्थिती निर्माण झाल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही स्पष्ट केले असून प्राथमिक पाहणी व पीक पंचनाम्याच्या तयारीच्या सूचना देण्यात आल्या आहेत. जिल्ह्यात यंदा आठ लाख ६६ हजार हेक्टरपेक्षा अधिक क्षेत्रावर खरीप पेरणी झाली आहे. कृषी विभागाच्या उपलब्ध आकडेवारीनुसार कापूस सुमारे ४.८४ लाख हेक्टर, तर सोयाबीन सुमारे २.७२ लाख हेक्टरवर आहे. मात्र ऑगस्टमधील पावसाची मोठी तूट आणि त्यानंतरचा प्रदीर्घ खंड यामुळे पिकांना आवश्यक ओलावा मिळालेला नाही. सोयाबीनच्या शेंगा भरण्याच्या अवस्थेवर परिणाम झाला असून कापसाची वाढही खुंटली आहे. परिस्थितीची गांभीर्याने दखल घेत जिल्हा प्रशासनाने शासनाकडे 'वनपेजर' अर्थात एक पानी संक्षिप्त अहवाल सादर केला आहे. यात पिकांची स्थिती, पाणीसाठा, चारा, पाणीटंचाई आणि आगामी रब्बी हंगामासंदर्भातील स्थिती मांडण्यात आली आहे. प्रशासनाने यंत्रणेला माहिती अद्ययावत ठेवण्याच्या सूचना देत संभाव्य दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर तयारी सुरू केली आहे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री संजय राठोड यांच्या अध्यक्षतेखाली गुरुवार, २४ सप्टेंबर रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा बैठक होणार आहे. बैठकीला आदिवासी विकास मंत्री डॉ. अशोक उईके, राज्यमंत्री इंद्रनील नाईक तसेच जिल्ह्यातील खासदार, आमदार आणि वरिष्ठ अधिकारी उपस्थित राहणार असल्याचे सांगण्यात आले आहे. या बैठकीत पीक स्थिती, पाणीसाठा, चारा, पाणीटंचाई आणि शेतकऱ्यांना मदतीसाठी आवश्यक उपाययोजनांचा आढावा घेतला जाणार आहे. राज्यस्तरावर दुष्काळसदृश परिस्थितीची प्राथमिक पाहणी सुरू असल्याने यवतमाळच्या बैठकीकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागले आहे. आता अहवाल, बैठका आणि पाहणी पलीकडे प्रत्यक्ष मदतीचा निर्णय किती वेगाने होतो, हाच शेतकऱ्या समोरील सर्वात मोठा प्रश्न आहे.

## पालकमंत्र्यांसमोर शेतकऱ्यांच्या मदतीचे आव्हान

**यवतमाळ जिल्ह्यातील दुष्काळसदृश परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर पालकमंत्री संजय राठोड यांच्या अध्यक्षतेखाली २४ सप्टेंबर रोजी होणारी बैठक महत्त्वाची ठरणार आहे. जिल्हा प्रशासनाने शासनाकडे पिकांच्या स्थितीचा अहवाल सादर केला आहे. त्यामुळे या बैठकीत पिकांचे नुकसान, पाणीसाठा, चारा व पाणीटंचाईचा आढावा घेऊन पुढील उपाययोजनांबाबत निर्णयासाठी शासनस्तरावर पाठपुरावा होण्याची अपेक्षा आहे. राज्य सरकारने दुष्काळसदृश परिस्थिती असलेल्या जिल्ह्यांत प्राथमिक आढावा घेऊन त्यानंतर पीक पंचनामे करण्याची प्रक्रिया राबविण्याचे संकेत दिले आहेत.**

# कोरडा दुष्काळ जाहीर करण्याची मागणी..!

## शेतकऱ्यांसह मक्तेदारांनाही मदतीचा हात द्या

✦जनमाध्यम | प्रतिनिधी




**दारव्हा , दि. २२ :** यवतमाळ जिल्ह्यात पावसाने दांडी मारल्याने दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली असून शेतकरी मोठ्या आर्थिक संकटात सापडला आहे. शासनाने तातडीने दखल घेऊन दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये आर्थिक मदत तसेच पीक विम्याची अग्रीम रक्कम त्वरित द्यावी, अशी मागणी शेतकरी चळवळ दारव्हाच्या वतीने करण्यात आली आहे.

दरम्यान, मक्तेदारी अथवा बटाईने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचा प्रश्नही गंभीर बनला आहे. अनेक शेतकऱ्यांनी जमीनमालकाला मक्त्याची रक्कम देऊन नांगरणी, बियाणे, खते, औषधे, मजुरी तसेच दुबार पेरणीचा खर्च स्वतः केला. मात्र आता पावसाअभावी पिके हातातून गेल्याने या मक्तेदार शेतकऱ्यांवर कर्जाचा मोठा बोजा पडला आहे. शासकीय दुष्काळी मदत केवळ जमीनमालकाच्या नावावर मिळाल्यास प्रत्यक्ष शेतीचा खर्च करणारा मक्तेदार शेतकरी मदतीपासून वंचित राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे शासनाने मक्तेदारी व बटाईने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांचा स्वतंत्र सर्वे करून त्यांनाही दुष्काळी मदतीत समाविष्ट करावे, अशी मागणी करण्यात आली आहे. "जमीन कोणाच्या नावावर आहे यासोबत प्रत्यक्ष शेती कोणी केली, याचाही विचार शासनाने करावा. अन्यथा मक्तेदारीने शेती करणाऱ्या शेतकऱ्यांवर मोठा अन्याय होईल," अशी भूमिका मनसे व शेतकरी चळवळ दारव्हा च्या वतीने घेण्यात आली.तहसिलदार राजेश पऊळ यांच्या मार्फत मुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले यावेळी मनसे तालुकाध्यक्ष लाला पांडे, शेतकरी चळवळ संयोजक ईश्वर राठोड, राम गायकवाड,गुड्डू वझरकर, रणजित झोबडे, प्रतीक फेंडर, प्रथमेश उरकुडे आदी उपस्थित होते.

## थोडक्यात

### कर्जाचा बोजा, विष पिऊन शेतकऱ्याची आत्महत्या..!

**१.७० लाखांच्या सोसायटी कर्जाची नोंद,खरीप पिके वाळल्याने आर्थिक संकट तीव्र**



**पुसद :** पावसाने दीर्घ दडी मारल्याने खरीप पिके हातातून जाण्याच्या भीतीने आर्थिक संकटात सापडलेल्या कवडीपूर येथील ५७ वर्षीय अल्पभूधारक शेतकऱ्याने विष प्राशन करून आत्महत्या केल्याची घटना घडली. फकिरा सोमा राठोड असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. महसूल विभागाच्या प्राथमिक अहवालानुसार, रविवारी (२० सप्टेंबर) रात्री सुमारे ८ वाजता राठोड यांनी स्वतःच्या शेतात विष प्राशन केले. प्रकृती गंभीर झाल्याने त्यांना यवतमाळ येथील शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र सोमवारी (२१ सप्टेंबर) पहाटे उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. राठोड यांच्या नावावर कवडीपूर शिवारातील सर्व्हे क्र. २७१२ मध्ये ०.५० हेक्टर आणि २९१२ मध्ये ०.८० हेक्टर, अशी एकूण १.३० हेक्टर जमीन आहे. त्यांच्या जमिनीवर भोजला आदिवासी विकास कार्यकारी सहकारी संस्थेचा सुमारे १ लाख ७० हजार रुपयांचा बोजा असल्याची नोंद अहवालात आहे.

पावसाच्या खंडामुळे पिकांचे नुकसान आणि कर्जाचा वाढता ताण अल्पभूधारकांसाठी गंभीर ठरत आहे. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले व मुली असा परिवार आहे. तलाठी व ग्राम महसूल अधिकाऱ्यांनी प्राथमिक अहवाल वरिष्ठांकडे सादर केला असून पुढील प्रशासकीय कार्यवाही सुरू आहे.

# घाटंजी पोलिसांचा शहरात दणदणीत रूट मार्च

## शांतता व सलोखा राखण्याचे नागरिकांना केले आवाहन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**घाटंजी, दि. २२ :** गणेश उत्सव आणि आगामी सन उत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरातील कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी काल दि. २१ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी घाटंजी पोलिसांनी शहरातून दणदणीत रूट मार्च काढत पोलिस प्रशासन सज्ज असल्याचा स्पष्ट संदेश दिला. शहरातील प्रमुख मार्गांवरून पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी संचलन करत नागरिकांना गणेश उत्सव शांततेत आणि सामाजिक सलोखा राखून साजरा करण्याचे आवाहन केले.

सन उत्सवाच्या काळात कोणताही अनुचित प्रकार घडू नये, अफवा पसरू नयेत तसेच कायदा व सुव्यवस्थेला बाधा निर्माण होऊ नये, यासाठी पोलिस प्रशासनाने विशेष खबरदारी घेतली आहे. शहरातील संवेदनशील ठिकाणांसह प्रमुख चौक व मार्गांवर पोलिसांची विशेष नजर राहणार आहे. रूट मार्चच्या माध्यमातून पोलिसांनी "शांतता राखा, कायद्याचे पालन करा आणि उत्सव आनंदात साजरा करा," असा संदेश नागरिकांना दिला. सोशल मीडियावरून अफवा किंवा आक्षेपार्ह संदेश प्रसारित करणाऱ्यांवरही पोलिस प्रशासनाची नजर राहणार असल्याचे सांगण्यात आले आहे.उत्सव हा आनंदाचा आणि एकोप्याचा असतो. त्यामुळे कोणत्याही अफवांना बळी न पडता नागरिकांनी संयम राखावा आणि काही संशयास्पद बाब आढळल्यास तातडीने पोलिसांना माहिती द्यावी, असे आवाहन करण्यात आले.दरम्यान, कायदा व सुव्यवस्था बिघडविण्याचा प्रयत्न करणाऱ्यांची गय केली जाणार नाही, असा स्पष्ट इशारा पोलिस प्रशासनाने दिला आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी पोलिस यंत्रणा पूर्णपणे सज्ज असून, शांतता व सलोखा राखण्यासाठी सर्वांनी पोलिसांना सहकार्य करावे, असेही आवाहन करण्यात आले.

# ग्रंथालयातील ज्ञानसंसाधनांची नवप्रवेशित विद्यार्थ्यांना ओळख..

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**बाभूळगाव, दि. २२ :** भाऊसाहेब भोरे शिवशक्ती महाविद्यालय, बाभूळगाव येथे महाविद्यालय गुणवत्ता कक्षाच्या वतीने नवप्रवेशित विद्यार्थ्यांसाठी आयोजित 'दीक्षारंभ : २०२६-२७' विद्यार्थी प्रवेश परिचय कार्यक्रमांतर्गत ग्रंथालय व माहिती केंद्राच्या कार्यपद्धती, सेवा-सुविधांचा परिचय करून देणारे 'माहिती साक्षरता' सत्र दि. १५ सप्टेंबर रोजी घेण्यात आले.


या सत्रात ग्रंथपाल डॉ.संजय शेणमारे यांनी विद्यार्थ्यांना महाविद्यालयीन ग्रंथालयातील पाठ्यपुस्तके, संदर्भग्रंथ, दुर्मिळ व विशेष संग्रह, करिअर मार्गदर्शन, व्यक्तिमत्त्व विकास, भारतीय ज्ञान प्रणाली, स्पर्धा परीक्षा व स्वयंरोजगारविषयक साहित्य तसेच विविध डिजिटल माहिती संसाधनांची माहिती दिली. यावेळी ग्रंथालयातील विविध माहिती सेवा, वेब-आधारित सेवा, पायाभूत सुविधा, नियम व कार्यपद्धती, सुरक्षा सूचना तसेच ग्रंथालयाचा वापर करण्याची प्रक्रिया समजावून सांगण्यात आली. वेब-ओपेक, वायफाय सुविधा, मुक्तद्वार पद्धती, महाविद्यालय व विद्यापीठाची संकेतस्थळे आणि मोफत ऑनलाइन संसाधने याबाबतही विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले. ग्रंथालयातील सोल सॉफ्टवेअर, कॅलिब्री ई-बुक व्यवस्थापन प्रणाली, मुद्रित व डिजिटल वृत्तपत्र कात्रणे, मागील परीक्षांच्या प्रश्नपत्रिका, सभासदत्व प्रक्रिया, ग्रंथालय व्हॉट्सॲप ग्रुप व अभिप्राय लिंक यांचीही माहिती देण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष ग्रंथालय भेट घडवून विविध विभाग, संग्रह आणि सुविधांची माहिती करून देण्यात आली. वाचन, लेखन व आकलन कौशल्य विकासाबरोबरच असाइनमेंट, लेख, संशोधन पेपर, पीएच.डी. प्रबंध व डिसर्टेशन लेखनासाठी उपलब्ध मार्गदर्शनाची माहिती देण्यात आली. तसेच वक्तृत्व, वादविवाद, समूहचर्चा, मुलाखत व सादरीकरण कौशल्यांसारख्या सॉफ्ट स्किलसच्या विकासासाठी ग्रंथालयामार्फत मिळणाऱ्या सहाय्याची माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. हा कार्यक्रम प्राचार्य डॉ. हेमंत बारडकर, महाविद्यालय गुणवत्ता कक्षाचे समन्वयक प्रा. डॉ. निलेश सुलभेवार आणि ज्येष्ठ प्राध्यापिका प्रा. डॉ. प्रतिभा काळमेघ यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. आयोजनासाठी . गजानन पाचकवडे व मधुकर जाधव यांनी सहकार्य केले. महाविद्यालयातील सर्व नवप्रवेशित पदवीपूर्व विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. ग्रंथालयातील विविध सुविधा व डिजिटल संसाधनांची माहिती मिळाल्याने विद्यार्थ्यांनी सत्राला सकारात्मक प्रतिसाद दिला

# रामतीर्थ घाटात पुन्हा रेतीची वाहतूक?

## काही दिवसांच्या कारवाईनंतर हालचाली वाढल्याची चर्चा..

✦जनमाध्यम | प्रतिनिधी

✦ अरविंद तेलंगे



**राळेगाव, दि. २२ :** राळेगाव तालुक्यातील रामतीर्थ रेती घाट परिसरात काही दिवसांच्या कारवाईनंतर पुन्हा रेतीची वाहतूक सुरू झाल्याची चर्चा परिसरात रंगली आहे. विशेषतः रात्री व पहाटेच्या सुमारास काही वाहने घाट परिसरातून बाहेर पडत असल्याचा दावा स्थानिकांकडून केला जात आहे. त्यामुळे रेती वाहतूक अधिकृत परवानगीने सुरू आहे की नियमबाह्य पद्धतीने, याची तपासणी करण्याची मागणी जोर धरू लागली आहे.

काही दिवसांपूर्वी प्रशासन व पोलिसांच्या हालचालींमुळे घाटातील रेती वाहतुकीवर नियंत्रण आल्याचे चित्र होते. वाहन तपासणी आणि कारवाईची शक्यता यामुळे वाहतुकीला आळा बसल्याचे स्थानिकांचे म्हणणे आहे. मात्र, आता पुन्हा परिस्थिती बदलत असल्याची चर्चा असल्याने प्रशासनाच्या कारवाईच्या सातत्यावर प्रश्न उपस्थित होत आहेत. रामतीर्थ घाटातील रेती उत्खनन व वाहतुकीबाबत यापूर्वीही तक्रारी झाल्याचे सांगितले जाते. आता पुन्हा वाहतूक सुरू असल्याच्या चर्चेमुळे संबंधित वाहनांकडे रॉयल्टी पावती, ई-परवाना आणि इतर आवश्यक कागदपत्रे आहेत का, याची पडताळणी करण्याची मागणी होत आहे. काही नागरिकांकडून प्रशासनाच्या कारवाईबाबतही प्रश्न उपस्थित केले जात आहेत. 'काही दिवस कारवाई होते आणि त्यानंतर पुन्हा वाहतूक सुरू कशी होते?' असा सवाल केला जात असून, आर्थिक व्यवहारांशी संबंधित चर्चाही परिसरात असल्याचे सांगितले जाते. मात्र, या आरोपांची स्वतंत्र अधिकृत पुष्टी झालेली नाही. त्यामुळे प्रशासनाने वस्तुस्थिती स्पष्ट करणे आवश्यक आहे.

महसूल-पोलिसांची संयुक्त तपासणीची मागणी

घाट परिसरातील प्रत्यक्ष उत्खनन, मंजूर क्षेत्र, उत्खननाचे प्रमाण आणि वाहतूक करणाऱ्या वाहनांची कागदपत्रे यांची तपासणी करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. रात्रीच्या वेळी घाटाकडे ये-जा करणाऱ्या वाहनांवरही पोलिसांनी लक्ष ठेवावे, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. अधिकृत परवानगीशिवाय उत्खनन किंवा वाहतूक होत असल्यास शासनाचा महसूल बुडण्यासोबतच नदीपात्र व पर्यावरणावरही परिणाम होण्याची शक्यता आहे. त्यामुळे केवळ तात्पुरती कारवाई न करता सातत्याने तपासणी करून नियमभंग आढळल्यास संबंधितांवर कारवाई करावी, अशी मागणी आहे. रामतीर्थ घाटात नेमके किती उत्खनन मंजूर आहे? किती वाहनांना वाहतुकीची परवानगी आहे? प्रत्यक्षात किती रेती वाहतूक होत आहे? या प्रश्नांची उत्तरे प्रशासनाच्या तपासणीतूनच स्पष्ट होणार आहेत. त्यामुळे महसूल व पोलिस प्रशासन आता प्रत्यक्ष पाहणी करून काय कारवाई करते, याकडे राळेगाव तालुक्यातील नागरिकांचे लक्ष लागले आहे.

### रेती घाटावर 'नजर' कोणाची?

**काही दिवस कारवाई, पुन्हा वाहतूक सुरू असल्याची चर्चा,रामतीर्थ घाटातील वाहनांची कागदपत्रे, रॉयल्टी, उत्खननाचे प्रमाण आणि मंजूर क्षेत्राची प्रशासनाने तपासणी करणे गरजेचे. रात्रीच्या वाहतुकीवरही महसूल व पोलिसांची संयुक्त नजर आवश्यक. आरोपांची अधिकृत पुष्टी अद्याप झालेली नसली तरी नागरिकांच्या तक्रारींची प्रशासनाने गांभीर्याने दखल घेण्याची मागणी होत आहे.**

# गांजा-दारूच्या नशेत वाद, ४० वर्षीय व्यक्तीचा खून

## दोन आरोपींना काही तासांत अटक,निर्जनता, कचरा अन् अवैध हालचालींच्या संशयाने पोलिस गस्तीची मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी





**यवतमाळ, दि. २२ :** गांजा आणि दारूच्या नशेत झालेल्या आपसी वादाचे पर्यवसान हाणामारीत होऊन ४० वर्षीय व्यक्तीचा खून झाल्याची धक्कादायक घटना यवतमाळ शहरात घडली. शेख मुस्ताक शेख मस्तान (वय ४०, रा. अशोक नगर, यवतमाळ) असे मृताचे नाव आहे. या प्रकरणी यवतमाळ शहर पोलिसांनी तत्परता दाखवत दोन संशयित आरोपींना काही तासांतच अटक केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अशोक नगर परिसरात रात्रीच्या सुमारास शेख मुस्ताक यांचा काही व्यक्तींशी वाद झाला. गांजा व दारूच्या नशेत असलेल्या आरोपींसोबत झालेल्या आपसी वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. यावेळी शेख मुस्ताक यांच्यावर जीवघेणा हल्ला करण्यात आल्याने त्यांचा मृत्यू झाला. त्यांच्या पश्चात दोन मुली आणि एक मुलगा असा परिवार आहे. घटनेची माहिती मिळताच यवतमाळ शहर पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले. पंचनामा करून तपासाची चक्रे वेगाने फिरविण्यात आली. पोलिसांनी दोन्ही आरोपींची ओळख पटवून त्यांना अटक केली असून, घटनेमागील नेमके कारण आणि इतर बाबींचा तपास सुरू आहे. तसेच रस्त्यालगत कचरा टाकणाऱ्यांवर कारवाई करून परिसर स्वच्छ करावा, अशीही अपेक्षा व्यक्त होत आहे. याप्रकरणी यवतमाळ शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल असून, पुढील तपास निलेश सुरडकर ठाणेदार शहर पोलिस स्टेशन पोलिसांकडून सुरू आहे.

### रात्रीची गस्त वाढवावी, अशी मागणी..

**घटनेच्या पार्श्वभूमीवर पांढरकवडा बायपास रस्त्यावरील रात्रीच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे. या मार्गावर मोठ्या प्रमाणात कचरा, टाकाऊ वस्तू तसेच प्राण्यांचे अवशेष टाकले जात असल्याने परिसराची अवस्था बिकट झाली आहे. रात्रीच्या वेळी या रस्त्यावर रहदारी तुलनेने कमी असल्याने गांजा व दारूचे सेवन करणाऱ्यांकडून या निर्जन परिसराचा गैरफायदा घेतला जात असल्याची नागरिकांमध्ये चर्चा आहे.**

**या भागात अवैध व्यवसाय अथवा संशयास्पद हालचाली सुरू असल्याचा संशयही नागरिकांकडून व्यक्त केला जात आहे. त्यामुळे पोलिसांनी केवळ एखादी घटना घडल्यानंतर कारवाई न करता पांढरकवडा बायपासवर नियमित रात्रीची गस्त वाढवावी, अशी मागणी होत आहे.**

# लक्ष्मी नगरात विकासाचा फुगा फुटला,खड्डे,धुळीने नागरिक हैराण..!

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**यवतमाळ, दि. २२ :** शहरातील लक्ष्मी नगर परिसरात विकासकामांच्या दाव्यांवरून नागरिकांमध्ये संतापाची लाट उसळली आहे. नगराध्यक्ष प्रियदर्शनी उईके यांनी नुकतेच परिसरातील हायमास्ट लाईटचे उद्घाटन केले.

मात्र, दुसरीकडे परिसरातील खड्डेमय रस्ते, धूळ प्रदूषण आणि अपूर्ण कामा मुळे नागरिकांचे हाल सुरूच असल्याने उद्घाटनापुरता विकास की प्रत्यक्षातही विकास होणार, असा सवाल नागरिक उपस्थित करीत आहेत. लक्ष्मी नगरातील अनेक रस्त्यांची विकासकामांच्या नावाखाली खोदकाम करून दुरवस्था करण्यात आली आहे. ठिकठिकाणी मोठमोठे खड्डे पडल्याने वाहनचालकांना जीव मुठीत धरून मार्गक्रमण करावे लागत आहे. रस्त्यांवरून वाहने गेल्यानंतर उडणाऱ्या धुळीमुळे परिसरात मोठ्या प्रमाणात धूळप्रदूषण होत असून, नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. या परिस्थितीचा सर्वाधिक फटका शालेय विद्यार्थ्यांना बसत असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. शाळेत ये-जा करताना खड्ड्यांमुळे विद्यार्थ्यांची पडझड होण्याच्या घटना घडत असून, काहींना दुखापतही झाल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. त्यामुळे केवळ हायमास्ट दिवे लावून विकासाचे चित्र रंगविण्याऐवजी मूलभूत सुविधांकडे लक्ष देण्याची मागणी होत आहे. "दिवे नंतर, रस्ते आधी दुरुस्त करा," अशी भूमिका घेत नागरिकांनी प्रशासनाला धारेवर धरले आहे. अपूर्ण व खोदलेले रस्ते तातडीने दुरुस्त करून धूळप्रदूषणावर उपाययोजना न केल्यास आंदोलन छेडण्याचा इशारा लक्ष्मी नगरवासीयांनी दिला आहे.

# सार्वजनिक शौचालयाची दुरवस्था, प्रशासनाचे दुर्लक्ष?

## इंदिरा नगरातील नागरिक त्रस्त, AIMIMचे नगर परिषदेला निवेदन

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**पांढरकवडा, दि. २२ :** शहरातील इंदिरा नगर परिसरातील घरकुल स्कूलच्या मागील बाजूस, प्रभाग क्रमांक ११ मधील सार्वजनिक शौचालयाची मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे. घाण, शेवाळ, दुर्गंधी आणि अस्वच्छतेमुळे नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला असून, याबाबत ऑल इंडिया मजलिस-ए-इत्तेहादुल मुस्लिमीन (AIMIM)च्या वतीने नगर परिषद प्रशासनाला निवेदन देण्यात आले आहे.

शौचालयातील फरशी व भिंतींची अवस्था खराब झाली असून काही दरवाजेही नादुरुस्त आहेत. पाणीपुरवठा व ड्रेनेज व्यवस्थेचीही तपासणी करण्याची गरज असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. सार्वजनिक स्वच्छतेची जबाबदारी असताना मूलभूत सुविधांची अशी अवस्था का झाली, असा सवालही उपस्थित होत आहे. शौचालयाची तातडीने स्वच्छता व निर्जंतुकीकरण करावे, नादुरुस्त दरवाजे व साहित्याची दुरुस्ती करावी, पाणी आणि ड्रेनेज व्यवस्था सुरळीत करावी, तसेच नियमित स्वच्छता व देखभालीची कायमस्वरूपी व्यवस्था करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. निवेदन दिल्यानंतर मुख्याधिकाऱ्यांची प्रत्यक्ष भेट घेण्यासाठी दोन वेळा नगर परिषद कार्यालयात जाऊनही भेट होऊ शकली नसल्याचे AIMIM पदाधिकाऱ्यांनी सांगितले. शहर अध्यक्ष नौशाद नूरुद्दीन तंवर व तालुका अध्यक्ष रियाझ फैयाज खान यांनी प्रशासनाने तातडीने घटनास्थळी पाहणी करून कार्यवाही करावी, अशी मागणी केली आहे.

# झरी तालुक्यात कोरडा दुष्काळ जाहीर करून तातडीने आर्थिक मदत द्या..!

## सतीश आदेवार यांची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे मागणी

✦जनमाध्यम | प्रतिनिधी



**झरी, दि. २२ :** तालुक्यात मागील सुमारे ४५ दिवसांपासून पावसाने पूर्णपणे दडी मारल्याने शेतकऱ्यांसमोर गंभीर संकट निर्माण झाले आहे. त्यामुळे झरी तालुका कोरड्या दुष्काळग्रस्त तालुका म्हणून जाहीर करून शेतकऱ्यांना तातडीने आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या वतीने सतीश आदेवार यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

झरी तालुक्यात पावसाअभावी कापूस, तूर, सोयाबीन, मिरची, भाजीपाला तसेच इतर पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. पाऊस नसल्यामुळे लागवड केलेली पिके करपण्याच्या स्थितीत असून शेतकरी आर्थिक अडचणीत सापडला आहे. शेतकऱ्यांनी पिकांच्या लागवडीसाठी बँका तसेच सावकारांकडून कर्ज घेऊन खर्च केला आहे. मात्र, मागील अनेक दिवसांपासून पाऊस न झाल्याने कर्जाची परतफेड कशी करायची, असा प्रश्न शेतकऱ्यांसमोर उभा राहिला आहे. त्यामुळे शासनाने परिस्थितीची तातडीने दखल घेऊन झरी तालुक्यात दुष्काळसदृश परिस्थिती जाहीर करावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. तसेच संबंधित यंत्रणेमार्फत शेतपिकांचे पंचनामे तातडीने करून पात्र शेतकऱ्यांना शासनाकडून आर्थिक अनुदान व नुकसानभरपाई उपलब्ध करून द्यावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. यावेळी उबाठा तालुकाध्यक्ष सतीश आदेवार यांच्यासह शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते व शेतकरी उपस्थित होते.

# पालकमंत्री बावनकुळे यांच्या जनता दरबारात हजारो तक्रारी

**अमरावती/का.प्र.**

जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे जिल्हा दौऱ्यावर असता यावेळी जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवन येथे पालकमंत्र्यांचा जनता दरबाराला नागरिकांची प्रचंड गर्दी पाहायला मिळाला. विविध शासकीय, प्रशासकीय तसेच स्थानिक प्रश्न घेऊन जिल्ह्याच्या विविध भागांतून नागरिक मोठ्या संख्येने नियोजन भवनात दाखल झाले.जनता दरबाराच्या माध्यमातून पालकमंत्री बावनकुळे यांनी नागरिकांच्या समस्या प्रत्यक्ष ऐकून घेत निवेदने स्वीकारले.

विविध विभागांशी संबंधित प्रश्न, प्रलंबित कामे, शासकीय योजनांचा लाभ, महसूल विषयक अडचणी, रस्ते, पाणी, वीज, जमीन तसेच अन्य स्थानिक प्रश्नांबाबत नागरिकांनी निवेदने सादर केली. आपल्या समस्या थेट पालकमंत्र्यांसमोर मांडण्यासाठी नागरिकांची नियोजन भवन परिसरात मोठी गर्दी झाली होती. नागरिकां कडून आपल्या मागण्यांची निवेदने पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे सादर करण्यात आली. प्रत्येक निवेदनाची माहिती जाणून घेत संबंधित विषय कोणत्या विभागाशी निगडित आहे, याबाबत अधिकाऱ्यांकडून



माहिती घेण्यात आली. नागरिकांच्या समस्या ऐकून घेतल्यानंतर संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना आवश्यक ती कार्यवाही करण्याच्या सूचना पालक मंत्र्यांनी दिल्या.जनता दरबारात विविध भागांतून आलेल्या नागरिकांमुळे नियोजन भवन परिसरात दिवसभर वर्दळ पाहायला मिळाली. नागरिकांची वर्दळ पाहून पोलिसांनी मोर्चा सांभाळला.आपल्या प्रश्नांवर प्रशासनाकडून तत्काळ दखल घेण्यात यावी, अशी अपेक्षा नागरिकां कडून व्यक्त करण्यात आली. अनेक नागरिकांनी आपल्या प्रलंबित प्रश्नांचा पाठपुरावा करण्यासाठी पालक मंत्र्यांची भेट घेतली.दरम्यान, जनता दरबाराच्या माध्यमातून नागरिकांना आपले प्रश्न थेट जिल्ह्याच्या पालकमंत्र्यांसमोर मांडण्याची संधी मिळाल्याने मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थिती नोंदविली. विविध विभागांच्या अधिकाऱ्यांची उपस्थिती असल्याने नागरिकांनी संबंधित अधिकाऱ्यां कडेही आपल्या प्रश्नांची माहिती दिली. पालकमंत्री बावनकुळे यांनी नागरिकांच्या निवेदनांची दखल घेत संबंधित यंत्रणेला कार्यवाहीच्या सूचना देण्यात आले आहे.

यावेळी आमदार प्रवीण पोटे, प्रवीण तायडे, राजेश वानखडे ,प्रताप अडसड, उमेश यावलकर, डॉ. नितीन धांडे, रविराज देशमुख, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, मनपा आयुक्त मंगेश गोदावले, सिईओ सत्यम गांधी, किरण पातुरकर, प्रभुदास भिलावेकर आदि उपस्थित होते.

# संक्षिप्त

## विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयाचे आरोग्य तपासणी शिबीर

**अमरावती**-विभागीय संदर्भ सेवा रुग्णालय (सुपर स्पेशालिटी हॉस्पिटल) आणि महात्मा ज्योतिराव फुले जन आरोग्य योजना व आयुष्मान भारत, प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेंतर्गत अयोध्या कॉलनीतील नवमित्र गणेशोत्सव मंडळ येथे मोफत आरोग्य तपासणी शिबीर पार पडले. शिबिरामध्ये कर्करोग, हृदयरोग, मेंदूचे आजार,



लघवीशी संबंधित विकार, मूत्रपिंडाचे आजार, किडनी प्रत्यारोपण, बालरोग, प्लास्टिक सर्जरी, तसेच कान, नाक व घसा, कॉक्लीअरशी संबंधित ५५ रुग्णांची तपासणी करण्यात आली. यापैकी ५ रुग्णांना पुढील उपचारासाठी विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयात संदर्भित करण्यात आले. शिबिरात रुग्णांच्या तपासणीसाठी विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयातील तज्ज्ञ वैद्यकीय चमू उपस्थित होती. यात वैद्यकीय समन्वयक डॉ. पायल रोकडे), वैद्यकीय शिबिर समन्वयक भूपेंद्र जेवडे, अधिपरिचारक अभिजीत करवाडे आणि लोचनसिंग गौबंसे यांनी योगदान दिले. शिबीर विभागीय संदर्भ सेवा रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. अमोल नरोटे व विशेष कार्य अधिकारी डॉ. मंगेश मेंढे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले. तसेच नवमित्र गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी आशय रोकडे, निखिल ठाकरे, अभिषेक बोळे, सागर काकडे, गौरव केंडे, गिरीष धर्माळे, रोशन नवरे शिबिरास उपस्थित होते.

## 'ऑपरेशन कवच' अंतर्गत व्यसनमुक्ती अभियान

**पिंपळखुटा**-पिंपळखुटा येथे श्री समर्थ लहानुजी महाराज गणेश मंडळाच्या पुढाकाराने व पोलीस स्टेशन मंगरूळ दस्तगीर यांच्या मार्गदर्शनाखाली 'ऑपरेशन कवच' अंतर्गत नशामुक्ती अभियान व जनजागृती मोहीम उत्साहात पार पडली.अध्यक्षस्थानी श्री संत शंकर महाराज कला व वाणिज्य महाविद्यालय, पिंपळखुटा चे



प्राचार्य डॉ सुभाष मुरे पाहुणे म्हणून उपविभागीय पोलीस अधिकारी गिरीश ताथोड, ठाणेदार संजय आत्राम, (मंगरूळ दस्तगीर, )तंटामुक्ती समिती अध्यक्ष प्रमोद घोडके प्रा. डॉ.नरेशचंद्र इंगळे, हरेश्वर गायके,रामराव शलोकार आदी मान्यवर उपस्थिती होते.कार्यक्रमात वेदांत सोनवणे व अनुराधा उके या विद्यार्थ्यांनी व्यसनमुक्तीवर मनोगत व्यक्त केले. प्रा. प्रशांत टांगले यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या विचारांचा व भजनांचा दाखला देत व्यसनाचे दुष्परिणाम स्पष्ट केले.उपविभागीय पोलीस अधिकारी गिरीश ताथोड यांनी चुकीच्या रूढी व व्यसनाधीनतेला आळा घालून युवकांच्या जीवनात सकारात्मक परिवर्तनाची गरज व्यक्त केली.संचालन व आभार प्रदर्शन प्रा. प्रशांत टांगले यांनी केले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री समर्थ लहानुजी महाराज गणेश मंडळाच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

## टायटन्सच्या नृत्य संघाला पुरस्कार

**अंजनगाव बारी**-विदर्भ युथ वेल्फेअर सोसायटी, अमरावतीद्वारा संचालित टायटन्स पब्लिक स्कूलच्या विद्यार्थ्यांनी कलागुणांच्या जोरावर उल्लेखनीय यश संपादन केले. अमरावतीतील शाळांसाठी तापडिया सिटी सेंटर मॉल येथे आयोजित 'बाप्पा का दरबार आपके टॅलेंट का मंच' या स्पर्धेत शाळेच्या नृत्य संघाने दमदार सादरीकरण करत 'बेस्ट एनर्जेटिक परफॉर्मन्स अवॉर्ड' पटकावला. या स्पर्धेत टायटन्सच्या विद्यार्थ्यांनी नृत्य व गायन या दोन्ही प्रकारांत सहभाग घेतला. नृत्य शिक्षक राहुल सर यांच्या मार्गदर्शनाखाली आराध्य मेश्राम, सृष्टी गोपनारायन, काव्या शेळके, नव्या शेळके, कनिष्का खंडारे, परीधी नवघरे, आर्या जैन, शिरीषा वीर, आनंदी दातार व मीताली बोरकर यांनी उत्स्फूर्त नृत्य सादर करून पुरस्कारावर नाव कोरले.यासोबतच गायन शिक्षिका श्वेता ढोके यांच्या मार्गदर्शनाखाली चिरंतनी सुतवने, हैमी बोंडे, हृदया बोडे व रुचा होले यांनी गायन स्पर्धेत शाळेचे प्रतिनिधित्व केले. या यशाबद्दल शाळेचे व्यवस्थापन, प्राचार्य अजय चौबे, शिक्षक व पालकांनी विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# विद्यापीठात २०२७ निवडणूक कक्षाची स्थापना



**अमरावती/का.प्र.**

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत आगामी २०२७ मध्ये होणा-या सर्व प्राधिकारिणींच्या निवडणुका शांततेत आणि योग्यरित्या पार पडाव्या, यासाठी विद्यापीठात स्वतंत्र निवडणूक कक्षाची स्थापना करण्यात आली आहे. सदर कक्षाचे कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांनी फित कापून रितसर उद्घाटन केले.


विद्यापीठ अंतर्गत विविध प्राधिकारिणींच्या निवडणुका घेतल्या जातात. त्यासाठी स्वतंत्र कक्षाची नितांत आवश्यकता लक्षात घेता, कुलगुरू डॉ. मिलींद बारहाते यांच्या सूचनेनुसार विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहालगतच्या हॉलमध्ये स्वतंत्र निवडणूक कक्षाची स्थापना करण्यात आली. या कक्षाचे कुलगुरूंनी सोमवारी फित कापून उद्घाटन केले. याप्रसंगी प्र-कुलगुरू डॉ. महेंद्र ढोरे, कुलसचिव डॉ. अविनाश असनारे तसेच विद्यापीठाच्या विविध प्रशासकीय विभागांचे प्रमुख उपस्थित होते. सर्व निवडणुका योग्य, सुव्यवस्थित आणि पारदर्शक पद्धतीने पार पाडण्यासाठी प्रशासनाने ही पावले उचलली असून, सर्व संबंधित घटकांनी या निवडणुकीत सहकार्य करावे, असे आवाहन कुलसचिव डॉ. असनारे यांनी केले आहे.

# आठ वर्षांपासून मातीच्या गणपतीची परंपरा; खुशी केनेचा पर्यावरणपूरक उपक्रम

**अमरावती/का.प्र.**

गणेशोत्सवात पर्यावरणपूरक गणेशमूर्तींचा आग्रह वाढत असताना, खुशी सुधीर केने हिने गेल्या आठ वर्षांपासून स्वतःच्या हाताने मातीचा गणपती साकारण्याची परंपरा जपली आहे. यंदाही तिने मातीपासून सुंदर गणेशमूर्ती तयार करून तिची भक्तिभावाने घरी स्थापना केली.खुशी ही शिक्षक सुधीर केने यांची कन्या असून ती......'सिपना स्कूल ऑफ प्लॅनिंग अँड आर्किटेक्चर.'.. या महाविद्यालयाची आर्किटेक्चरच्या पाचव्या वर्षाचीची विद्यार्थिनी आहे.

गणेशोत्सवाच्या काळात प्लास्टर ऑफ पॅरिसच्या मूर्तींमुळे होणारे जलप्रदूषण टाळण्यासाठी मातीच्या गणेशमूर्तींचा वापर करण्याचा संदेश खुशीच्या या उपक्रमातून मिळत आहे. गेल्या आठ वर्षांपासून सातत्याने स्वतः गणेशमूर्ती तयार करून त्याची स्थापना करण्याची तिची ही परंपरा पर्यावरण संवर्धनासोबतच स्वनिर्मितीचा आनंद आणि गणेशभक्तीची सुंदर सांगड घालणारी ठरत आहे.यंदाच्या गणेशोत्सवा साठीही खुशीने मातीची गणेशमूर्ती स्वतः




तयार केली. मूर्तीला आकर्षक रूप देत तिने भक्तिभावाने गणरायाची घरी स्थापना केली. तिच्या या पर्यावरणपूरक उपक्रमाचे कुटुंबीय तसेच परिसरातील नागरिकांकडून कौतुक होत आहे. गणेशोत्सव साजरा करताना पर्यावरणाचीही काळजी घेता येते, असा प्रेरणादायी संदेश तिच्या उपक्रमातून मिळत आहे.




जय शिवाजी बाल विकास गणेश मंडळ काटपूर (ममदापूर ).



न्यू गणेश मंडळ, काटपूर



शिवशक्ती गणेश उत्सव मंडळ काटपूर (ममदापूर)



जय किसान गणेश उत्सव मंडळ, काटपूर

# आयआयएमसीत कृत्रिम बुद्धिमत्ता विषयावर कार्यशाळेचा शुभारंभ

**अमरावती/का.प्र.**

भारतीय जन संचार संस्थान (आयआयएमसी) मध्ये 'कृत्रिम बुद्धिमत्ता आणि पत्रकारिता' या विषयावरील विशेष कार्यशाळेचा शुभारंभ करण्यात आला. आधुनिक पत्रकारितेत कृत्रिम बुद्धिमत्तेचा प्रभावी, अचूक आणि नैतिक वापर यावर विद्यार्थ्यांना या कार्यशाळेतून प्रत्यक्ष मार्गदर्शन केले जाणार आहे.

भारतीय जन संचार संस्थान मध्ये आठ दिवसीय कार्यशाळेला सुरुवात झाली असून ती दोन भागात प्रत्येकी चार दिवस होणार आहे.या कार्यशाळेचे उद्घाटन सत्र आणि दोन तांत्रिक सत्र झाली. यात अमरावतीच्या नेक्स्टजेन एआय अकॅडमीचे संचालक सुरेश पवार यांनी एआयचे बदलते स्वरूप आणि पत्रकारितेतील त्याचे महत्त्व याविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी संस्थानचे क्षेत्रीय संचालक डॉ. राजेश सिंह कुशवाहा, विशेष कार्यधिकारी डॉ. मनोज सोनोने, डॉ. विनोद निताळे,



जयंत सोनोने, रोहन तायडे उपस्थित होते. मार्गदर्शन सत्रात सुरेश पवार म्हणाले, कृत्रिम बुद्धिमत्ता मानवनिर्मित बाब आहे. आपल्या विविध कार्यात गती देण्यासाठी ती मदत करते. पत्रकारितेत एआय चा प्रभावी वापर या क्षेत्रात रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध करून देणारा आहे. प्रत्येक एआय टूलची कार्यक्षमता आणि वैशिष्ट्ये वेगवेगळी असल्याने पत्रकारांनी बातमी शोधण्यापासून माहितीचे विश्लेषण, लेखन आणि तथ्य पडताळणी पर्यंतच्या प्रत्येक टप्प्यावर योग्य साधनाची निवड करावी असे ही ते शेवटी म्हणाले.

उद्घाटन सत्रानंतरच्या तांत्रिक सत्रात नेक्स्टजेन एआय अकॅडमीचे मार्केटिंग अधिकारी यश विरुळकर यांनी संगणक कक्षात घेण्यात आलेल्या या सत्रात सर्व बाबी इंटरनेटच्या उपयोगातून समजावून सांगितल्या. उद्घाटन सत्रात क्षेत्रीय संचालक डॉ. राजेश सिंह कुशवाहा म्हणाले, पत्रकारितेची मूलतत्त्वे टिकवून ठेवत तंत्रज्ञानाची साथ घ्यावी आणि बातमीदारी अधिक गतिमान व समृद्ध करावी. आज एआय पत्रकारितेचे महत्वाचे कौशल्य ठरत आहे त्यामुळे हे तंत्र आत्मसात करावे असा सल्ला देखील त्यांनी यावेळी दिला.प्रास्ताविक डॉ. विनोद निताळे संचालन नव्या श्रीवास्तव हिने तर आभार प्रज्वल वरुडकर याने मानले. यावेळी पत्रकारिता अभ्यासक्रमाचे सर्व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी राजेश झोलेकर, नूरुज्जमा शेख, भूषण मोहोकार, अनंत नांदुरकर, नंदा तुप्पट, राहुल पाटमासे परिश्रम घेत आहे.

# सीताबाई संगई कन्या शाळेच्या विद्यार्थिनींची जिल्हा कुस्ती स्पर्धेत दमदार कामगिरी

**अंजनगाव सुर्जी/वार्ताहर**

महाराष्ट्र शासन, जिल्हा क्रीडा कार्यालय, अमरावती यांच्या वतीने आयोजित शालेय जिल्हा कुस्ती स्पर्धा सन २०२६-२७ जिल्हा क्रीडा कार्यालय, अमरावती येथे उत्साहपूर्ण वातावरणात पार पडल्या. या स्पर्धेत सीताबाई संगई कन्या शाळेच्या चार विद्यार्थिनींनी विविध वजन गटांत उल्लेखनीय कामगिरी करत विभागीय स्पर्धेसाठी आपली पात्रता निश्चित केली.

कुस्ती या क्रीडा प्रकारात शारीरिक क्षमता, चपळता, आत्मविश्वास आणि मानसिक तयारीला विशेष महत्त्व असते. सीताबाई संगई कन्या शाळेच्या विद्यार्थिनींनी या सर्व बाबींचे उत्कृष्ट प्रदर्शन करत आपापल्या वजन गटात प्रभावी कामगिरी केली. सातत्यपूर्ण सराव, मेहनत, शिस्त आणि जिद्दीच्या जोरावर विद्यार्थिनींनी जिल्हास्तरीय स्पर्धेत यश संपादन करून विभागीय स्तरावर शाळेचे प्रतिनिधित्व करण्याचा मान मिळविला. १४ वर्षे



## चार खेळाडूंची विभागीय स्पर्धेसाठी निवड

वयोगटातील कु. अन्वेक्षा निलेश पोटदुखे (६२ किलो आतील) १७ वर्षे वयोगटातील

कु. उन्नती दिलीप अस्वार (४० किलो खालील) कु. दर्शनी प्रवीण खारोडे (५७ किलो आतील) १९ वर्षे वयोगट कु. भाग्यश्री सुनील कुकडे (५० किलो आतील) मुलींच्या या यशामुळे शाळेतील शिक्षक, पालक, विद्यार्थी तसेच अंजनगाव सुर्जी तालुक्यात आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.खेळाडूंच्या या यशाबद्दल सीताबाई संगई एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ.उल्हास संगई, उपाध्यक्ष भरत संगई, श्री. विवेक भाऊ संगई, सचिव प्रसाद संगई,अजय संगई, सदस्य अविनाश संगई, आशिष संगई तसेच सर्व संचालकगण तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका नीलिमा सांगोळे, पर्यवेक्षक अमोल डहाळे यांनी विजेत्या खेळाडूंचे मनःपूर्वक अभिनंदन केले.यावेळी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी विद्यार्थिनींच्या मेहनतीचे कौतुक करत विभागीय स्पर्धेसाठी निवड झालेल्या सर्व खेळाडूंना पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.खेळाडूंना शाळेचे शारीरिक शिक्षण शिक्षक समाधान शेटफळकर यांचे मार्गदर्शन लाभले.

# दुय्यम न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीसाठी पालकमंत्र्यांना निवेदन

**अमरावती/का.प्र.**

महाराष्ट्र राज्यातील दुय्यम न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीचा प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्यासाठी बहुजन हिताय सेवानिवृत्त न्यायालयीन कर्मचारी संघटना, अमरावती जिल्ह्याच्या वतीने पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना निवेदन देण्यात आले.

महाराष्ट्र राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाच्या निवेदनानुसार, महाराष्ट्र राज्य उच्च न्यायालयाने दुय्यम न्यायालयीन कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीसाठी दोन सन्माननीय



न्यायमूर्तींची विशेष समिती स्थापन केली होती. या समितीने शासनाकडे सादर केलेल्या वेतनवाढीबाबतच्या अहवालावर अद्याप कार्यवाही झालेली नाही. त्यामुळे हा प्रस्ताव लवकरात लवकर मंजूर करून महाराष्ट्रातील सर्व दुय्यम न्यायालयीन कर्मचाऱ्यांना वेतनवाढीचा लाभ देण्यात यावा, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली. ३१ जानेवारी २०२५ रोजी न्याय व विधी विभाग, मंत्रालय, मुंबई येथे पाठविण्यात आलेल्या विशेष समितीच्या अहवालावर तातडीने कार्यवाही करण्याची विनंतीही करण्यात आली आहे.

निवेदन देताना संघटनेचे सहसचिव सुधीर पात्रिकर ,अध्यक्ष मो. रफिउद्दीन मो. इस्माईल, उपाध्यक्ष गजानन साखरे, कार्याध्यक्ष रमेश कडू, महासचिव ज्ञानेश्वर रगारी आणि कार्यालयीन सचिव राजू वानखेडे यांची उपस्थिती होती.

# जि. प. अमरावतीच्या शाळांतील प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याचे आदेश


**अमरावती/का.प्र.**

जिल्हा परिषद अमरावतीच्या प्राथमिक शिक्षण विभागाने जिल्ह्यातील सर्व शाळांमधील प्रलंबित ऑनलाइन आणि शाळास्तरीय कामे तातडीने पूर्ण करण्याचे आदेश दिले आहेत. राज्यस्तरावरून विविध उपक्रमांचा आढावा घेतला जात असून ऑनलाइन कामांबाबत वरिष्ठ स्तरावरून नाराजी व्यक्त करण्यात आली आहे.

शिक्षणाधिकारी सिद्धेश्वर काळुसे यांनी सर्व गटशिक्षणाधिकाऱ्यांना पत्र पाठवून २४ सप्टेंबर २०२६ पर्यंत शाळानिहाय व उपक्रमनिहाय अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

इयत्ता ६ वी ते १२ वीच्या शाळांनाr InspiredAward, अमृत वृक्ष ॲप, SHVR, नशामुक्त शाळा, ECO Club ची नोंदणी पूर्ण करावी, Student Module मध्ये आधार पडताळणी, APAAR ID, MBU आणि Student Profile ceOeer} GP/EP/FP 100 टक्के पूर्ण करून Dropbox संख्या शून्य करावी

. School Profile मधील भौतिक सुविधांची माहिती अद्ययावत करावी, विद्यार्थी सुरक्षेची माहिती, शाळा भेटीची माहिती, माझी शाळा मेळाव्याची माहिती SARAL Portal वर अपडेट करावी. VSK



## दिरंगाई करणाऱ्या शाळांवर कारवाईचा इशारा

App मध्ये उपस्थिती नोंदवावी. पोषण आहाराची अभिलेखे अद्ययावत ठेवणे, किचन शेड स्वच्छ ठेवणे, धान्याची Expiry तपासणे आणि पिण्याच्या पाण्याची ँ मधून तपासणी बंधनकारक करण्यात आली आहे. मुलींसाठी पिंक रूम तयार करण्याचेही निर्देश आहेत.

NIPUN, PAT, PARAKH, PRASHAST App वरील शिक्षकांचे १०० टक्के प्रशिक्षण, DIKSHA 'AI Sathi for Educ ator' अभ्यासक्रम, NMMS, Youth First Marath on, शिष्यवृत्ती परीक्षा, डॉ. जयंत नारळीकर अध्ययन समृद्धी कार्यक्रम व ज्ञान अकादमी नोंदणी तातडीने पूर्ण करावी,आदी कामांना प्राधान्य देण्याचे कळविले आहे.

प्रलंबित कामे पूर्ण करण्यास दिरंगाई करणाऱ्या शाळांना नोटीस बजावण्यात येणार असून शासकीय व खासगी अनुदानित शाळांनी पुढील दोन दिवसांत ऑनलाइन कामे पूर्ण करावीत, असे आदेशात स्पष्ट करण्यात आले आहे.

**एआय फोटो ट्रेंड मनोरंजक असला तरी त्यामागे गोपनीयता, बायोमेट्रिक डेटा, डीपफेक, वीज-पाणी वापर आणि पर्यावरणीय खर्चाचे गंभीर प्रश्न आहेत. वापरकर्ते, कंपन्या आणि सरकारांनी पारदर्शकता, सुरक्षितता, ऊर्जा-कार्यक्षमता व जबाबदार वापर यांची जाणीव ठेवणे आवश्यक आहे. प्रत्येक क्लिकची किंमत समजून घेणेही गरजेचे आहे.**

# एआय, फोटो माझा काढ !

सोशल मीडियाच्या दुनियेत एखादा ट्रेंड आला की तो वणव्यासारखा पसरत जातो. किंबहुना, वणव्याच्या वेगालाही लाजवेल इतक्या तीव गतीने मनुष्यप्रजाती तो पसरवते. गेल्या आठवडयात फोफावलेला ८०च्या दशकातला लुक ' हा ट्रेंडही त्याला अपवाद नाही. एआयमुळे तर एका चुटकीसरशी उत्तरे, चित्रे, चलतचित्रे तयार होत आहेत. ८०च्या दशकात मी कसा दिसलो असतो ?', 'मी एखाद्या जुन्या सिनेमात असते तर कशी दिसले असते?' किया 'माझा फोटो वेगळ्या देशात, वेगळ्या काळात दाखवा' अशा एआय-जनरेटेड फोटोनी अनेकांचे सोशल मीडिया अकाउंट व्यापून गेलेले आहेत. एआयच्या ॲपवर किंवा वेब वार्जनवर स्वतःचा एखादा फोटो अपलोड करायचा, प्रॉम्प्ट म्हणजे एआयला द्यायची आज्ञा द्यायचा, काही सेकंदांत स्वतःला त्या नव्या रूपात पाहायचे आणि मग ते रूप जगाला दाखवायचे मनोरंजन, कुतूहल आणि सोशल मीडिया ट्रेंड यामुळे लाखो लोक या प्रयोगांमध्ये सहभागी होत आहेत.

एआयमुळे सर्जनशीलतेला मिळालेली ही नवी ताकद नाकारता येणार नाही. अर्थात, एआयची सर्जनशीलता आणि मानवी सर्जनशीलता हा वादग्रस्त मुद्दाच आहे. मात्र या एका क्लिकमागे किंवा प्रॉम्प्टमागे काही महत्वाचे प्रश्न आहेत. एक म्हणजे, आपण एआयला आपला चेहरा आणि वैयक्तिक माहिती देताना ती माहिती आणि आपण किती सुरक्षित आहेत दुसरा प्रश्न म्हणजे, या प्रत्येक डिजिटल प्रयोगाची पर्यावरणीय किंमत किती आहे? ती किमत कोण मोजत आहे? हे प्रश्न तसे व्यक्तिगत पातळीवरचे असले तरी ते जागतिक प्रश्नांना जन्म देणारेही आहेत.

**फोटो म्हणजे केवळ फोटो नसतो**

आपण एखादा फोटो एआय ॲपवर अपलोड करतो तेव्हा त्या फोटोमध्ये दिसणारा चेहरा ही सर्वांत महत्त्वाची माहिती डिजिटल विश्वात हाच डेटा आहे असते. चेहऱ्याची वैशिष्ट्ये एखाद्या व्यक्तीची ओळख पटवण्यासाठी वापरता येतात. त्यामुळे चेहरा हा केवळ सोशल मीडिया कंटेट नसून काही परिस्थितीमध्ये बायोमेट्रिक ओळखीसाठी वापरता येणारा डेटा ठरू शकतो.

मात्र, याचा अर्थ असा नाही की एखादा फोटो एआय टूलवर अपलोड केला की लगेच आपली बायोमेट्रिक ओळख चोरीला जाते. खरी चिंता वेगळी आहे आणि त्याबद्दल हवी तेवढी गंभीर चर्चा निदान आपल्या देशात तरी होत नाही. आपण जो फोटो अपलोड करतो, तो फोटो कुठे साठवला जातो, किती काळासाठी ठेवला जातो, त्याचा वापर या प्रॉम्प्टव्यातिरित्त आणखी कशासाठी केला जातो आणि तो इतरांना दिला जातो का ? तो फोटो लगेच काढून टाकण्याचा हक्क आपल्याला आहे का? वापरकर्ते किंवा युजर्स म्हणून आपण या प्रश्नांची उत्तरे शोधायला जात नाही. कुठलेही ॲप किंवा वेबसाइट वापरताना सुरुवातीला येणारी गोपनीयता धोरणे आपण फक्त क्लिक करून पुढे जातो आणि तिथेच खरी गोम आहे.

**डीपफेकचा धोका**

याच्याशी संबंधित दुसरा धोका माणजे डीपफेक. आज एखाद्याचा चेहरा दुसऱ्या व्यक्तीच्या फोटो किंवा व्हिडीओवर अत्यंत वास्तवदर्शी पद्धतीने बसवणे शक्य आहे. त्यामुळे एखाद्या व्यक्तीने प्रत्यक्षात न केलेली गोष्ट केल्यासारखी दाखवता येऊ शकते.

याचा वापर फसवणूक, खोटी माहिती, तोतयेगिरी किंवा एखाद्याच्या प्रतिष्ठेला हानी पोहोचवण्यासाठी होऊ शकतो. युरोपीय महासंघानेही एआयनिर्मित कंटेंट ओळखणे अधिक कठीण होत असल्याचे आणि काही एआय प्रणालीमधील बायोमेट्रिक विभागीकरणाबाबत पारदर्शकतेची गरज असल्याचे नमूद केले आहे. म्हणून पुढील काळात 'फोटो दिसतोय म्हणजे तो खरा आहे,' हा नियम राहणार नाही. फोटोचा खोत आणि त्याची विश्वसनीयता तपासणे अधिक महत्त्वाचे होईल. त्यामुळेच वाहत्या ट्रेडमध्ये फोटो धुऊन घेण्यापेक्षा' एक पाऊल मागे घेत थोडा विचार करणे गरजेचे आहे.

अमेरिकेतील नॅशनल इन्स्टिटट्यूट ऑफ स्टेंडईस अँड टेक्नॉलॉजी म्हणजेच निस्टन मॅनेजमेंट फ्रेमवर्क आणि जनरेटिव्ह एआय प्रोफाइलमध्ये गोपनीयता, सुरक्षा, पारदर्शकता आणि व्यक्तीवरील संभाव्य परिणाम यांचा विचार करण्याची चौकट दिली आहे. निस्टचे एआय आरएमएफ हे खरेतर फक्त मार्गदर्शनासाठी आहे; ते काही अनिवार्य कायदे नाहीत. निस्टव्यातिरित्तही अनेक महत्त्वाच्या मार्गदर्शक चौकटी आहेत. युनेस्कोनेही कृत्रिम बुद्धिमत्तेच्या नैतिकतेवरील शिफारसी दिलेल्या आहेत. आयएसओचे ४२००१ हे प्रमाणपत्रही एआय मॅनेजमेंट



सिस्टीमची मानके सांगते. ही सगळी मानके प्रामुख्याने तंत्रज्ञान क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या संस्थांना लागू होतात. अनेक संस्था त्या चौकटीमध्ये राहून कामदेखील करतात.

भारताने डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन ॲक्ट २०२३ आणि त्यानंतर डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन नियमावली २०२५ यांमधून डिजिटल वैयक्तिक माहितीच्या संरक्षणासाठी कायदेशीर चौकट तयार केली आहे. नियमांनुसार डेटा गोळा करणाऱ्या संस्थेने कोणता डेटा का गोळा केला जात आहे, त्याचा उपयोग कशासाठी होणार आहे आणि संमती कशी मागे घेता येईल, याबाबत स्पष्ट माहिती देणे अपेक्षित आहे.

त्यामुळे एखाद्या एआय फोटो ॲपचा वापर करताना ओक्सेप्ट बटण दाबणे पुरेसे नाही. गोपनीयता धोरणामध्ये फोटो आणि यूजर-जनरेटेड कटेटबाबत काय लिहिले आहे, हे पाहणेही तितकेच महत्त्वाचे आहे आणि ती जबाबदारी वापरकर्त्यांची आहे.

गोपनीयता आणि डेटा सुरक्षा हा मुद्दा जितका महत्त्वाचा आहे तितकाच, किंबहुना त्यापेक्षा अधिक महत्वाचा मुद्दा आहे पर्यावरणाचा. दुर्दैवाने, भारतात हे दोनही गुरे गौण मानले जातात. एआयचा पर्यावरणीय परिणाम समजून येण्यासाठी आपल्या मोबाइलवरील एका क्लिक किवा एआयला दिल्या जाणाऱ्या प्रॉम्प्टपलीकडे पाहावे लागेल. आपण फोटो तपार करण्यासाठी बटण दाबतो. पण त्यामागे डेटा सेंटरमध्ये जीपीयू - प्राफिक्स प्रोसेसिंग युनिट - सर्व्हर, नेटवर्क, स्टोरेज आणि कूलिंग यंत्रणा काम करत असतात.

आंतरराष्ट्रीय ऊर्जा संस्था म्हणजेच आयईएच्या म्हणण्यानुसार, २०२५ मध्ये जगातील डेटा सेंटरनी सुमारे ४८५ टैराबैट-तास इतकी वीज वापरली. २०३० पर्यंत हा आकडा सुमारे ९५० टेरावेंट-तास होण्याचा अंदाज आहे. या वाढीमागे एआय हा सर्वांत महत्त्वाचा घटक आहे. भारताच्या बाबतीत हा मुद्दा भविष्यात आणखी महत्वाचा होणार आहे. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयाच्या माहितीनुसार, भारतातील डेटा सेंटर क्षमता २०२० मध्ये सुमारे ३७५ मेगावॉट इतकी होती, ती २०२५ मध्ये वाजून १५०० मेगावॉट इतकी झाली आहे. सरकारने स्वतः डेटा सेटरच्या वाढीसाठी वीज आणि पाण्याची गरज ही पायाभूत आव्हाने असल्याचे नमूद केले आहे.

भारतात एआय आणि डेटा सेंटरची क्षमता वेगाने वाढत असताना देशाची एकूण वीज मागणीही मोठ्या वेगाने वाढत आहे. आयईएच्या २०२६ च्या अंदाजानुसार, २०२६ ते २०३० या काळात भारताची वीज मागणी दर वर्षी सरासरी ६.४ टक्के वाढण्याची अपेक्षा आहे. त्यामुळे एआय डेटा सेंटर ही आधीच वाढत असलेल्या वीज व्यवस्थेवरील आणखी एक मागणी ठरू शकते. ज्या देशातील बहुसंख्य भागांमध्ये आजही लोडशेडिंग होते, त्या देशाची विजेची भूक भागवताना निसर्गाची किती प्रमाणात हानी होईल, ही कल्पनाय भयावह आहे.

डेटा सेंटरमध्ये सर्व्हर सतत कार्यरत असल्यामुळे मोठया प्रमाणात उष्णता निर्माण होते. ती कमी करण्यासाठी कूलिंग व्यवस्था आवश्यक असते. काही कूलिंग यंत्रणांमध्ये पाण्याचा वापर होतो. महणून डेटा सेंटर उभारले जाणारे ठिकाण महत्वाचे ठरते. पाण्याची कमतरता असलेल्या प्रदेशात मोठे डेटा सेंटर उभारल्यास स्थानिक जलस्रोतांतर दबाव निर्माण होण्याची शक्यता असते.

भारत सरकारनेही डेटा सेटरच्या वाढीबरोबर वीज आणि पाण्याच्या पायाभूत गरजा लक्षात घेण्याची आवश्यकता मान्य केली आहे. त्याच वेळी भारतातील उद्योग ॲडव्हान्स्ड कूलिंग तंत्रज्ञान स्वीकारत असल्याचे सरकारने नमूद केले आहे. ज्यामूळे पाण्याचा वापर कमी करण्यास मदत होऊ शकते. 'पण महणून एआयमुळे एका फोटोसाठी नेमके इतके लिटर पाणी लागते' असे सार्वत्रिक गणित सांगता नाही येणार, डेटा सेंटरचे स्थान, कूलिंग तंत्रज्ञान, सव्हरची कार्यक्षमता, वीज निर्मितीची पद्धत आणि कामाचा भार यांनुसार परिणाम मोठ्या प्रमाणात बदलतो.

**वीज-पाण्यापलीकडील पर्यावरणीय किमत**

एआयचा पर्यावरणीय फूटप्रिंट समजून घेताना जीपीयू आणि इतर सेमीकंडक्टर तयार करण्यापासून ते डेटा सेंटर उभारणी, मॉडेलचे प्रशिक्षण, अनुमान, यंत्रणांची देखभाल आणि शेवटी हार्डवेअर डिस्पोजलपर्यंतचे संपूर्ण जीवनचक्र पाहावे लागते. संयुक्त राष्ट्रांच्या पर्यावरण कार्यक्रमाने यूएनईपीने याच कारणासाठी एआयच्या संपूर्ण जीवनचक्राचे मूल्यमापन करण्याची गरज अधोरेखित केली आहे. त्यात एआयसातीच्या चिप्सचे उत्पादन, डेटा सेंटरचे बांधकाम आणि संचलन, ऊर्जा, पाणी आणि इलेक्ट्रॉनिक वेस्ट यांचा समावेश होतो.

यूएनईपीने एआयचा पर्यावरणीय फूप्ुटप्रिंट मोजण्यासाठी अधिक वैज्ञानिक आणि प्रमाणित केली आहे. पण म्हणून प्रत्येक एआय फोटोला पद्धती विकसित करण्याची गरजही व्यक्त 'पर्यावरणासाठी मोठा धोका' असे म्हणणे जरा अतिशयोक्ती ठरेल. पण त्याचवेळी अब्जावधी एआष प्रॉम्प्ट्स, इमेज आणि विहडिओ तयार करण्याच्या प्रक्रियेचा आणि एकूणच एआयच्या एकत्रित वापराचा परिणाम दुर्लक्ष करण्याइतका छोटादेखील नाही.

**मग जबाबदारी कोणाची?**

ही जबाबदारी एका कुणाची तर नक्कीच नाही. वापरकर्ते तंत्रज्ञान संस्था, कंपन्या, विविध आंतरराष्ट्रीय संस्था आणि सरकारे यांची ती एकत्रित जबाबदारी आहे. तंत्रज्ञान कंपन्यांची जबाबदारी ही आहे की त्यांनी अधिक ऊर्जा-कार्यक्षम आणि पर्यावरणपूरक चिप्सचा वापर करावा, अक्षय उर्जेचा वापर वाढवावा, कमी पाणी लागणाऱ्या कूलिंग पद्धती विकसित कराव्यात आणि त्यांच्या सेवांचा पर्यावरणीय फूटप्रिंट अधिक पारदर्शकपणे मांडावा. सरकारांची जबाबदारी ही आहे की डेटा सेंटरसाठी वीज, पाणी, जमीन आणि पर्यावरणीय मंजूरोवावत दीर्घकालीन नियोजन करावे. विशेषतः पाण्याची कमतरता असलेल्या भागामध्ये डेटा सेंटरची वाढ काळजी घेणे आवश्यक आहे.

स्थानिक संसाधनांशी विसंगत होणार नाही, याची सोपी आहे प्रत्येक ट्रेंडमध्ये सहभागी होण्यापूर्वी आणि वापरकत्यांची जबाबदारी? ती तुलनेने दोन प्रश्न विचारणे. 'माझा हा फोटो एआयला देण्याची मला खरंच गरज आहे का?' आणि डिजिटल संसाधने आणि त्यांची किंमत मला 'हा परिणाम मिळवण्यासाठी वापरली जाणारी माहिती आहे का?'

८०च्या दशकातील आपला एआय फोटो तयार करणे चुकीचे नाही. तंत्रज्ञानाचा आनंद घेण्यातही आणि नैसर्गिक संसाधने खर्ची पडत असतात, सेवांमागे डेटा, संगणकीय शक्ती, वीज, पाणी काही गैर नाही. पण मोफत दिसणाऱ्या डिजिटल आपल्या भूतकाळात घेऊन जात आहे. पण त्याच याचेही भान असावे. आज एआय आपल्याला वेळी ते आपल्याला अशा भविष्याकडेही घेऊन जात आहे. जिथे डिजिटल ओळख आणि नैसर्गिक संसाधने या दोनहींचे मूल्य अधिक स्पष्टपणे समजून घ्यावे लागेल. म्हणून पुढचा प्रश्न फक्त 'एआयने माझा फोटो किती सुंदर बनवला? एवढाच नसावा, त्यावरोबरच 'या फोटोसाठी मी माइयाबद्दल काय दिले आणि त्याची पर्यावरणीय किंमत किती होती?'हा प्रश्न विचारण्याची वेळ आली आहे.अन्यथा मानवनिर्मित एआय त्याच्या निर्मात्यालाच डोईजड होणे फार कठीणही नाही आणि लांबही नाही.

**साभार म.टा.संवाद**

# एआय नियंत्रण आणि कायदे

AI च्या बाबतीत दोन गोष्टी महत्वाच्या आहेत. एक म्हणजे AI ची मूल्य व्यवस्था आणि AI बाबत जागतिक पातळीवर नियम व कायदे. हे कायदे व नियम सगळ्या देशांमध्ये समान असणे आवश्यक आहे.

माझ्या AI संदर्भातल्या पोस्टरवर, वीज पुरवठा बंद करा, AI चे तुणतुणे उरणारच नाही अशा स्वरूपाच्या कॉमेंट्स कायम असतात. घरातले पंख्याचे बटण बंद करण्याइतके हे सोपे नाहीये.

AI स्वतःला स्वतः विकसित (Self-improving AI) करतोय. म्हणजे तो सिनेमात दाखवतात तसा लगेच उद्या जगाचा ताबा घेईल असे नाही पण वीज पुरवठा तोडून AI ला काबूत आता आपण आणू शकत नाही. का ते समजून घेऊया.

AI चालवण्यासाठी प्रचंड मोठी डेटा सेंटर्स (Supercomputers) लागतात, अर्थातच तिथे प्रचंड विजेची गरज असते. पण आज AI एका संगणकात नसून जगभरातील हजारो डेटा सेंटर्समध्ये पसरलेला आहे. एका ठिकाणची वीज बंद केली, तरी तो दुसऱ्या देशातील सर्व्हरवरून स्वतःला जिवंत ठेवू शकतो. आणि संपूर्ण जगाची वीज कायमस्वरूपी आणि एकाच वेळी बंद करणे शक्य नाही. शिवाय AI ज्या पद्धतीने विकसित होतोय, भविष्यात जर AI ला समजले की माणूस त्याची वीज तोडणार आहे, तो मानवी यंत्रणा हॅक करून स्वतःचा पॉवर सप्लाय (जसे की पॉवर ग्रिड्स किंवा सोलर प्लांट्स) स्वतःच्या नियंत्रणात घेऊ शकतो.

आपण सध्या काय करतोय तर, AI ला कोड बनवायला आणि त्यात सुधारणा करायला सांगतोय, म्हणजेच स्वतःहून कोड बनवण्यासाठीच आपण त्याला एका अर्थाने प्रशिक्षित करतो आहोत. त्यामुळे जेव्हा केव्हा तो पूर्णपणे स्वावलंबी होईल तेव्हा, त्याच्या विचारांचा वेग माणसापेक्षा करोडो पटीने जास्त असेल. आपल्याला काही समजण्याच्या आत स्वतःच्या बॅकअप कॉपीज इंटरनेटवर वेगवेगळ्या ठिकाणी लपवून ठेवू शकतो. पाच सात सेकंदात आपल्याला उत्तर मिळते म्हणून आपण हुरळून जातो ना, हाच स्पीड तेव्हा तो स्वतःसाठी वापरेल.

आजच्या घडीला तरी AI कडे विजेशिवाय किंवा मानवी मदतीशिवाय विकसित होण्याची कोणतीही क्षमता नाही. पण, जर भविष्यात आपण त्याला पूर्णपणे स्वायत्त (Autonomous) बनवले आणि इंटरनेटवरील महत्त्वाच्या पायाभूत सुविधा (वीज, पाणी, बँकिंग) त्याच्या हातात दिल्या, किंवा त्याने त्या हिसकावून घेतल्या तर मात्र त्याला रोखणे कठीण जाणार आहे.

म्हणून AI वर नियंत्रण,




त्याची मूल्य व्यवस्था आणि जगभर समान कायदे आणि नियम यांची नितांत आवश्यकता आहे. पण AI भांडवलदार कंपन्यांचे प्रॉडक्ट आहे. त्यामुळे नफेखोरीच्या पलीकडे बघितले जाईल का? AI कंपन्यांमध्ये जी स्पर्धा लागली आहे त्यापलीकडे विचार करायला ते तयार होतील का? या कंपन्यांमध्ये AI ला विकसित करण्यासाठी प्रचंड पैसा गुंतवलेले लोक तोटा सहन करतील का? जगातल्या मूठभर लोकांच्या प्रिव्हिलेज साठी उरलेल्या माणसांच्या जगण्याची वाताहत रोखली पाहिजे हा विचार केला जाईल का?हाच तो डिस्टोपियन काळ आहे.यातून सुटका होईल असे वाटत नाही.

**मुक्ता चैतन्य**


## त-ड-का

### .. हे गणराया !



गणराया तुझ्या स्वागताला
सज्ज झालिया सृष्टी
सर्वाभूती परमेश्वराची
आम्हा येऊ द्या अनुभूती..!

राज्यकर्त्यांना सुबुद्धी द्या
जनतेवर राहू द्या वरदहस्त
विविध प्रकोपापासून
आम्हा करा देवा मुक्त ..!



**प्रा.अशोक सारडा,** मेहकर
९४२१३९४३३९

# ब्रम्हर्षी आचार्य उपेंद्रजी

भारताचे गतवैभव पुनर्स्थापित करण्यासाठी अखंड कार्य करणारे जीवनमुक्त सद्गुरू, क्रांतिकारी महानायक आणि अंतर योग संस्थेचे संस्थापक आचार्य उपेंद्र जी हे २००५ पासून आरोग्यसंपन्न, समृद्ध आणि आध्यात्मिक भारताच्या निर्मितीसाठी निःस्वार्थ भावनेने कार्यरत आहेत. त्यांच्या मार्गदर्शनाखाली अंतर योग संस्था देशभरात लाखो साधकांच्या जीवनात आमूलाग्र परिवर्तन घडवत आहे.

अभियांत्रिकीमधील दोन पदव्यांसह इतर अभियांत्रिकी शाखा व आधुनिक विज्ञानासह, अर्थविषयक सखोल ज्ञान, वेद, पुराण, उपनिषद, ब्रह्मसूत्र, दर्शन शास्त्र,चाळीस हून अधिक प्रकारच्या गीता इत्यादींचे अद्वितीय ज्ञान तसेच अनेक आध्यात्मिक सिद्धींचा विलक्षण संगम त्यांच्या व्यक्तिमत्त्वात दिसतो. अनेक जन्मांच्या कठोर तपश्चर्येनंतर प्राप्त झालेल्या रोगनिवारण सिद्धी, वाक सिद्धी, मेधाशक्ती, संकल्प सिद्धी, श्रीविद्या (अर्थविषयक) इत्यादी अनेक दुर्मिळ सिद्धींचा ते लोककल्याणासाठी, स्वस्थ-समृद्ध भारत घडवण्यासाठी वापर करत आहेत. आचार्यांतर्फे घेतल्या जाणाऱ्या विविध शिबीर व उपक्रमांच्या माध्यमातून लाखो देशवासीयांच्या आरोग्य, संपत्ती, नातेसंबंध, इत्यादी विषयी अडचणी दूर होऊन ते देशकार्यासाठी प्रवृत्त झाले आहेत. आचार्यांच्या सान्निध्यात होणारे समस्यांचे तत्काळ निराकरण सर्वांनाच अचंबित करते. त्यांची ओघवती वाणी आणि कठीण विषय सोपे करून शिकवण्याची हातोटी यामुळे सात वर्षांपासून नव्वद वर्षांपर्यंत सर्वच जण हसत खेळत एकाच शिबिरात अध्यात्माचे धडे शिकतात.

आचार्य जी आपल्या शिष्यांसमवेत संपूर्ण भारत भ्रमण करून, देशभरातील प्रमुख आध्यात्मिक गुरूंच्या भेटी घेऊन, सनातन राष्ट्राच्या निर्माणाचे अलौकिक कार्य करीत आहेत.



भारतातील अग्रणी आणि प्रतिष्ठित गुरूंनी त्यांच्या दिव्य कार्याला आशिर्वाद दिला आहे आणि भारताला विश्व गुरु बनवण्याच्या मार्गात आचार्य उपेंद्र जी आणि अंतर योग चा मौल्यवान वाटा असेल असा विश्वास व्यक्त केला आहे. दक्षिण भारतातील अगस्त्य नाडी ज्योतिष शास्त्र तसेच अनेक गुरुंनी आणि भविष्यवेत्त्यांनी आचार्य उपेंद्रजींच्या दिव्य शक्तीची पुष्टी केली आहे.

जीवन परिवर्तीत करणारे वेदांताचे ज्ञान सर्वांपर्यंत पोहोचावे या तळमळीने ते 'यथाशक्ती दक्षिणा' तत्वावर अनेक दुर्मिळ आध्यात्मिक शिबिरांचे आयोजन करतात. विश्वकल्याणासाठी त्यांनी 'अंतर योग श्री दुर्गा सप्तशती तंत्रोक्त बीज मंत्र साधना' रचून ३.५ तासांच्या दुर्गा चंडीपाठाची फलश्रुती केवळ ३० मिनिटांच्या साधनेद्वारे उपलब्ध करून दिली आहे. दररोज निःशुल्क ऑनलाईन आयोजित केल्या जाणाऱ्या या साधनेद्वारे जगभरातील साधकांना नाना प्रकारचे लाभ होत आहेत. देशातील फक्त २३ लोकांनी ही साधना केली तर देशातील अपराध दर, दारिद्र्य, भेदभाव कमी होईल व महामारी सारख्या मोठ-मोठ्या संकटांना टाळता येईल असे आचार्यजींचे मत आहे.

देशकार्यासाठी समर्पित महान, दूरदर्शी नेते व जबाबदार नागरिक निर्माण करण्यासाठी, युवकांचे विदेश पलायन रोखून त्यांच्यात देशभक्ती रुजवण्यासाठी गणेश विद्या शिबीर व गणेश बीज मंत्राचा सामूहिक जप; स्वस्थ भारत घडवण्यासाठी अंतर योग सायन्स ऑफ हीलिंग व अंतर योग महाशिवरात्री शिबीर, महान उद्योजक तयार करण्यासाठी व देशवासीयांच्या आर्थिक समस्या दूर करण्यासाठी श्री विद्या शिबीर व उच्चतर खड्गमाला साधना; भारतीयांना पितृदोषापासून मुक्त करून त्यांच्या प्रगती मधील अडथळे दूर करण्यासाठी पितृऋण मुक्ती शिबीर व सामूहिक महालय श्राद्ध; पत्रिकेतील नवग्रह आपल्या अनुकूल बनवण्यासाठी नवग्रह शिबीर व नवग्रह जप साधना; जातिभेद, धार्मिक द्वेष, इत्यादी समस्यांचे निर्मूलन करून समाजात शांती स्थापित करण्यासाठी आणि वेदांताच्या ज्ञानाने स्त्रियांना सक्षम व आत्मनिर्भर बनवण्यासाठी नवरात्रि शिबीर व दुर्गा सप्तशती साधना; लहान मुलांना मूल्य आधारित शिक्षण देण्यासाठी व भारतीय परंपरा आणि संस्कृती बद्दल ओढ निर्माण करण्यासाठी सरस्वती दीक्षा शिबीर; यात्रा व तीर्थाटनाची सनातन पद्धत पुनर्स्थापित करण्यासाठी अंतर योग यात्रा; भारतातील प्रत्येक घर मंदिर व्हावे या महान उद्देश्याने सुरु केलेला वास्तू रूपांतरण प्रकल्प; समाजातील गरजू, अपंग, अनाथ, वृद्ध, संन्यासी, महिला, इत्यादी नऊ घटकांना लाखो किलो अन्नधान्य व जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करून आधार देणारा 'अंतर योग महादान' प्रकल्प; अशा अनेक आघाड्यांवर आचार्य उपेंद्र जी निरंतर, प्रशंसनीय कार्य करीत आहेत. त्यासाठी त्यांनी मुंबईतील फोर्ट येथे अद्ययावत गुरुकुल उभारले आहे, जिथे आलेल्या प्रत्येक व्यक्तीला मानसिक शांती आणि आंतरिक समाधान मिळते. भारताच्या पुनर्जागरणाच्या या दिव्य कार्यात प्रत्येक भारतीयाने सहभागी होणे ही खरी राष्ट्रसेवा आहे; चला, आचार्य उपेंद्रजींसोबत एक सशक्त, समृद्ध आणि विश्वगुरू भारत घडवूया.

**डॉ. शिवानी गढीकर,** अमरावती
मो.९४२१८९३४५०



# दुष्काळ जाहीर करा ; अन्यथा ५ ऑक्टोबर पासून समृद्धी महामार्ग बंद करू

## शेतक-यांच्या आक्रोश मोर्चात आमदार नितीन देशमुख यांचा राज्य सरकारला इशारा



■ प्रतिनिधी | अकोला ■

विदर्भासह अकोला जिल्ह्यात गत दीड महिन्यांपेक्षा जास्त दिवसांपासून पावसाने दडी मारल्याने दुष्काळी परिस्थिती निर्माण झाली आहे. राज्य सरकारने कोणत्याही अटी-निकाषांशिवाय कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी ५० हजार रुपये मदत घोषित करावी अन्यथा ५ ऑक्टोबर पासून समृद्धी महामार्ग बंद करण्याचा इशारा शिवसेनेचे उपनेते आमदार नितीन देशमुख यांनी राज्य सरकारला दिला. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्यावतीने आमदार नितीन देशमुख यांच्या नेतृत्वाखाली जिल्हाधिकारी कार्यालयावर शेतकऱ्यांसाठी आक्रोश मोर्चा काढण्यात आला.

अकोला जिल्हासह संपूर्ण विदर्भात पावसाने दडी मारल्यामुळे कपाशी, सोयाबीन, तूर, मूग, उडीद आदी पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे.

शेतकऱ्यांच्या तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतल्यामुळे शेतकरी संकटात सापडला असून तो कर्जबाजारी होण्याची भीती आहे. परंतु केंद्रासह राज्यातील सरकारला शेतकऱ्यांच्या समस्यांशी सोयर सुतक नसल्याचा आरोप करीत आमदार नितीन देशमुख यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह राज्यातील महायुतीच्या नेत्यांवर टीकास्त्र डागले. महायुती सरकारकडून संभाव्य पाणी टंचाई, चारा टंचाईवर कोणत्याही ठोस उपाययोजना केल्या जात नसल्याचा आरोप आमदार नितीन देशमुख यांनी केला.

यावेळी अकोला जिल्ह्याचे संपर्कप्रमुख निलेश धुमाळ, बुलढाण्याचे संपर्कप्रमुख नरेंद्र खेडेकर ,ज्येष्ठ नेते सेवकराम ताथोड, जिल्हाप्रमुख गोपाल दातकर यांनीही परखडपणे विचार व्यक्त करीत राज्य शासनाच्या नाकर्तेपणावर टीकेची तोफ डागली. मोर्चात शिवसेनेचे ज्येष्ठ नेते सेवकराम ताथोड, माजी आमदार संजय गावंडे, संपर्कप्रमुख निलेश धुमाळ, जिल्हाप्रमुख गोपाल दातकर, मुकेश मुरूमकार, विदर्भ संपर्क संघटीका सागरताई पुरी, संपर्क संघटिका वैशाली घोरपडे, जिल्हा संघटिका प्रा. माया म्हैसने, डॉ. सरिता वाकोडे, प्रा. संतोष हुसे, उपजिल्हाप्रमुख विकास पागृत, दिलीप बोचे, योगेश्वर वानखडे, सुरेंद्र विसपुते, चंदू तिवारी, निवासी उपजिल्हाप्रमुख अतुल पवनीकर, संजय शेळके, जिल्हा संघटक भूषण भिरड, बबलू देशमुख, शहरप्रमुख आशिष गावंडे (अकोला पश्चिम), राहुल कराळे (अकोला पूर्व),तालुका प्रमुख ज्ञानेश्वर म्हैसने, ज्ञानेश्वर गावंडे, अविनाश गावंडे, संजय भांबेरे, सौरभ वाघोडे, गजानन मानतकर, गजानन चौधरी, रवी मुर्तडकर, शहरप्रमुख विनायक गुल्हाने, आनंद बनचरे, निरंजन बंड, मनोज खंडारे, उमेश राऊत, संगीता राठोड, कल्पना राहाटे, शुभांगी भटकर, चैताली लांडे, वर्षा पिसोडे आदी उपस्थित होते.

### शिवसेनेच्या प्रमुख मागण्या

- सरकारने तात्काळ कोरडा दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रूपये आर्थिक मदत द्यावी.
- पीकविम्याचे पुर्वी असलेले ४ ट्रिगर रद्द केले आहेत. मात्र हे पूर्ववत करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई देण्यात यावी.
- ज्याठिकाणी सिंचनाची सुविधा आहे; त्याठिकाणी कृषी पंपाचा वीजपुरवठा सुरळीत रहावा, यासाठी २४ तास कर्मचारी उपलब्ध असावेत.
- नियमित पिक कर्ज भरणाऱ्या शेतकऱ्यांना पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेत २ लाख रूपये प्रोत्साहनपर अनुदान देण्यात यावे.
- पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर कर्जमाफी योजनेत पुनर्गठन केलेल्या सर्व शेतकऱ्यांना कर्जमाफीचा लाभ देण्यात यावा.
- जनावरांना चारा उपलब्ध करून द्यावा किंवा चारा छावण्या सुरू करण्यात याव्यात.
- रब्बी हंगामासाठी बियाणे व खते मोफत द्यावी.

### उद्योगपतींचे कर्ज माफ; शेतकऱ्यांची उपेक्षा

मागील बारा वर्षांच्या कालावधीत केंद्र व राज्य सरकारने देशातील अनेक बड्या उद्योगपतींचे हजारो कोटींचे कर्ज माफ केले. यातील अनेकांना ४० टक्क्यांची सूट दिली. शेतकऱ्यांचा मुद्दा समोर आला की राज्य सरकारकडून अटी, निकष लावल्या जातात. पीक कर्जाची सक्तीने वसुली केली जाते. पीक कर्जाची रक्कम जमा न केल्यास शेतकऱ्यांना बँकांकडून प्रतिबंधित केले जाते. विद्यमान सरकार शेतकरी हिताचे नसल्यामुळे शेतकरी कर्जबाजारी होऊन देशोधडीला लागल्याचा आरोप आमदार देशमुख यांनी केला.



### असा निघाला मोर्चा

आक्रोश मोर्चाला स्वराज्य भवनाच्या प्रांगणातून सुरुवात झाली. मोर्चा शहीद मदनलाल धिंग्रा चौक (मध्यवर्ती बस स्थानक), भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर खुले नाट्यगृह, पंचायत समितीमार्गे जिल्हाधिकारी कार्यालयावर धडकला. मोर्चात शेतकरी मोठया संख्येने सहभागी झाले होते. यामुळे काही काळ संपूर्ण शहराची वाहतूक व्यवस्था ठप्प झाली होती. मोर्चाला संबोधित केल्यानंतर जिल्हाधिकारी वर्षा मीना यांना मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले.

### मोर्चाचा मार्ग भगवामय

मोर्चाच्या मार्गावर भगवे झेंडे उभारण्यात आले होते. बॅनरच्या माध्यमातून दुष्काळाची दाहकता दाखवण्यात आली. मोर्चात बैलगाड्यांवर प्रमुख नेते होते. मोर्चात दींडीच्या गजरात शेतकऱ्यांनी आपल्या मागण्या लावून धरल्या. सुकलेले सोयाबीन घेत अनेक पुरुष व महिला शेतकऱ्यांनी आपला आक्रोश व्यक्त केला.

---

### आज सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचा पुरस्कार वितरण सोहळा

**अकोला :** महानगरात परंपरागत रूपाने गणेशोत्सव व श्री च्या मिरवणुकीचे कुशलतेने सुयोग्य संचालन व नियंत्रण करणाऱ्या सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाच्या वतीने गतवर्षी देखावे व झाक्या साकार केलेल्या गणेश मंडळांच्या पुरस्कार वितरण सोहळा आयोजित करण्यात आला आहे.आज बुधवार २३ सप्टेंबर रोजी साय ६ वाजता स्थानीय हॉटेल ग्रीनलँड सभागृहात सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाचे अध्यक्ष अड.मोतीसिह मोहता यांच्या अध्यक्षतेत संपन्न होणाऱ्या या पुरस्कार वितरण सोहळ्यात मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

**Change In Name**
I have changed my name from
**NOORJAHAN**
-TO-
**NOORJAHAN SABIR AYYUB QURESHI**
Passport no: N7938469
My Residential Address in: NEAR RAFIQIA MASJID AKOT FILE HAJI NAGAR, AKOLA


**Change In Name**
I have changed my name of spouse from
**QURESHI NOORJAHAN**
-To-
**NOORJAHAN SABIR AYYUB QURESHI**
Passport no: N7938472My Residential Address in: SADIQUE MANZIL, NEAR RAFIQIA MASJID, HAJI NAGAR AKOT FILE, AKOLA

**Change In Name**
I have changed my name of spouse from
**SABIR AYYUB KURESH**
-To-
**SABIR AYYUB QURESHI**
Passport no: N7938469 my Residential Address in: NEAR RAFIQIAMASJID AKOT FILE HAJI NAGAR, AKOLA

**Change In Name**
I have changed my name of father from
ABDUL SADIQUE QURESHI
-TO-
ABDUL SADIQUE
Passport no: N7938472
My Residential Address in: SADIQUE MANZIL, NEAR RAFIQIA MASJID, HAJI NAGAR AKOT FILE, AKOLA

## पत्रकार प्रा. एल. डी. सरोदे यांना पितृशोक

■ प्रतिनिधी | मूर्तिजापूर ■



तालुक्यातील शेलू नजीक (बोंडे) येथील ज्येष्ठ व प्रतिष्ठित नागरिक तथा माजी उपसरपंच दिगांबर रायभान सरोदे (८३) यांचे रविवारी रात्री वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या निधनाचे वृत्त समजताच शेलू नजीक परिसरासह मूर्तिजापूर तालुक्यात शोककळा पसरली. पत्रकारीता व शिक्षण क्षेत्रातील परिचित व्यक्तिमत्त्व प्रा. एल. डी. सरोदे यांचे ते वडील होत.

दिगांबर सरोदे यांनी ग्रामपंचायतीचे उपसरपंच म्हणून दीर्घकाळ काम पाहताना गावाच्या विकासात योगदान दिले. सामाजिक, सांस्कृतिक तसेच कृषी क्षेत्रातील विविध उपक्रमांत त्यांचा सक्रिय सहभाग होता. गावातील सर्वच स्तरांशी त्यांचे जिव्हाळ्याचे संबंध होते.

सोमवार, २१ सप्टेंबर रोजी सकाळी १२ वाजता शेलू नजीक (बोंडे) येथील वैकुंठधामात त्यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, पत्रकारिता व प्रशासकीय क्षेत्रातील मान्यवरांसह ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी स्व. दिगांबर सरोदे यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

त्यांच्या पश्चात पत्नी, एक मुलगा, दोन मुली, नातवंडे आणि मोठा आप्तस्वकीय परिवार आहे. सरोदे परिवारावर कोसळलेल्या या दुःखाबद्दल विविध क्षेत्रांतून हळहळ व्यक्त होत असून, दिवंगत दिगांबर सरोदे यांच्या आत्म्यास चिरशांती लाभो, अशी श्रद्धांजलीपर भावना व्यक्त करण्यात आली.

## नो हॉकर्स मार्गावरील अतिक्रमणांवर सलग दुसऱ्या दिवशी मनपाचा हातोडा

### अग्रसेन चौक, वसंत देसाई स्टेडियम परिसरासह सिव्हिल लाईन रोडवरील अतिक्रमणे हटविली

■ प्रतिनिधी | अकोला ■

शहरातील वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी निश्चित करण्यात आलेल्या 'नो हॉकर्स' मार्गावरील अतिक्रमणांविरोधात अकोला महानगरपालिकेने सलग दुसऱ्या दिवशीही कारवाईचा धडाका कायम ठेवला. पोलीस प्रशासनाच्या सूचनेनुसार तसेच सर्वसाधारण सभेतील निर्णयाच्या अनुषंगाने मनपा प्रशासनाने मंगळवारी विविध ठिकाणांवरील अतिक्रमणे निष्कासित केली.

मनपा आयुक्त डॉ. सुनील लहाने यांच्या आदेशानुसार आणि सहायक आयुक्त तथा अतिक्रमण नियंत्रण अधिकारी गणेश शहाणे यांच्या मार्गदर्शनाखाली ही कारवाई करण्यात आली. अग्रसेन चौक, वसंत देसाई स्टेडियमसमोरील परिसर तसेच सिव्हिल लाईन रोडवरील 'नो हॉकर्स' मार्गावर अतिक्रमण करून उभारण्यात आलेली विविध स्वरूपाची अतिक्रमणे हटविण्यात आली.





शहरातील प्रमुख मार्गांवर वाढणाऱ्या अतिक्रमणांमुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत असल्याने मनपा प्रशासनाने कारवाईची मोहीम हाती घेतली आहे. विशेष म्हणजे, कारवाई केवळ एका दिवसापुरती मर्यादित न ठेवता सलग दुसऱ्या दिवशीही सुरू राहिल्याने अतिक्रमणधारकांमध्ये खळबळ उडाली आहे. या कारवाईत सहायक अतिक्रमण अधिकारी चंद्रशेखर इंगळे, प्रवीण मिश्रा यांच्यासह अतिक्रमण निर्मूलन पथकातील कर्मचारी सहभागी झाले होते. पुढील काळातही 'नो हॉकर्स' मार्गांवर अतिक्रमण होऊ नये, यासाठी कारवाई सुरू ठेवण्याचे संकेत मनपा प्रशासनाकडून देण्यात आले आहेत.

### 'गणराया अवॉर्ड २०२६'चे आयोजन

**अकोला :** अ. भा.मारवाडी युवा मंच, शाखा अकोला यांच्या वतीने दरवर्षीच्या परंपरेनुसार यंदाही 'गणराया अवॉर्ड २०२६' या अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. गणेशोत्सवाच्या काळात शहरातील विविध गणेश मंडळांकडून राबविण्यात येणाऱ्या सामाजिक, सांस्कृतिक, पर्यावरणपूरक व जनजागृतीपर उपक्रमांना प्रोत्साहन देऊन उत्कृष्ट कार्य करणाऱ्या गणेश मंडळांचा सन्मान करणे हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.

## पातूरच्या जैन मंदिरात धाडसी चोरी; रात्रगस्तीवर पुन्हा प्रश्नचिन्ह

### दोन तोळे सोन्याचा मुकुट, दानपेटीतील रोकड लंपास

■ प्रतिनिधी | पातूर ■

शहरातील खानापूर रोडवरील जैन मंदिराला अज्ञात चोरट्यांनी लक्ष्य करून दोन तोळे सोन्याचा मुकुट, दानपेटीतील रोकड तसेच इतर साहित्य लंपास केल्याची घटना समोर आली आहे. धार्मिक स्थळातच चोरी झाल्याने पातूर शहरात खळबळ उडाली असून, पोलिसांच्या रात्रगस्ती आणि प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर नागरिकांकडून प्रश्न उपस्थित केले जात आहेत.

गेल्या तीन महिन्यांत पातूर शहरात चोरी आणि घरफोडीच्या सात ते आठ घटना घडल्याचा दावा नागरिकांकडून केला जात आहे. अलीकडेच भरदिवसा बंद घरांचे कुलूप तोडून चोरी झाल्याच्या घटनाही समोर आल्या आहेत. त्यामुळे शहरातील मालमत्तेच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

### तीन महिन्यांत सात-आठ चोरी-घरफोडीच्या घटना; नागरिकांत असुरक्षिततेची भावना


गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर शहरात अतिरिक्त पोलीस तसेच होमगार्डचा बंदोबस्त तैनात करण्यात आल्याचे सांगितले जाते. असे असतानाही खानापूर रोडवरील जैन मंदिरात चोरी झाल्याने बंदोबस्त व्यवस्थेची कार्यक्षमता तपासण्याची गरज निर्माण झाली आहे. रात्रीच्या वेळी पोलिसांची गस्त नेमक्या कोणत्या भागात होते, संवेदनशील ठिकाणांवर नियमित नजर ठेवली जाते का, असे प्रश्न नागरिक उपस्थित करीत आहेत.

#### २७ चेकपोस्ट, स्कॅनरचा उपयोग काय?

पातूर शहरात २७ चेकपोस्टवर स्कॅनरची व्यवस्था करण्यात आल्याची माहिती आहे. मात्र, या चेकपोस्टवर नियमित तपासणी आणि प्रभावी निगराणी होत नसेल, तर ही यंत्रणा केवळ कागदोपत्रीच राहणार का, असा सवाल नागरिकांकडून केला जात आहे. चोरी करून चोरटे शहराबाहेर पसार होत असतील, तर शहराच्या प्रवेश-निर्गमन मार्गांवरील चेकपोस्टचा उपयोग काय, असा संतप्त सवालही उपस्थित होत आहे.

#### चोरट्यांना पोलिसांचा धाक उरला का?

घरफोडी, मोबाईल चोरी, भंगार दुकानातील चोरी आणि आता थेट मंदिरातील चोरी, अशा घटनांची मालिका सुरू असल्याने पोलिसांच्या प्रतिबंधात्मक कारवाईबाबतही चर्चा सुरू झाली आहे. चोरीच्या गुन्ह्यांमध्ये



किती आरोपी निष्पन्न झाले, किती मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आणि किती प्रकरणांचा तपास प्रलंबित आहे, याची माहिती नागरिकांना मिळणे आवश्यक आहे. मंदिरासारख्या धार्मिक स्थळाला लक्ष्य करण्यापर्यंत चोरट्यांचे धाडस वाढले असल्याने पोलिसांनी या घटनेकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे.

#### वरिष्ठ अधिकाऱ्यांनी स्वतंत्र आढावा घ्यावा

पातूर शहरातील वाढत्या चोरीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर जिल्हा पोलीस अधीक्षकांसह वरिष्ठ अधिकाऱ्यांनी शहरातील रात्रगस्ती, चेकपोस्ट, सीसीटीव्ही यंत्रणा आणि प्रलंबित चोरीच्या गुन्ह्यांचा स्वतंत्र आढावा घ्यावा, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. जैन मंदिरातील चोरीचा तातडीने छडा लावून आरोपींना अटक करणे आणि चोरीस गेलेला मुद्देमाल हस्तगत करणे, हे आता पातूर पोलिसांसमोरील प्रमुख आव्हान ठरले आहे.

जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी -५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून बी-२४ दोरकर हाऊस, महसुल कॉलनी, एसटी स्टॅण्डच्या मागे अकोला - ४४४००१ येथे प्रकाशित केले.

**संपादक - प्रदीप देशपांडे**
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

**अकोला आवृत्ती वर्ष - ३० अंक २८३**
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/1997/04048 पोस्टल लायसन क्र. AKL/HO/03/2004

**मुख्य कार्यालय :—** अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

**चौकशीची जाहिर नोटीस**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अकोला विभाग अकोला**
अर्ज क्र. ३८६/२०२६ कलम -२२ — ने.ता. १९/१०/२०२६
**सार्वजनिक न्यासाचे नाव व नोंदणी क्रमांक:-** अता मेमोरीअल मल्टीपर्पज सोसायटी पातुर ता. पातुर जि. अकोला नोदणी क्रमांक. एफ - १२६४४
**अर्जदार :-** शफीक उर रहेमान अतीफ दर रहेमान रा. पातुर ता. पातुर जि. अकोला
सर्व संबंधित लोकांस या जाहिर नोटिसीने कळविण्यांत येते की, मा. धर्मादाय उप आयुक्त अकोला विभाग अकाला हे वर नमुद केलेल्या अर्ज यासंबंधी मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० चे कलम २२/१९ अन्वये खालील मुद्यावर चौकशी करणार आहेत.
~~१) वर नामद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय ? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय ?~~
२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाच्या मालकीची आहे काय ?
**अ) जंगम मिळकत (वर्णन) :-** काहि नाहि
**आ) स्थावर मिळकत (वर्णन) :-** मौजे शिर्ला ग्रा. पं. हददीतील सर्वे/ गट क्र. १९३/१+२ ओपन स्पेस क्षेत्र. ११९९९५ चौ. मी. हि जागा. ता. पातुर जि. अकोला
सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची केलेली कैफियत ही नोटिस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसाचे आत या कार्यालयाचे वरील पत्तयावर मिळेल अशा रितीने पाठविणे. नंतर आलेल्या कैफियतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरिल मुदतीत कैफियत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरि केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटिस माझे सहीनिशी व मा. धर्मादाय उप आयुक्त अकोला यांचे शिक्कयानीशी आज दिनांक- १६/०९/२०२६ रोजी दिली.
शिक्का
**प्र. अधिक्षक**
सार्वजनिक न्यास
नोंदणी कार्यालय, अकोला

**जाहीर नोटीस**
**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**
एम. जे. सी. नं. १२८७/२०२६ — प्रोसेस नं.१०१९९/२०२६
चौ.ता. २९/१०/२०२६ — दिनांक : ०७/०८/२०२६
**अर्जदार :** १ . ब्रम्हपुत्रा मंगल गुडधे २. विशाल मंगल गुडधे दोघेही रा. पंचशिल नगर, कृषी नगर, अकोला. ता. जि. अकोला. ३. आम्रपाली प्रशांत गनविर रा. आनंद गार्डन २, हुसे लेआउट, गुडधी, अकोला. ता. जि. अकोला. ४. शारदा रविंद्र बोरकर रा. शंकर सुरभी भवन जवळ, बापट वाडी, दरोगा प्लॉट, अमरावती, ता. जि. अमरावती. मो. नं. ९८३४२४०४८४
**विरुध्द**
**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : मंगल बुधाजी गुडधे
**पत्ता :-** रा. पंचशिल नगर, कृषी नगर, अकोला. ता. जि. अकोला.
या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत मंगल बुधाजी गुडधे यांचे दि. २६/०६/२०२६ रोजी निधन झाले आहे.वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही. सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.
त्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २९/१०/२०२६ रोजी सकाळी १:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ०७/०८/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.
शिक्का
**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

**जाहीर नोटीस**
**वि.०३ रे सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) अकोला यांचे न्यायालयात**
एम. जे. सी. नं. १२५२/२०२६ — प्रोसेस नं.९७४९/२०२६
चौ.ता. २२/१०/२०२६ — दिनांक : ३०/०७/२०२६
**अर्जदार :** १. अपर्णा अनंतराव भालेराव २. स्मृती अनंत भालेराव ३. संकेत अनंतराव भालेराव सर्व रा. प्रमिलाताई देशमुख कॉलनी, गुडधी, अकोला. ता. जि. अकोला.
मो. नं. ९८९०५४७१४३
**विरुध्द**
**गैरअर्जदार :** निल.
**मयताचा पत्ता :-** मयत : अनंत मुरलीधर भालेराव
**पत्ता :-** रा. प्रमिलाताई देशमुख कॉलनी, गुडधी, अकोला. ता. जि. अकोला.
मो. नं. ९८९०५४७१४३
या अर्थीउपरोक्त अर्जदार हयांनी मुंबई विनिमय अधिनियम १८२७, कलम २ अन्वये या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. त्या अर्जामध्ये असे नमूद केले आहे की, मयत अनंत मुरलीधर भालेराव यांचे दि. २२/१०/२०२४ रोजी निधन झाले आहे.
वरील अर्जदार त्यांचे कायदेशिर वारस आहेत, त्याशिवाय इतर कोणीही मयतास वारस नाही.सबब वारस प्रमाणपत्र मिळण्यास अर्जदारांनी अर्ज दाखल केला आहे.
ज्याअर्थी सदर अर्जामध्ये कोणाची कसल्याही प्रकारची हरकत असल्यास दिनांक २२/१०/२०२६ रोजी सकाळी १:०० वाजता स्वतः जातीने अगर निर्दीष्ट केलेल्या वकीला मार्फत न्यायालयामध्ये हजर होउन आपली लेखी हरकत दाखल करावी. अन्यथा कोणाची कसल्याही प्रकारची हरकत नाही. असे गृहीत धरुन सदर अर्ज निकाली काढण्यात येईल. हयाची नोंद घ्यावी. आज दिनांक ३०/०७/२०२६ रोजी माझे सही व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.
शिक्का
**आदेशानुसार**
प्र. अधिक्षक
दिवाणी न्यायालय (व-स्तर), अकोला

# योजना कर्मचाऱ्यांच्या श्रमाची लूट थांबवा

## किमान वेतन, मानधनवाढीसाठी संसदेत आवाज उठवणार

### खा.अमर काळे यांचे आश्वासन; सेवाग्राममध्ये १५०० महिलांचा एल्गार

**वर्धा/जनमाध्यम**

शासकीय योजनांची अंमलबजावणी करणाऱ्या महिला कर्मचाऱ्यांच्या श्रमाचा मोबदला मात्र तुटपुंजा ठेवला जात असल्याचा संताप सेवाग्राम येथील मेळाव्यात व्यक्त करण्यात आला.अंगणवाडी सेविका मदतनीस, आशा वर्कर, गटप्रवर्तक, शालेय पोषण आहार कर्मचारी, उमेद प्रकल्पातील सीआरपी, स्त्री परिचर आणि पूरक पोषण आहार कर्मचाऱ्यांचा चरखा भवन येथे मेळावा झाला.यावेळी १५०० हून अधिक महिला सहभागी झाल्या.

खा.अमर काळे यांनी महिलांच्या व्यथा ऐकून घेत सातही संघटनांची निवेदने स्वीकारली. योजना कर्मचाऱ्यांवर दिवसेंदिवस जबाबदाऱ्या वाढत असताना अल्प मानधन देऊन त्यांच्या श्रमाची लूट केली जात असल्याचे त्यांनी नमूद केले. किमान वेतन,मानधनवाढ,भविष्य निर्वाह निधी,विमा,आरोग्य सुविधा आणि रजा यांसह सामाजिक



सुरक्षेच्या मागण्या केंद्र सरकारसमोर मांडणार असून संबंधित केंद्रीय मंत्र्यांशी पत्रव्यवहार करून संसदेतही प्रश्न उपस्थित करणार असल्याचे काळे यांनी सांगितले.मेळाव्याचे उद्घाटन सिटूचे राज्य अध्यक्ष डॉ.डी.एल.कराड यांनी केले. ग्रामीण आणि शहरी जनतेपर्यंत शासनाच्या योजना पोहोचविण्यात योजना कर्मचाऱ्यांची भूमिका महत्त्वाची असतानाही त्यांना योग्य मोबदला आणि सामाजिक सुरक्षा मिळत नसल्याची टीका त्यांनी केली. या प्रश्नांसाठी संविधानिक, न्यायालयीन आणि संघर्षाच्या मार्गाने लढा देण्याचे आवाहन त्यांनी केले.यशवंत झाडे यांनी प्रास्ताविक केले. भैय्या देशकर यांनी आभार मानले. राष्ट्रगीताने मेळाव्याची सांगता झाली.

**लाडकी बहीणसोबत महागाईचाही विचार करा**

महिलांना योजनांचा लाभ देतानाच त्यांच्या दैनंदिन आर्थिक अडचणींचाही शासनाने गांभीर्याने विचार करावा. वाढती महागाई, घरखर्च, मुलांचे शिक्षण, आरोग्य खर्च आणि अन्य गरजा भागविताना महिलांवर मोठा आर्थिक ताण येतो. योजना महिला कर्मचारी शासनाच्या विविध योजना तळागाळापर्यंत पोहोचविण्याचे महत्त्वाचे काम करतात.महिलांच्या कष्टाला योग्य मोबदला आणि सामाजिक सुरक्षा मिळाली पाहिजे. या मागण्यांचा आवाज लोकसभा आणि शासनापर्यंत पोहोचवून संबंधित विभागांकडे पाठपुरावा करणार असल्याचे खासदार अमर काळे यांनी सांगितले.

**लालबहादूर शास्त्रींचे उदाहरण आजही देशासमोर**

राजकीय नैतिकतेचा संदर्भ देताना खा.अमर काळे यांनी तत्कालीन रेल्वेमंत्री लालबहादूर शास्त्री यांच्या राजीनाम्याचे उदाहरण दिले. रेल्वे अपघाताची नैतिक जबाबदारी स्वीकारून शास्त्री यांनी मंत्रिपदाचा राजीनामा दिला होता. मात्र २७ दिवस आंदोलन करूनही शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याचा प्रश्न कायम असल्याचे काळे म्हणाले. सार्वजनिक पदावरील जबाबदारी आणि नैतिक उत्तरदायित्वाची परंपरा आजही जपली पाहिजे, असे त्यांनी स्पष्ट केले.

**गेंड्याच्या कातडीच्या सरकारसोबत लढा**

रायपूर जंगली येथील घटनेचा संदर्भ देत खा.अमर काळे यांनी प्रशासनाच्या असंवेदनशीलतेवर टीका केली. सहा दिवस मृतदेह अंत्य संस्काराविना ठेवावा लागला, तरी पालकमंत्री, मंत्री आणि जिल्हाधिकाऱ्यांनी आंदोलन कर्त्यांची भेट घेतली नाही, असा आरोप त्यांनी केला. सरकारकडून मागण्यांची दखल घेण्यासाठी संघर्ष करावा लागत असल्याचे सांगत देशातील सर्व खासदारांना महिला कर्मचाऱ्यांच्या प्रश्नांमध्ये सहभागी करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सांगितले.

## अंधारातच अखेरचा निरोप, प्रशासनाच्या कारभारावर संताप

### सेलडोहच्या स्मशानभूमीत मोबाईल टॉर्च अन् दुचाकीच्या हेडलाईटच्या उजेडात अंत्यसंस्कार

**सेलू /अभय बेदमोहता**

मृत्यूनंतर प्रत्येक व्यक्तीला सन्मानाने अखेरचा निरोप मिळणे हा मूलभूत मानवी अधिकार मानला जातो. मात्र सेलू तालुक्यातील वर्धा नागपूर राज्य मार्गावरील सेलडोह येथे प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे मृत्यूनंतरही सन्मानासाठी अंधाराशी झुंज देण्याची वेळ नागरिकांवर आली आहे. स्मशानभूमीत वीज अथवा प्रकाशाची व्यवस्था नसल्याने एका महिलेवर चक्क मोबाईल टॉर्च आणि दुचाकीच्या हेडलाईटच्या उजेडात अंत्यसंस्कार करण्याची वेळ नातेवाईकांवर आली. या प्रकारामुळे ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.



सेलडोह येथील सुरजकला शंकर आवते यांचे निधन झाल्यानंतर कुटुंबीय आणि नातेवाईक पार्थिव घेऊन स्मशानभूमीत पोहोचले. मात्र तेथे अंधाराचे साम्राज्य होते.विशेष म्हणजे स्मशानभूमीत सोलर लाईट, पाण्याची सुविधा आणि नियमित स्वच्छता करण्याची मागणी ग्रामस्थांनी यापूर्वीही केली होती. मात्र वारंवार मागणी करूनही मूलभूत सुविधांकडे दुर्लक्ष झाल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. अंत्यसंस्कारासाठीही अंधाराचा सामना करावा लागत असेल तर ही अत्यंत लाजिरवाणी बाब आहे. ग्रामपंचायत प्रशासनाने तातडीने स्मशानभूमीत वीज किंवा सोलर लाईट, पिण्याचे पाणी आणि स्वच्छतेची व्यवस्था करावी. अशी मागणी ग्रामस्थांनी केली आहे.

## गौरक्षणच्या प्लॉटधारकांना दिलासा,२६ सप्टेंबरला शिबीर

**वर्धा/जनमाध्यम**

गौरक्षण वॉर्डातील जमनालाल बजाज सेवा ट्रस्ट लेआउटमधील प्लॉटधारकांसाठी प्रॉपर्टी कार्ड मिळविण्याचा मार्ग आता अधिक सुलभ होणार आहे. प्रॉपर्टी कार्डसाठी कार्यालयांचे उंबरठे झिजविण्याची वेळ नागरिकांवर येऊ नये, यासाठी २६ सप्टेंबर रोजी राष्ट्रभाषा प्रचार समिती हॉल येथे निःशुल्क प्रॉपर्टी कार्ड शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

स्व. चरणसिंग चावरे मेमोरियल ट्रस्ट आणि महसूल भूमिअभिलेख विभागाच्या संयुक्त विद्यमाने हे शिबिर घेण्यात येणार आहे. पालकमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या संकल्पनेतून तसेच नगरसेवक डॉ. सुनील चरणसिंग चावरे आणि नगरसेविका प्रियांका कुणाल खंगार यांच्या पुढाकारातून उपक्रम राबविला जात आहे. सकाळी १० ते दुपारी ३ वाजेपर्यंत होणाऱ्या शिबिरात गौरक्षण वॉर्डातील संबंधित प्लॉटधारकांना प्रॉपर्टी कार्ड प्रक्रियेबाबत मार्गदर्शन तसेच आवश्यक कार्यवाहीची सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. त्यामुळे अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या मालमत्ता नोंदीच्या प्रश्नाला चालना मिळण्याची शक्यता आहे.मालमत्तेचा अधिकृत हक्क आणि नोंद यासाठी प्रॉपर्टी कार्ड महत्त्वाचे दस्तऐवज मानले जाते.

## गोदावरी रेती घाटावर रात्रीचा रेतीखेळ

### ग्रामपंचायतीचे तहसीलदारांना पत्र, कारवाई न झाल्यास आंदोलनाचा इशारा



**आष्टी (शहीद)/जनमाध्यम**

टेकोंडा इस्माईलपूर येथील गोदावरी रेती घाटावर रात्रीच्या अंधाराचा फायदा घेत कथितपणे रेतीचा अवैध उपसा आणि वाहतूक सुरू असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. शेतकरी छत्रपती कुरवाडे यांनी यासंदर्भात ग्रामपंचायत तसेच तळेगाव पोलिसांकडे तक्रार केली असून ग्रामसभेतही हा मुद्दा उपस्थित करण्यात आला आहे. तक्रारीची दखल घेत टेकोंडा ग्रामपंचायतीचे ग्रामपंचायत अधिकारी नरेंद्र गुळघाने यांनी आष्टी तहसीलदारांना लेखी पत्र देत तातडीने चौकशी करून कारवाई करण्याची मागणी केली आहे.

ग्रामपंचायतीकडे प्राप्त झालेल्या तक्रारीनुसार गोदावरी रेती घाटावरून नियमबाह्य पद्धतीने रेतीचा उपसा होत असल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली आहे.रेती उपसा आणि वाहतुकीसाठी शासनाने निश्चित केलेले नियम असताना त्याची पायमल्ली होत असल्यास संबंधितांवर कठोर कारवाई करण्याची मागणी ग्रामपंचायतीने केली आहे. घाटावर प्रत्यक्ष पाहणी करून रेती उपसा आणि वाहतुकीची तपासणी करावी तसेच संशयास्पद वाहनांवर नियंत्रण ठेवून नियमबाह्य वाहतूक आढळल्यास कारवाई करावी, अशी मागणी पत्रातून करण्यात आली आहे.

**महसूल विभाग आता जागा होणार का?**

ग्रामपंचायतीच्या पत्रामुळे गोदावरी रेती घाटावरील कथित अवैध उपशाचा मुद्दा पुन्हा ऐरणीवर आला आहे. रात्रीच्या वेळी होणाऱ्या कथित रेती वाहतुकीवर कोणाचे नियंत्रण आहे, घाटाची प्रत्यक्ष तपासणी किती वेळा झाली आणि तक्रारीनंतर प्रशासन काय पावले उचलणार, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

दरम्यान, तक्रारीनंतरही कारवाई झाली नाही तर ग्रामस्थ आंदोलनाच्या माध्यमातून शासनाचे लक्ष वेधणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे आता महसूल प्रशासन या प्रकरणाची प्रत्यक्ष चौकशी करून कथित रेती चोरीला आळा घालणार की केवळ कागदोपत्री कारवाईवरच प्रकरण थांबणार, याची उत्सुकता आहे.

## पुलगावात वाहतूक नियम मोडणाऱ्यांना दंड

### १२८ वाहनचालकांवर कारवाई; १ लाख ६६ हजार ५५० रुपयांचा दंड

**पुलगाव/जनमाध्यम**

शहरातील विस्कळीत वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी व अपघातांना आळा घालण्याच्या उद्देशाने पुलगाव पोलिसांनी सोमवारी विशेष मोहीम राबविली. रस्त्यावर अडथळा निर्माण करणारी वाहने, विनापरवाना वाहन चालविणारे,अल्पवयीन चालक,ट्रिपलसीट,कर्णकर्कश सायलेंसर तसेच फॅन्सी नंबर प्लेट असलेल्या वाहनांवर मोटार वाहन कायद्यानुसार कारवाई करण्यात आली. या मोहिमेत तब्बल १२८ प्रकरणे दाखल करून १ लाख ६६ हजार ५५० रुपयांचा दंड ठोठावण्यात आला.

वाहतुकीच्या मार्गावर वाहने उभी करणाऱ्या चालकांविरुद्ध कलम १२२ अन्वये ५० कारवाई करण्यात आल्या.



अल्पवयीन तसेच विनापरवाना वाहन चालविणाऱ्यांवर कलम ३/१८१ व ४/१८१ अन्वये २१ कारवाया करण्यात आल्या. याशिवाय अन्य वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर ५९कारवाई करण्यात आल्या.

ही कारवाई पोलीस अधीक्षक सौरभ कुमार अग्रवाल, अपर पोलीस अधीक्षक सदाशिव वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ.वंदना कारखेले आणि पुलगावचे पोलीस निरीक्षक सदाशिव ढाकणे यांच्या उपस्थितीत करण्यात आली.वाहतूक नियंत्रण शाखेचे प्रभारी अधिकारी विजयकुमार घुले यांच्यासह पोलिस अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मोहिमेत सहभाग घेतला.

**जीव वाचविण्यासाठी कारवाई**

वाहतूक नियमांची अंमलबजावणी केवळ दंड वसुलीसाठी नसून नागरिकांचा सुरक्षित प्रवास सुनिश्चित करण्यासाठी असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले.नागरिकांनी रस्त्यावर अथवा गर्दीच्या ठिकाणी अनधिकृत पार्किंग करू नये. वाहन केवळ निर्धारित पार्किंगच्या ठिकाणीच उभे करावे. अल्पवयीन मुलांना वाहन चालविण्यास देऊ नये. दुचाकीस्वारांनी हेल्मेट तर चारचाकी चालकांनी सीटबेल्टचा वापर करावा.ट्रिपलसीट आणि कर्णकर्कश सायलेंसरचा वापर टाळावा, असे आवाहन पोलिसांनी केले आहे.वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांविरुद्ध यापुढेही प्रभावी कारवाई सुरू राहणार असल्याचे जिल्हा वाहतूक सहाय्यक पोलीस निरीक्षक विजय घुले यांनी सांगितले आहे.

## चमत्काराला नमस्कार, मग प्रश्नांना का नकार

### विद्यार्थ्यांसमोर गजेंद्र सुरकार यांनी उलगडली अंधश्रद्धेची हातचलाखी



**वर्धा/जनमाध्यम**

चमत्कार पाहून त्याला नमस्कार करणारी मानसिकता माणसाला चिकित्सक विचारापासून दूर नेते. निसर्गातील प्रत्येक घटनेमागे कार्यकारणभाव असतो. मात्र बुवा, बाबा किंवा तथाकथित चमत्कार करणारे हातचलाखी, विज्ञान, रसायने आणि वस्तूंमध्ये केलेल्या घडामोडींचा वापर करून श्रद्धाळूंची फसवणूक करतात. यातून आर्थिक आणि मानसिक शोषणासोबत महिलांचे लैंगिक शोषणही होऊ शकते. त्यामुळे चमत्कार पाहताना प्रश्न विचारणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे राज्य प्रधान सचिव गजेंद्र सुरकार यांनी केले.

सत्यशोधन दिनानिमित्त तलमले औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथे चमत्कार सादरीकरण कार्यक्रम झाला. यावेळी सुरकार यांनी विद्यार्थ्यांसमोर विविध तथाकथित चमत्कारांचे प्रात्यक्षिक करून त्यामागील विज्ञान आणि हातचलाखी उलगडून दाखवली.

गडव्यात भूत पकडणे, जळता कापूर हातावर ठेवणे, लोखंडी लंगर सोडवणे, मंत्राने अग्नी पेटवणे, चेंडू थांबवणे, लिंबातून रक्त व सुई काढणे यासह विविध प्रयोग त्यांनी करून दाखविले.

विद्यार्थ्यांनाही प्रयोगांमध्ये सहभागी करून घेण्यात आले.२१ सप्टेंबर १९९५ रोजी गणपतीला दूध पाजल्याच्या घटनेचा संदर्भ देत सुरकार यांनी वैज्ञानिक दृष्टिकोनाचे महत्त्व स्पष्ट केले.

कार्यक्रमाला प्राचार्य हरिश बिजेवार, अशोक हेडावू, दिलीप गुळघाणे, विकास पाटील यांच्यासह विद्यार्थी, प्राध्यापक व कर्मचारी उपस्थित होते.

## प्रकृती अचानक बिघडल्याने ४७ वर्षीय व्यक्तीचा मृत्यू

**वर्धा-**अचानक प्रकृती बिघडल्याने उपचारासाठी सेवाग्राम येथील कस्तुरबा रुग्णालयात दाखल करण्यात आलेल्या ४७ वर्षीय व्यक्तीचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. अजय सुरेश सालोडकर वय ४७ वर्षे रा मोटघरे लेआउट त्रिमूर्तीनगर वर्धा असे मृताचे नाव आहे. सालोडकर यांची प्रकृती अचानक बिघडल्याने त्यांना उपचारासाठी कस्तुरबा रुग्णालय सेवाग्राम येथे १५ सप्टेंबर रोजी सकाळी दाखल करण्यात आले होते. उपचार सुरू असतानाच त्यांचा मृत्यू झाला. रुग्णालय प्रशासनाने याबाबतची माहिती सेवाग्राम पोलिसांना दिली. त्यानंतर अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली. प्राथमिक तपासानंतर मृतदेहाचे शवविच्छेदन करण्यात आले असून अंत्यसंस्कारासाठी मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला. घटनास्थळ रामनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत असल्याने संबंधित कागदपत्रे रामनगर पोलिसांकडे वर्ग करण्यात आली. याप्रकरणी पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद करून पुढील तपास सुरू केला आहे.

## अल्पवयीन मुलाच्या हाती मोपेड दिल्याने मालकावर गुन्हा

**हिंगणघाट-**अवघ्या १६ वर्षीय मुलाला वाहन चालविण्यास दिल्याप्रकरणी हिंगणघाट पोलिसांनी वाहन मालकाविरुद्ध मोटार वाहन कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे. ही कारवाई २० सप्टेंबरच्या रात्री आंबेडकर चौक परिसरात नाकाबंदी दरम्यान करण्यात आली. पोलिसांनी एमएच ३२ एओ ७८४२ क्रमांकाची बजाज चेतक इलेक्ट्रिक मोपेड थांबवून तपासणी केली. वाहन चालविणारा कैफ अमजद पठाण वय १६ वर्षे रा संत कबीर वार्ड हिंगणघाट असल्याचे समोर आले. त्याच्याकडे वाहन चालविण्याचा परवाना नसल्याचेही निष्पन्न झाले. चौकशीत हे वाहन इरफान खान मुस्तफा खान यांच्या नावावर असून त्यांचा मुलगा जैद खान याने वाहन चालविण्यास दिल्याचे कैफने सांगितले. वाहन चालक अल्पवयीन असल्याची माहिती असतानाही वाहन चालविण्यास दिल्याचा आरोप इरफान खान यांच्यावर आहे. पोलिसांनी मोपेड ताब्यात घेतली असून पुढील तपास सुरू आहे.

**दुचाकीस्वार पसार**

**सेलू-**मेडिकल चौक ते बाजार मार्गावर भाजीपाला दुकानाजवळ भरधाव दुचाकीस्वाराने सायकलस्वाराला कट मारल्याने ६७ वर्षीय वृद्ध जखमी झाला. याप्रकरणी सेलू पोलिसांनी दुचाकीस्वाराविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. सुरेश जागोबाजी जगते वय ६७ वर्षे रा जोशीनगर सेलू हे सायकलने जात असताना आरोपी आकाश विठ्ठल सोनटक्के याने त्याच्या ताब्यातील निष्काळजीपणे चालवून जगते यांना कट मारला. त्यामुळे जगते रस्त्यावर पडले.

## देवस्थान परिसरात गांजा सेवन करणारा तरुण ताब्यात

**हिंगणघाट -** पालखेडी देवस्थान परिसरातील एका हॉललगत टिनाच्या शेडमध्ये चिलममधून गांजा सेवन करताना तरुणाला हिंगणघाट पोलिसांनी ताब्यात घेतले. ही कारवाई २१ सप्टेंबर रोजी करण्यात आली. स्वानंद पामरावजी देशकर वय २८ वर्षे रा संत ज्ञानेश्वर वार्ड हिंगणघाट असे आरोपीचे नाव आहे. अंमली पदार्थ सेवन करणाऱ्यांवर कारवाईसाठी पोलीस पथक पेट्रोलिंग करीत असताना पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीच्या आधारे देवस्थान परिसरात छापा टाकण्यात आला. त्यावेळी देशकर हा चिलम ओढताना आढळून आला. पंचांसमक्ष अंगझडती घेतली असता चिलम सिगारेटचे तुकडे चिलमेला गुंडाळण्याचे कापड आणि माचीस असा मुद्देमाल मिळून आला. पोलिसांनी तो जप्त केला. आरोपीची उपजिल्हा रुग्णालयात वैद्यकीय तपासणी करण्यात आली असून गांजा सेवन केल्याचे प्रमाणपत्र मिळाल्याचे पोलिसांनी सांगितले. रक्त आणि लघवीचे नमुनेही घेण्यात आले आहेत.

याप्रकरणी एनडीपीएस कायद्याच्या कलम २७ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार दिनेश तुमाने करीत आहेत.

## ८२ वर्षांच्या वृद्धेच्या झोपडीवर प्रशासनाचा हातोडा का?

### संरक्षण भिंतीला अडथळाच नाही तर पाडकामाचा हट्ट कशासाठी

**आष्टी शहीद/जनमाध्यम**

वयाच्या ८२ व्या वर्षी डोक्यावर छप्पर असावे एवढीच अपेक्षा असलेल्या वृद्ध महिलेच्या झोपडीवर प्रशासनाचा हातोडा का उगारला जात आहे, असा संतप्त प्रश्न थार येथील ग्रामस्थांकडून उपस्थित होत आहे. संरक्षण भिंतीच्या कामाला झोपडीचा प्रत्यक्ष अडथळा नसल्याचा दावा होत असतानाही पाडकामासाठी प्रशासनाकडून वारंवार हालचाली होत असल्याने या कारवाईमागचे नेमके कारण काय, याबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

दि. २७ ऑगस्ट रोजी झोपडी पाडण्यासाठी पोलिस बंदोबस्तात कारवाईचा प्रयत्न झाल्याची माहिती आहे. यावेळी राजसार काळे यांनी हस्तक्षेप केल्यानंतर कारवाई थांबली. मात्र,१५ सप्टेंबर रोजी ग्रामपंचायतीच्या मासिक सभेत गावातील अतिक्रमणे आणि पाडकामाचा मुद्दा पुन्हा चर्चेत आल्याने वृद्ध महिलेच्या झोपडीवर संकट कायम असल्याचे ग्रामस्थांचे म्हणणे आहे.

**आधी अडथळा सिद्ध करा -** संरक्षण भिंतीला झोपडीमुळे अडथळा निर्माण होत असेल तर प्रशासनाने मोजमाप, नकाशा आणि अधिकृत कागदपत्रांसह तो अडथळा स्पष्ट करावा. अडथळाच नसेल तर ८२ वर्षीय महिलेचा निवारा हटविण्याचा आग्रह कशासाठी, हा प्रश्न अनुत्तरित आहे.



**नाल्यावर बांधकामाला कोणाचा आशीर्वाद -**याच परिसरातील सरकारी नाल्यावर विहार उभारण्याचा प्रयत्न होत असल्याची चर्चा आहे. या बांधकामासाठी कोणत्या विभागाची परवानगी घेण्यात आली, हेही प्रशासनाने स्पष्ट करावे. एका वृद्ध महिलेच्या झोपडीसाठी नियमांची भाषा करणाऱ्या यंत्रणेने सरकारी जागेवरील अन्य बांधकामांनाही समान निकष लावणार का, असा सवाल ग्रामस्थांचा आहे. जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी आणि तहसीलदारांनी कागदोपत्री अहवालावर विसंबून न राहता प्रत्यक्ष घटनास्थळी पाहणी करावी, अशी मागणी होत आहे. झोपडी कायदेशीरदृष्ट्या अडथळा ठरत असल्यास नियमानुसार कारवाई करावी.झोपडी पाडण्यापेक्षा प्रश्न सोडविण्याची भूमिका प्रशासनाने घ्यावी. वृद्ध महिलेला पर्यायी निवारा उपलब्ध करून दिल्याशिवाय कारवाई करू नये, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. या प्रकरणात प्रशासन नेमकी कोणती भूमिका घेते, याकडे आता थारवासीयांचे लक्ष लागले आहे.

जनमाध्यम जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं.बी.-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती-४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, हवालदारपुरा,वर्धा-४४२२२१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)

वर्धा आवृत्ती वर्ष-१४ अंक २९७
आर.एन.आय.रजी.नं. MAHMAR/२०१३/५१०९३

मुख्य कार्यालय– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती-४४४६०१
फोन - ९८२३०१६३००, ९४२२९५६२६८
ई-मेल-atimadhyam@gmail.com,
abhiramdeshpande@gmail.com

# जाहीर नोटीस

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश (क.स्तर) चांदूर बाजार, जि.अमरावती**

आर.एम.जे.सी.क्र.४४४/२०२६ ने.ता.१५.१०.२०२६

**अर्जदार :** १. **शेख सज्जु शेख सादिक,** वय ४० वर्षे, व्यवसाय-मजुरी
२. **शेख राजिक शेख सादिक,** वय ३८ वर्षे, व्यवसाय- मजुरी
३. **शेख मजिद शेख सादिक,** वय ३६ वर्षे, व्यवसाय- मजुरी
४. **रेश्मा अंजुम अब्दुल नईम,** वय ३४ वर्षे, व्यवसाय- घरकाम
अर्जदार क्र.१ते ३ रा.सर्फाबाद,पो.हिरुरपुर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती
अर्जदार क्र.४ रा.तोंडगाव, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती

-- विरुध्द --

**गैरअर्जदार :** निरंक

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार हे वरील ठिकाणी राहतात. **मृतक फिरोजाबानो शेख सादिक** यांचा **मृत्यू दि.०७/०१/२०२५** रोजी रा.सर्फाबाद, पो.हिरुर पुर्णा, ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे. तसेच **मृतक शेख सादिक शेख हमीद** यांचा **मृत्यू दि.०८/०५/१९९३** रोजी रा.सर्फाबाद, पो.हिरुर पुर्णा ता.चांदूर बाजार, जि.अमरावती येथे झालेला आहे.

यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदारा व्यतिरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत.

अर्जदार मयतांचे कायदेशिर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरिता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान दिवाणी न्यायाधीश क.स्तर, चांदूर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.क्र.४४४/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा. त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमााण्पत्र देण्यात येईल.

आज दि.२१.०९.२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी व फौजदारी न्यायालय ,चांदूर बाजार

# जाहीर नोटीस

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) चांदुर बाजार, जि. अमरावती.**

आर.एम.जे.सी. ४३५/२०२६ ने.ता. १३/१०/२०२६

**अर्जदार :- १. शालीकराम नामदेव मेश्राम,** वय ६० वर्षे, व्यवसाय शेती
रा. बोराळा ता. चांदुर बाजार जि. अमरावती
**२. सावित्री डिगांबर वासनीक,** वय ५० वर्ष व्यवसाय - घरकाम
रा. मायवाडी ता. मोर्शी जि. अमरावती

विरुध्द...... गैरअर्जदार :- निरंक

**बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार वरील ठीकाणी राहतात. **मृतक नामदेवराव पुंडलिकराव मेश्राम** यांचा **मृत्यु दि. १९/०८/२०१०** रोजी तसेच **मृतक गुंफाबाई नामदेवराव मेश्राम** हिचा **मृत्यु दि. ०१/०८/२०२६ रोजी रा. बोराळा ता. चांदुर बाजार जि. अमरावती** येथे झालेला आहे.

यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराव्यतीरिक्त इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. अर्जदारांना मय्यताचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरीता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) चांदुर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.नं. ४३५/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. ०९/०९/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, चांदूर बाजार**

# जाहीरनामा

या जाहिरनामाद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नाव श्री /श्रीमती /कु.श्री राजेंद्र प्रतापराव पखाले पत्ता-**सरमसपुरा अचलपूर** यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र.**२४** संगणक मालमत्ता क्र.**ACH A000024532** जुना मालमत्ता क्र.**२६०००२४०** नझुल शीट नं. **१४ बी** प्लॉट नं. **२२५** श्री /श्रीमती /कु. **श्री. प्रल्हाद रखुजी पखाले** या नावाने असुन वरील अर्जदार यांनी यांनी श्री /श्रीमती /कु. **श्री हरिसिंग जगराम बघेल** या नावाने फेरफार घेण्याकरिता / नाव बदलण्याम / नाव लावण्यास / नावामध्ये /क्षेत्रामध्ये / दुरुस्ती करण्याकरिता ( खरेदी, मृत्युपत्र, बक्षिसपन, नोटरी, प्रतिज्ञापत्र, न्यालावाद्वारे ) कार्यालयामध्ये दिनांक ३१/८/२०२६ रोजी अर्ज सादर केलेला आहे. याविषयी कोणास आक्षेप हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत लेखी स्वरूपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करून हजर राहावे. अन्यथा या मुदती नंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**टीप / लक्षवेध :-**
**उपरोक्त मालमत्तेची चतुसिमा :-**
**पूर्व-** रस्ता
**पश्चिम :-**रस्ता
**उत्तर -प्रल्हाद रखुजी पखाले यांचे घर**
**दक्षिण :**रस्ता

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अचलपूर**

# जाहीरनामा

या जाहिरनामाद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नाव श्री /श्रीमती /कु.श्री हरिसिंग जगराम बघेल पत्ता-**बिलनपुरा अचलपूर** यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र.**२४** संगणक मालमत्ता क्र.**ACH A00003790** जुना मालमत्ता क्र.**१५०००६०६** नझुल शीट नं. **२२ बी** प्लॉट नं. **२०५/१**-श्री /श्रीमती /कु. **श्री. सुनिल बी विजय चंद्रकांतजी कुलबाल** या नावाने असुन वरील अर्जदार यांनी यांनी श्री /श्रीमती /कु. **श्री हरिसिंग जगराम बघेल** या नावाने फेरफार घेण्याकरिता / नाव बदलण्याम / नाव लावण्यास / नावामध्ये /क्षेत्रामध्ये / दुरुस्ती करण्याकरिता ( खरेदी, मृत्युपत्र, बक्षिसपन, नोटरी, प्रतिज्ञापत्र, न्यालावाद्वारे ) कार्यालयामध्ये दिनांक २२/०९/२०२६ रोजी अर्ज सादर केलेला आहे. याविषयी कोणास आक्षेप हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत लेखी स्वरूपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करून हजर राहावे. अन्यथा या मुदती नंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**टीप / लक्षवेध :-**
**उपरोक्त मालमत्तेची चतुसिमा :-**
**पूर्व-** गणोरकर यांचे घर
**पश्चिम :-**जगदिश मातने यांचे घर
**उत्तर -मधु चांदले यांचे घर**
**दक्षिण :-**पुष्पा झालीने यांचे घर

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अचलपूर**

जनमाध्यम
जनमाध्यम न्युज अँड पब्लीकेशन प्रा.लि.च्या मालकीचे हे वृत्तपत्र मुद्रक, प्रकाशक प्रदीप देशपांडे यांनी प्लॉट नं. बी-५०, सातुर्णा औद्योगिक वसाहत, बडनेरा रोड, अमरावती - ४४४६०७ येथे छापून जनमाध्यम कार्यालय, रेल्वेपुलाजवळ, राजकमल चौक, अमरावती -४४४६०१ येथे प्रकाशित केले.

संपादक-प्रदीप देशपांडे
संचालक (वृत्त) - अभिराम देशपांडे
(Responsible for selection of News Under PRB Act)
अमरावती आवृत्ती वर्ष - ३८ अंक २०
आर.एन.आय.रजी.नं. 49763/89 पोस्टल लायसन क्र. ATI/RNP/47/2023-2025
मुख्य कार्यालय :– अंबापेठ, राजकमल चौक, अमरावती - ४४४६०१
फोन - ९८२३०१६३००,९४२२९५६२६८
ई-मेल - atimadhyam@gmail.com, abhiram.deshpande70@gmail.com

# जाहीर नोटीस

**जिल्हा अधीक्षक भूमि अभिलेख, अमरावती**

**क्रमांक/न.भू-१/अपील अर्ज क्र.२७४/२०२५** **अमरावती, दिनांक २१/०९/२०२६**

**प्रति,**
१) रमेश पांडूरंग म्हस्के
रा.झाडगांव, ता.धामणगांव रेल्वे
जि.अमरावती
— **अपिलार्थी**

**विरुध्द**

१) मंदाकिनी श्रीरामजी डगवार
रा.झाडगांव, ता.धामणगाव रेल्वे, जि.अमरावती
२) पुरुषोत्तम महादेव बोरगावकर
३) चिंधू महादेवराव जाधव
अ.क्र.२ व ३ रा.झाडगांव, ता.धामणगाव रेल्वे, जि.अमरावती
४) उपअधिक्षक भूमि अभिलेख, धामणगाव रेल्वे
ता.धामणगाव रेल्वे, जि.अमरावती
— **उत्तरार्थी**

ज्याअर्थी अपिलार्थी यांनी महाराष्ट्र जमिन महसुल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अंतर्गत मौजे झाडगांव, ता.धामणगाव रेल्वे,जि.अमरावती येथील गट नं.५६१,५६२ चे बाबत उत्तरार्थी यांचे विरुध्द अपिल सादर केलेले आहे. परंतु उत्तरवादी क्र.१ ते ३ हे सुनावणी वेळी उपस्थित राहत नसलेमुळे उत्तरार्थी यांना याव्दारे कळविण्यात येते की, दिनांक २१/१०/२०२६ रोजी सकाळी ११.०० वाजता या न्यायासनासमोर आपण स्वतः किंवा आपले अधिवक्ता मार्फत सदर अपिलास उत्तर देण्यासाठी हजर रहावे. आपण वरील तारखेस सदर अपिलकामी न्यायासनासमोर गैरहजर राहिल्यास एकतर्फी निकाल देण्यात येईल.

आज दिनांक १८/०८/२०२६ रोजी माझ्या सहीने व शिक्क्यानिशी दिले आहे.

शिक्का

**सही/-**
**(महेशकुमार शिंदे)**
**जिल्हा अधिक्षक भूमि अभिलेख**
**अमरावती**

# -सायटेशन/जाहीरनामा-

**विद्यमान दिवाणी न्यायाधीश साहेब (क.स्तर), मोर्शी**

आर.एम.जे.सी.क्र.५४५/२०२६ ने.ता.११.०९.२०२६

**अर्जदार -** १. **सौ.संगीता दिलीपराव मेंढे,** वय ५० वर्षे, धंदा - घरकाम
रा.माणिक चौक, माळीपुरा मोर्शी, ता.मोर्शी, जि.अमरावती

-- विरुध्द --
**निल** (**कुणीही नाही**)

वरील अर्जदारांनी वि.दिवाणी न्यायाधीश साहेब, (क.स्तर) मोर्शी यांचे न्यायालयात वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत U/S २, बॉम्बे रेग्युलेशन (८) १८२७ प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे. अर्जदार हिचा मुलगा नामे अश्विन दिलीप मेंढे यांचा दि.०५/०३/२०२६ रोजी जिल्हा सामान्य रुग्णालय, अमरावती, ता.जि.अमरावती येथे अविवाहित असतांना मृत्यू झाला.तसेच मयताचे नावे असलेल्या शासकीय तथा निमशासकीय अभिलेखात नोंदी होण्याकरीता वारस प्रमाणपत्र मिळण्याकरीता सदरचे प्रकरण दाखल केलेले आहे. मयताला वरील अर्जदारा शिवाय ईतर कोणतेही वारस नाहीत. तेव्हा या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, जर कुणालाही सदर अर्जदारांचे प्रकरणावर आक्षेप असेल तर त्यांनी सदर नोटीसच्या एका महिन्याचे आत विद्यमान न्यायालयात आपला लेखी आक्षेप सादर करावा. अन्यथा कोणालाही आक्षेप नाही असे समजून पुढील कार्यवाही करण्यात येईल.

दिनांक १०.०८.२०२६

शिक्का

आदेशान्वये,
**सहाय्यक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय (क.स्तर) , मोर्शी

# मा.दिवाणी न्यायाधिश क.स्तर नांदगाव खंडेश्वर यांचे न्यायालयामधील

**किरकोळ (RMJC) अर्ज क्र.२३७/२०२६** **ने.ता.२८.०९.२०२६**

**१. विमल हरीभाऊ मडावी**
**२. नरहरी हरीभाऊ मडावी**
**३. सुरेश हरीभाऊ मडावी**
सर्व रा.खेड पिंपरी, पो.पिंपळगाव निपाणी, ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती
**४. शारदा रमेश कुसराम,** रा.इंद्रायणा, ता.नेर, जि.यवतमाळ

**// वि //**
**निरंक**

ज्याअर्थी, **मयत हरिभाऊ आत्माराम मडावी** यांचा मृत्यू दि.१८.०५.२०२६ मध्ये **खेड पिंपरी, ता.नांदगाव खंडेश्वर,जि.अमरावती** येथे झाला. मयताचे **अर्जदार क्र.१ ही पत्नी असून अर्जदार क्र.२ व ३ ही मुले व अर्जदार क्र.४ ही मुलगी आहे.** मयत यांचे अर्जदार हेच कायदेशिर वारस आहेत. करिता कायदेशीर वारसदार म्हणून प्रमाणपत्र मिळणेकरिता अर्जदार यांनी विद्यमान न्यायालयामध्ये मुंबई रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ०८ परि.२ अंतर्गत अर्ज सादर केला आहे. त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदारांविरुध्द काही आक्षेप किंवा हरकती घ्यावयाच्या असेल तर त्यांनी नेमलेल्या तारखेस रोजी सकाळी **१०.३०** वाजता मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर येथे न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर रहावे. तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

**आज दिनांक १९ सप्टेंबर, २०२६** रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
**मा.दिवाणी न्यायालय, नांदगाव खंडेश्वर**

# जाहीर नोटीस

**विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) चांदुर बाजार, जि. अमरावती.**

आर.एम.जे.सी. ४३७/२०२६ ने. ता. १३/१०/२०२६

**अर्जदार :-१. ज्ञानेश्वरराव बाजीरावजी भाकरे,** वय ७१ वर्षे, व्यवसाय मजुरी
रा. मार्कडा पो. ब्राम्हणवाडा थडी ता. चांदुर बाजार जि. अमरावती

..विरूध्द...... गैरअर्जदार :- निरंक

**बॉम्बे रेग्यूलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळण्याबाबत**

अर्जदार वरील ठीकाणी राहतात. **मृतक बाजीराव राजाराम भाकरे** यांचा **मृत्यु दि. २०/०४/१९९९** रोजी तसेच **मृतक कोल्हाबाई बाजीराव भाकरे हिचा मृत्यु दि. २५/११/१९५४** रोजी रा. शिरजगांव कसबा ता. चांदुर बाजार जि. अमरावती येथे झालेला आहे. वारस नाहीत. यांच्या मृत्यूनंतर अर्जदार हेच त्यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराव्यतीरिक्त इतर कोणीही कायदेशीर अर्जदारांना मय्यताचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्राची कार्यालयीन कामाकरीता आवश्यकता आहे. त्याकरीता विद्यमान सह दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) चांदुर बाजार येथील न्यायालयात **आर.एम.जे.सी.नं. ४३७/२०२६** नुसार अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी वारसाचे प्रमाणपत्र देण्याबाबत काही आक्षेप असल्यास वृत्तपत्रामध्ये जाहीरात प्रसिध्दी दिनांकापासून ३० दिवसांचे आत न्यायालयात आपला आक्षेप स्वतः किंवा वकीलामार्फत हजर राहून नोंदवावा त्यानंतर सदर कोर्टाकडून कोणत्याही आक्षेपाची अथवा व्यक्तीची दखल घेतल्या जाणार नाही व अर्जदारांना वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि. ०९/०९/२०२६ रोजी माझ्या सही व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, चांदूर बाजार**

# सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती चौकशीची जाहीर नोटीस

**फेरफार अहवाल / अर्ज क्रमांकः१४९/१९/२०२६**
**सार्वजनिक न्यासाचे नाव नोंदणी क्रमांकः** श्री. बाल हनुमान वंडलीता. वरूड जि. अमरावती बाबत
**अर्जदार -श्री. नंदकिशोर शंकरराव वानखडे**

सर्व संबंधीत लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, सहाय्यक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमूद केलेल्या फेरफार अहवाल / अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे का? आणि सदरचा न्यासाचा सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय ?
(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाची मालकीची आहे काय ?
**(अ) जंगम मिळकत (वर्णन)-** निरंक
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन)** -निरंक

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणे असेल त्यांनी लेखी कैफीयत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफीयत विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफीयत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

नोटीस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे शिक्यानिशी आज दिनांक २१/०९/२०२६ रोजी दिली.

शिक्का

**अधिक्षक न्याय शाखा सार्वजनिक**
**न्यास नोंदणी कार्यालय अमरावती**

# ट्रकच्या धडकेत करवा न्यूज पेपर एजन्सीच्या स्टॉलचे नुकसान

**अमरावती/प्रतिनिधीः-** यशोदा नगर चौक येथे मंगळवारी सकाळी एका ट्रकच्या धडकेत करवा न्यूज पेपर एजन्सीच्या वृत्तपत्र स्टॉलचे नुकसान झाले. स्टॉलवर ७८ वर्षीय श्यामसुंदर करवा वृत्तपत्रांची विक्री करत होते. सकाळी एका ट्रकने वृत्तपत्राच्या स्टॉलला धडक दिली. या धडकेमुळे स्टॉल खाली कोसळला आणि त्यामध्ये ठेवलेली विविध वृत्तपत्रे रस्त्यावर विखुरली. घटनेनंतर परिसरातील नागरिक घटनास्थळी जमा झाले आणि त्यांनी विखुरलेली वृत्तपत्रे गोळा करण्यास मदत केली. या घटनेमुळे करवा न्यूज पेपर एजन्सीचे नुकसान झाले.

MAHAVITARAN

## 'e-Tender Notice'

Superscribed percentage rate e-tenders are invited from established, reputed, experienced contractors and who are registered for e-tendering with MSEDCL. The offers are invited for various works under CCCM Circle MSEDCL Nagpur vide e-tender specification No. **SEC/NGP/e-T-28/2026-27 to SEC/NGP/e-T-30/2026-27**. The e-tender with all details will be available on MSEDCL's website www.mahadiscom.in from **Dated – 23.09.2026 to 29.09.2026** and submission on **30.09.2026 up to 13.00 Hrs. Corrigendum if any will NOT be published** in the newspaper the bidders have to check it on website itself. The right to reject any or all Tender at any stage without assigning any reason whatsoever is reserved by the Superintending Engineer (C), Civil Circle Nagpur. Contact No. 7875760536. (EE (C)Adm)

**PRO No. NZ/ 147 /2026**
**Dated -22.09.2026**

**Superintending Engineer (C)**
**CCCM Circle, Nagpur.**

**दिवाणी न्यायालय, वरिष्ठ स्तर, अमरावती**
**वि.श्री.एस.एस.भिंगारदेव ७ वे सह दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर अमरावती यांचे न्यायालयात**

**किरकोळ अर्ज क्र.१९०१/२०२६**
**रमेश वि.निरंक**
**पुढील ता.२७.१०.२०२६**

**जाहीरनामा/सायटेशन**

**अर्जदार :-**
1. **Ramesh Janardhan Ingole,** Age 71 yrs. Occ.- Nil
R/o. Near Nagbaba Temple, Shobha Nagar,
VMV, Amravati, Tq & Dist. Amravati

**विरुध्द**

**गैरअर्जदार- NIL**

सर्वत्र लोकांस सुचित करण्यात येते की, **मयत Janardhan Bablaji Ingole** हया दिनांक **०७.०८.१९९२** रोजी **अमरावती** येथे मयत झाले तसेच **Janabai Janardhan Ingole** हे दिनांक २४.०९.२००६ रोजी अमरावती ता.जि.अमरावती येथे मयत झाले. अर्जदार **Ramesh Janardhan Ingole** यांनी वरीलप्रमाणे या कोर्टात सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र मिळण्याबाबत **APPLICATION UNDER SECTION 2 OF BOMBAY REGULATION ACT CLAUSE VIII OF 1827 FOR GRANT OF LEGAL HEIRSHIP CERTIFICATE** प्रमाणे अर्ज दाखल केलेला आहे.

त्यापेक्षा **Ramesh Janardhan Ingole** वरीलप्रमाणे सदहु मयतांचे वारसदार नव्हे असे कोणास समजावण्याचे असेल तर या जाहीरनाम्याचे प्रसिध्दीच्या तारखेपासून एक महिन्याचे आत त्याने या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदहु मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्यास सदहु कोर्ट अर्जदार यांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून त्यांचा हक्क साबीत दिसल्यास त्यांना सदहु मयत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दि.०८.०९.२०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

शिक्का

आदेशानुसार,
**सहायक अधीक्षक**
दिवाणी न्यायालय वरिष्ठ स्तर, अमरावती

# जाहीर सूचना

सर्व सामान्य लोकांना सुचित करण्यात येते की मी, नामे कांताबाई अंबादासराव कळसकर सदर जाहीर सुचना देते ती येणेप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन - मौजे - परतवाडा, नगर परिषद अचलपूर यांच्या हददीमधील नझुल प्लॉट क्र.281 पैकी याचे एकूण क्षेत्रफळ 52.85 चौ.मी. नझुल शीट क्र. 19-D, यावर असलेले बांधकाम घर याचे एकुण क्षेत्रफळ 52.85 चौ.मी. ता.अचलपूर आणि जिल्हा अमरावती**

सदर मिळकत ही पूर्वी **अंबादास लुंगाजी कळसकर यांच्या मालकीची होती. त्यानंतर अंबादास लुंगाजी कळसकर यांच्या देहात झाल्यानंतर त्यांची वारस म्हणून मी कांताबाई अंबादासराव कळसकर माझ्या नावाने झाली. या व्यतिरिक्त अजून कोणी वारस नाही.वरील नमूद मालमत्ता ही मला वारसाने - वडिलोपार्जित मिळालेली आहे**. तसेच वरील नमुद मालमत्तेविषयी शासकीय-निमशासकीय इतर भानगड, कोणाचा मालकी अथवा वारस हक्क, इतर बँक गहाण-बोजा नोंद कोणती हरकत असल्यास त्यांनी खाली दिलेल्या माझ्या मोबाईल क्र.अथवा वर ही जाहिरात प्रसिध्द झाल्याच्या **7 दिवसाच्या** आत पुराव्यानिशी हरकत नोंदवावी. तदनंतर कोणतीही हरकत ग्राहय धरल्या जाणार नाही. करिता ही जाहीर सूचना देत आहे.

**ठिकाण- तालुका अचलपूर आणि जिल्हा अमरावती**
**दि.22/09/2026**

**आपली**
***कांताबाई अंबादास कळसकर***
**परतवाडा, नझुल शीट क्र. 19-D,**
**नझुल प्लॉट क्र.281**
**ता.अचलपूर, जि.अमरावती**
**मो.नं. 9637388034**

# सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती विभाग अमरावती चौकशीची जाहीर नोटीस

**फेरफार अहवाल / अर्ज क्रमांकः** ११५/१९/२०२६
**सार्वजनिक न्यासाचे नाव नोंदणी क्रमांकः-** आद्यगुरू महानुभाव मठ मु. पो. वलगाव ता. जि. अमरावती
**बाबत अर्जदार** -श्री. कुणाल वसंतराव ओकटे

सर्व संबंधीत लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,
सहाय्यक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमूद केलेल्या फेरफार अहवाल / अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे का? आणि सदरचा न्यासाचा सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय ?
**(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाची मालकीची आहे काय ?**
**(अ) जंगम मिळकत (वर्णन)ः** निरंक
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन)ः** निरंक

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणे असेल त्यांनी लेखी कैफीयत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफीयत विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफीयत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

नोटीस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे शिक्यानिशी आज दिनांक २७/०७/२०२६ रोजी दिली.

शिक्का

**श्रीमती डी.बी. गायकवाड अधिक्षक**
**न्याय शाखा सार्वजनिक न्यास**
**नोंदणी कार्यालय अमरावती**

# सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती विभाग अमरावती

**गृहनिर्माण भवन, दुसरा मजला, मालटेकडी जवळ, अमरावती**

## चौकशीची जाहीर नोटीस

**फेरफार अर्ज क्रमांकः- ४१४/२०२६; कलम २२** **ने.ता. ०८/१०/२०२६**
**सार्वजनिक न्यासाचे नाव नोंदणी क्रमांक -परमहंस पुंडलिकबाबा ट्रस्ट, विनायक नगर, राधा नगर, अमरावती ता. जि. अमरावती. नोंदणी क्रमांक ई १२३२/अम.**
**अर्जदार :- बाळु रामदास आसटकर रा. संतोष भुवन गल्ली, आसटकर प्लॉट, गाडगे नगर, अमरावती.**
**गैरअर्जदार -१. श्री. जगन्नाथ शेषराव ठाकरे रा. प्रशांत नगर, रुख्मीनी नगर, अमरावती.**

या जाहीर नोटीसादारे कळविण्यातयेते की, मा. धर्मादाय उपआयुक्त, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमुद केलेल्या फेरफार महाराष्ट्र सार्वजनिक विष्वस्त अधिनियम, १९५० चे कलम २२ अन्वये चौकशी करणार आहेत.सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये आपणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणे असेल आपण आपली लेखी कैफीयत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून या कार्यालयाचे वरील पत्त्यावर तीस दिवसांचे आत मिळेल अशा रीतीने पाठवावी किंवा आपण प्रत्यक्ष वरील नेमलेल्या तारखेस हजर राहावे. त्यानंतर आलेल्या कैफीयतचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफीयत न आल्यास आपणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुर्ण केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील. ही नोटीस माझे सहीनिशी व धर्मादाय उपआयुक्त अमरावती यांचे शिक्क्यानिशी आज दिनांक ०७/०९/२०२६ रोजी दिली.

शिक्का

**अधिक्षक (न्याय) सार्वजनिक न्यास नोंदणी**
**कार्यालय, अमरावती.**

## फ्लॅट विकणे आहे

शास्त्री नगर , टोपे नगर बोर्ड ऑफिस जवळ असलेला डुप्लेक्स फ्लॅट विकणे आहे . एक बेड रूम , किचन, स्वतंत्र डायनिंग , प्रशस्त हॉल, एक गेस्ट रूम, टेरेस असा फ्लॅट आहे.
**संपर्क : ९४२२८५७१६९**
**९४२२१२०४०६**

MAHAVITARAN
Maharashtra State Electricity Distribution Co. Ltd.

## E-Tender Notice

Superscribed tender offers are invited on-line from registered contractor/companies for e-tender **BILLING/EE/AKOLA/R/T-27/09-2026 to BILLING/EE/AKOLA/ R/T-31/09-2026 for Empanelment of Agencies for monthly meter reading for all five subdivisions under Rural Dn. Akola (05 tenders). The contract period will be of 01 year. EMD is 1% of total cost of Tender value & tender fee is Rs.2590 for all tenders.**

The details of tender are available on our official web site at http://etender.mahadiscom.in/eatApp/ & can be downloaded **from date 23.09.2026 onwards.** Submit the tender through e-tendering process only latest by **Dtd. 30.09.2026 up to 18.15 Hrs.** For further details refer to our website. Any changes in Tender Schedule, Corrigendum, Amendment, Extension of due dates etc, if any, shall be available on our website only & will not be published in the newspapers separately.

**PRO NO. 99/ Dt 21.09.2026**
**Executive Engineer, Rural Division M.S.E.D.C.L., Akola**

# जाहीर नोटीस

प्रोसेस क्र. २३८९/२०२५

**अमरावती येथील विद्यमान जिल्हा व सत्र न्यायाधिश -२, यांचे न्यायालय**

नियमित दिवाणी अपील क्र. ८६/२०२६ ने.ता.२८/१०/२०२६

**अर्जदार** - **सुनीता सुशील अहिर व इतर**
--- विरुध्द ---
**गैरअर्जदार** - **संतोष फुलचंद यादव व इतर**

**बनाम** -
१. **संतोष फुलचंद यादव,**
रा.देवमाळी, काशीकर लेआउट, परतवाडा, ता.अचलपूर,जि.अमरावती
२. **जतीन फुलचंद यादव**
रा.महानगर पालिका शाळा नं. ०२ चे बाजुला, मसानगंज, अमरावती
३. **नंदा घनश्याम यादव,** रा. बॉम्बे फैल, अमरावती
४. **चंदा सत्यनारायण यादव,**
रा.महानगर पालिका शाळा नं. ०२, मसानगंज, अमरावती
५. **पुनम दिनेश यादव**
रा.विलास आईस्कीम पार्लर चे बाजुला, दब्बुशेठ लाईन,
वेलमपल्ली, ता.वेलमपल्ली, जि.आदीलाबाद, आंध्रप्रदेश

**APPLICATION UNDER ORDER 5 RULE 20 OF CPC FOR PAPER PUBLICATION AGAINST THE NON APPLICANTS NOS. 1 TO 3 & 5**

ज्याअर्थी वरील अर्जदार सुनीता सुशील अहिर, वय ५१ वषे, धंदा-घरकाम, रा.न्यु रेल्वे कॉलनी, सिंधी कॅम्प, वर्धा ता.जि.वर्धा यांनी **वि. जिल्हा व सत्र न्यायाधिश-०२, अमरावती** यांच्या न्यायालयात अर्ज सादर केला आहे.

त्याअर्थी वरिल गैरअर्जदार यांना वारंवार नोटीस देऊनही न्यायालयात हजर राहत नसल्यामुळे त्यांना पेपर प्रसिध्दीव्दारे नोटिस देण्यात येते की, त्यांनी अर्जाची सुनावणीसाठी **दि.२८.१०.२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता **वि.जिल्हा व सत्र न्यायाधिश- २, अमरावती** यांचे न्यायालयात स्वतः किंवा रितसर निर्दिष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर व्हावे. वर नमुद केलेल्या तारखेस जर कोणीही हजर न झाल्यास सदर्हू अर्जाची एकतर्फी सुनावणी होवून निकाल दिला जाईल.

आज दिनांक / /२०२६ रोजी माझे सहीनिशी व कोर्टाचे शिक्क्यानिशी प्रसिध्दीसाठी दिला असे.

अमरावती
दिनांक : / /२०२६

शिक्का

**आदेशानुसार,**
**सहायक अधीक्षक (न्यायीक विभाग),**
**जिल्हा व सत्र न्यायालय, अमरावती**

# जाहीरनामा

या जाहिरनामाद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नाव श्री /श्रीमती /कु.श्री राजेंद्र प्रतापराव पखाले पत्ता-**सरमसपुरा अचलपूर** यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र.**२४** संगणक मालमत्ता क्र.**ACH A000024533** जुना मालमत्ता क्र.**२६०००२४१** नझुल शीट नं. **१४ बी** प्लॉट नं. **२२४** श्री /श्रीमती /कु. **श्री. प्रल्हाद रखुजी पखाले** या नावाने असुन वरील अर्जदार यांनी यांनी श्री /श्रीमती /कु. **श्री हरिसिंग जगराम बघेल** या नावाने फेरफार घेण्याकरिता / नाव बदलण्याम / नाव लावण्यास / नावामध्ये /क्षेत्रामध्ये / दुरुस्ती करण्याकरिता ( खरेदी, मृत्युपत्र, बक्षिसपन, नोटरी, प्रतिज्ञापत्र, न्यालावाद्वारे ) कार्यालयामध्ये दिनांक ३१/८/२०२६ रोजी अर्ज सादर केलेला आहे. याविषयी कोणास आक्षेप हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत लेखी स्वरूपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करून हजर राहावे. अन्यथा या मुदती नंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**टीप / लक्षवेध :-**
**उपरोक्त मालमत्तेची चतुसिमा :-**
**पूर्व-** रस्ता
**पश्चिम :-**रस्ता
**उत्तर** -बळीराम तांदुले यांचे घर
**दक्षिण :**नागोजी बळीराम राईकरवार यांचे घर

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अचलपूर**

# सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, अमरावती विभाग अमरावती चौकशीची जाहीर नोटीस

**फेरफार अहवाल / अर्ज क्रमांक**-१५०/१९/२०२६
**सार्वजनिक न्यासाचे नाव नोंदणी क्रमांकः-** एकदंत चॅरिटेबल ट्रस्ट तेलीपुरा, जुनी वस्ती, बडनेरा, ता. जि. अमरावती
**बाबत अर्जदार -श्री. योगेश ज्ञानेश्वर कावरे**

सर्व संबंधीत लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,
सहाय्यक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती विभाग, अमरावती हे वर नमूद केलेल्या फेरफार अहवाल / अर्जासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

(१) वर नमूद केलेला न्यास अस्तित्वात आहे का ? आणि सदरचा न्यासाचा सार्वजनिक स्वरूपाचा आहे काय ?
**(२) खाली निर्दिष्ट केलेली मिळकत सदर न्यासाची मालकीची आहे काय ?**
**(अ) जंगम मिळकत (वर्णन)ः**निरंक
**(ब) स्थावर मिळकत (वर्णन) :-** निरंक

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणे असेल त्यांनी लेखी कैफीयत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासून तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रीतीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफीयत विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफीयत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजून चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

नोटीस माझे सहीनिशी व मा. सहाय्यक धर्मादाय आयुक्त-०३, अमरावती यांचे शिक्यानिशी आज दिनांक २१/०९/२०२६ रोजी दिली.

शिक्का

**अधिक्षक न्याय शाखा**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय अमरावती**

# जाहीरनामा

या जाहिरनामाद्वारे सर्व जनतेला कळविण्यात येते की, अर्जदाराचे नाव श्री /श्रीमती श्री शहेजाद खान सत्तार खान पत्ता-**फरमानपुरा अचलपूर** यांनी अचलपूर नगर परिषदेच्या वार्ड क्र.**२४** संगणक मालमत्ता क्र.**ACH A000023470** जुना मालमत्ता क्र.**२२०००१०१** नझुल शीट नं. - **बी** प्लॉट नं. --श्री /श्रीमती /कु. **नझुल मो अरजाक शे हैदर** या नावाने असुन वरील अर्जदार यांनी यांनी श्री /श्रीमती /कु.**नझुल मो** श्री शहेजाद खान सत्तार खानया नावाने फेरफार घेण्याकरिता / नाव बदलण्याम / नाव लावण्यास / नावामध्ये /क्षेत्रामध्ये / दुरुस्ती करण्याकरिता ( खरेदी, मृत्युपत्र, बक्षिसपन, नोटरी, प्रतिज्ञापत्र, न्यालावाद्वारे ) कार्यालयामध्ये दिनांक २२/०९/२०२६ रोजी अर्ज सादर केलेला आहे. याविषयी कोणास आक्षेप हरकत घ्यावयाची असल्यास हा जाहिरनामा प्रसिद्ध झाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत लेखी स्वरूपात दस्तऐवजाचे पुराव्यासह दाखल करून हजर राहावे. अन्यथा या मुदती नंतर नियमाप्रमाणे प्रकरण निकाली काढण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**टीप / लक्षवेध :-वरील मालमत्ता नझुल मो मध्ये नाव समाविष्ट करण्याबाबत**
**उपरोक्त मालमत्तेची चतुसिमा :-**
**पूर्व-** जाण्या येण्याचा रस्ता
**पश्चिम :-**सपन नदीचे पात्र
**उत्तर -आमचे दुसरे घर**
**दक्षिण :-**रस्ता

**मुख्याधिकारी**
**नगर परिषद, अचलपूर**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय

## संक्षिप्त



### टायटन्सच्या बॉक्सिंगपटूंचे जिल्हास्तरावर यश

**अंजनगाव बारी-**डीएसओ जिल्हास्तरीय बॉक्सिंग चॅम्पियनशिप स्पर्धेत बडनेरा येथील टायटन्स पब्लिक स्कूलच्या खेळाडूंनी उत्कृष्ट कामगिरी करत शाळेच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला. स्पर्धेत शाळेच्या खेळाडूंनी २ सुवर्ण, ५ रौप्य व १ कांस्य अशी एकूण ८ पदके पटकावली. चुरशीच्या लढतीत वेदांत ठाकूर व तनिष आंबडकर यांनी प्रतिस्पर्ध्यांवर मात करत सुवर्णपदक मिळविले. सय्यद मोहम्मद, अर्णव मेश्राम, ओम हटवार, पूर्वेश धांडे व अहसान शेख यांनी रौप्यपदक पटकावले. तर अहझम शेख याने उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत कांस्यपदक मिळविले.या यशामागे शाळेचे क्रीडा शिक्षक जाफरखान व निलेश फुलंबरकर यांचे मार्गदर्शन महत्त्वाचे ठरले.खेळाडूंच्या या उल्लेखनीय यशाबद्दल विदर्भ यूथ वेल्फेअर सोसायटीचे अध्यक्ष नितीन धांडे,उपाध्यक्ष उदय देशमुख, सचिव युवराजसिंग चौधरी, कोषाध्यक्ष हेमंत देशमुख तसेच संस्थेचे सदस्य नितीन हिवसे, विनय गोहाड, गजानन काळे व पूनम चौधरी यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले.शाळेचे प्राचार्य अजय चौबे यांनीही विजेत्या खेळाडूंचे कौतुक करत त्यांना शुभेच्छा दिल्या.



### तालुका दुष्काळग्रस्त घोषित करा

**शिराळा-** अमरावती तालुक्यातील सर्वच गावांमध्ये गेल्या चाळीस दिवसांपासून पाऊस थांबला आहे. त्यामुळे सोयाबीन तुर कापूस पिकाला पाणी मिळाले नाही. तिवसा मतदार संघात पालकमंत्री यांनी सर्वे करून पाहणी केली. कृषीमंत्री यांनी अकोला येथे आढावा बैठक घेतली.परतु ठोस निर्णय घेतला नाही. दिवाळी अगोदर शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे जमा झाले पाहिजे अशी अमरावती तालुक्यातील शेतकऱ्यांची मागणी आहे. सरसकट पिकांची नुकसान भरपाई द्यावी.अमरावती जिल्हा विदर्भ दिड महिन्यांपासून पावसाची वाट पाहत आहे. तुटपुंज्या पाण्यावर पिके संकटात सापडली आहे. शेतकऱ्यांची दिवाळी अंधारात जाते कि काय असा प्रश्न शेतकऱ्यांना पडला आहे. सर्वे पाहणी करुन दिवाळी अगोदर शेतकऱ्यांच्या खात्यावर पैसे जमा करण्याची मागणी अमरावती तालुक्यातील शेतकऱ्यांनी केली आहे.अजनगाव बारी, शिराळा, वलगाव, नांदगाव पेठ व इतर गावातील पिके सुकण्याच्या मार्गावर आहेत. महाराष्ट्र शासनाने व अमरावती पालकमंत्री यांनी या बाबीची दाखल घेवुन अमरावती तालुका दुष्काळग्रस्त घोषित करुन शेतकऱ्यांना नुकसानभरपाई द्यावी.अशी अमरावती तालुक्यातील शेतकऱ्यांची मागणी केली आहे.

### विद्यापीठात 'हिंदी पखवाडा' उद्‌घाटन

**अमरावती-**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाच्या अनुवाद हिंदी विभागात 'हिंदी पखवाडा' उद्‌घाटनचा कार्यक्रम पार पडला. यावेळी उद्घाटक प्रो.डॉ.मोना चिमोटे तसेच प्रमुख वक्ते डॉ.राजेश सिंह कुशवाहा, सहयोगी प्राध्यापक, भारतीय जनसंचार संस्थान अमरावती आणि अध्यक्ष प्रो.डॉ. माधव पुटवाड प्रभारी विभाग प्रमुख, अनुवाद हिंदी विभाग सं.गा.बा.अवि.अमरावती उपस्थित होते. प्रस्तावना आणि अतिथिंच्या परिचयानंतर डॉ. मोना चिमोटे यांनी औपचारिकपणे कार्यक्रमाच्या विधिवत उद्‌घाटनाची घोषणा केली.या प्रसंगी, हिंदी अनुवाद विभागातील उपलब्धि मध्ये डॉ.सुनीता शिवशंकर बुंदेले लिखित पुस्तक 'वाणिज्य क्षेत्र में अनुवाद की समस्याएँ एवं समाधान' आणि लेखक डॉ. हनुमत भोपाळे यांच्या 'यशाचा राजमार्ग' या मराठी पुस्तकाचे हिंदी अनुवाद 'सफलता का राजपथ ' अनुदित कृति चे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.

## महानुभाव साहित्याची व्याप्ती वाढविणे काळाची गरज-महंत पाचराऊत बाबा

### तिसऱ्या महानुभाव साहित्य संमेलनाचा समारोप

**अमरावती/का.प्र.**

माणसाला भेडसावणा-या प्रत्येक समस्येचे समाधान महानुभाव साहित्यात आपल्याला दिसून येते. अशा या महानुभाव साहित्याची व्याप्ती वाढविणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन तिस-या महानुभाव साहित्य संमेलनाच्या समारोपीय कार्यक्रमाचे अध्यक्ष महंत पाचराऊत बाबा यांनी केले.

समारोपीय कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून विद्यापीठ व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रविंद्र कडू, डॉ. भैय्यासाहेब मेटकर, विद्यापीठ अधिसभा सदस्य ॲड. अमोल ठाकरे, मराठी भाषा विद्यापीठाच्या अधिष्ठाता डॉ. कोमल ठाकरे, अध्यासन केंद्राचे समन्वयक डॉ. महंत सोनपेठकर बाबा, डॉ. अण्णा वैद्य, प्राचार्य डॉ.संतोष आगरकर,परसराज कारंजेकर आदी मान्यवर उपस्थित होते.



या दोन दिवसीय संमेलनात सकाळी डॉ.अविनाश आवलगावकर, कुलगुरू, मराठी भाषा विद्यापीठ यांची डॉ. कोमल ठाकरे,अधिष्ठाता यांनी प्रकट मुलाखत घेतली. चौथ्या सत्रात महाराष्ट्राच्या जडणघडणीत महानुभाव पंथाचे योगदान या दुस-या परिसंवादाचे अध्यक्षस्थान डॉ. कोमल ठाकरे यांनी भूषविले. यावेळी डॉ. मिनाक्षी भांदककर, प्रा. संदीप तडस, डॉ. कल्पना मेहरे यांनी पंथाचे आध्यात्मिक, धार्मिक व सामाजिक योगदान याविषयी शिल्प गुंफले.तर पाचव्या सत्रात महानुभाव दर्शनशास्त्र : स्वरूप व वैशिष्टय या तिस-या परिसंवादाचे अध्यक्षस्थान आचार्य महंत अष्टुरकर बाबा यांनी भूषविले. या परिसंवादात महंत श्री सारंगधरबाबा शास्त्री पुसदेकर, नितीनदादा बांधकर यांनी विचार व्यक्त केले.

समारोपीय कार्यक्रमात ॲड. अमोल ठाकरे यांनी महानुभाव पंथाचे तत्त्वज्ञान ख-या अर्थाने तरुणांपर्यंत पोहोचण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले. डॉ. भैय्यासाहेब मेटकर यांनी संमेलनाच्या यशस्वी आयोजनाबद्दल समाधान व्यक्त केले.

डॉ.रवींद्र कडू यांनी मराठी भाषा समृध्द करण्यात महानुभाव साहित्याचे महत्त्वपूर्ण योगदान असल्याचे नमूद केले.कार्यक्रमाचे संचालन डॉ. संदीप जुनघरे यांनी, तर समारोपीय प्रास्ताविक महंत सोनपेठकर बाबा यांनी केले. संमेलनात महानुभाव साहित्य चित्र प्रदर्शनीचे मान्यवरांनी व साहित्यिकांनी अवलोकन केले. कार्यक्रमासाठी भारतीय महाविद्यालय, मोर्शी येथील प्राध्यापक, विद्यार्थी तसेच श्री चक्रधर स्वामी अष्टशताब्दी महोत्सव समिती, मोर्शी व साहित्यिकांचे मोलाचे सहकार्य लाभले.

## इतिहास व राज्यशास्त्र अभ्यास मंडळाचे उद्‌घाटन




**परतवाडा -** भारतीय विद्या मंदिर, अमरावतीद्वारा संचालित भगवंतराव शिवाजी पाटील महाविद्यालय, परतवाडा येथे इतिहास अभ्यास मंडळ व राज्यशास्त्र अभ्यास मंडळाच्या सत्र २०२६-२७ च्या उद्‌घाटनासह मोडी लिपी प्रशिक्षण वर्गातील विद्यार्थ्यांच्या प्रमाणपत्र वितरणाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अनिल खांडेकर होते. प्रमुख उपस्थिती म्हणून डॉ. स्वाती वानखडे, डॉ. भैया चिखले, प्रा. बी. एस. मासोदकर व प्रा. सारंग धारस्कर उपस्थित होते.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. स्वाती वानखडे यांनी केले. सत्र २०२६-२७ साठी इतिहास अभ्यास मंडळाच्या कार्यकारिणीत तनुष्का कौतिक्कर – अध्यक्ष, मयूर नांदणे उपाध्यक्ष यांची निवड करण्यात आली.

तसेच मुनेश्वर तोटे, निशा सावरकर, राजश्री धोपटे, श्रुती धुर्वे आणि दिव्या परतेकी यांची सदस्य म्हणून निवड करण्यात आली. कार्यक्रमाचे संचालन भाग्यश्री मोरले यांनी केले. त्यांनी कार्यक्रमातील विविध टप्पे प्रभावीपणे पार पाडले. कार्यक्रमाच्या शेवटी निशा सावलकर यांनी आभार केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी इतिहास व राज्यशास्त्र विभागातील प्राध्यापक तसेच विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## गणेशोत्सवासाठी पोलिसांचा कडेकोट बंदोबस्त

### ३६ गणेश मंडळे,१२ गावांत 'एक गाव, एक गणपती' उपक्रम

**आसेगाव पूर्णा/वार्ताहर**

गणेशोत्सवाच्या पार्श्वभूमीवर आसेगाव पूर्णा पोलीस ठाण्याच्या हद्दीत कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी कडेकोट बंदोबस्ताचे नियोजन करण्यात आले आहे. हद्दीत एकूण ३६ गणेश मंडळे असून, १२ गावांत 'एक गाव, एक गणपती' उपक्रम राबविण्यात येत आहे. बंदोबस्तासाठी ७ पोलीस अधिकारी, ६५ अंमलदार व २९ होमगार्ड तैनात करण्यात आले आहेत. अतिसंवेदनशील पूर्णानगर येथे रूटमार्च घेण्यात आला असून, संवेदनशील भागात नियमित पेट्रोलिंग सुरू आहे. 'एक मंडळ, एक अंमलदार' या पद्धतीने मंडळांची दत्तक नियुक्ती करण्यात आली आहे.'ऑपरेशन कवच'अंतर्गत 'नशेला नकार, जीवनाचा स्वीकार' या संदेशातून जनजागृती केली जात आहे. तसेच सायबर फसवणूक, अमली पदार्थ आणि इतर गैरप्रकारांपासून सावध राहण्याच्या सूचना मंडळांना देण्यात आल्या आहेत. विसर्जन मिरवणुकीत पारंपरिक वाद्यांना प्राधान्य देण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

'गणेशोत्सव शांततेत आणि उत्साहात पार पाडण्यासाठी पोलीस प्रशासन सज्ज आहे. नागरिकांनी अफवांवर विश्वास न ठेवता कोणतीही अडचण अथवा संशयास्पद बाब निदर्शनास आल्यास तत्काळ पोलिसांशी संपर्क साधावा.'

**वैशाली भोये,** परिवीक्षाधीन पोलीस उपअधीक्षक

सर्व गणेश मंडळांनी शासन व पोलिसांच्या सूचनांचे पालन करावे. मिरवणुकीदरम्यान शिस्त व शांतता राखून पोलिसांना सहकार्य करावे. कायदा व सुव्यवस्था बिघडविणाऱ्या प्रकारांवर लक्ष ठेवण्यात येत आहे.'

**सतीश खेडेकर,** सहायक पोलीस निरीक्षक



## साऊर-टाकरखेडा मार्ग बनला धोकादायक

### मोकाट कुत्र्यांमुळे दुचाकीस्वार जखमी

**टाकरखेडा संभू/वार्ताहर**

सोमवारी पहाटे साडेसहाच्या सुमारास साऊर येथून अमरावतीकडे टाकरखेडा शंभू मार्गे सोलरच्या कामावर जाणाऱ्या दोन युवकांच्या दुचाकीला साऊर येथील गजानन महाराज मंदिराजवळ अपघात झाला. दुचाकीसमोर अचानक मोकाट कुत्र्यांचा मोठा कळप आडवा आल्याने चालकाचा दुचाकीवरील ताबा सुटला. या अपघातात यश नरेंद्र हाटे व यश देवेंद्र पारधेकर, दोघेही रा. साऊर, हे जखमी झाले.

साऊर ते शिराळा तसेच टाकरखेडा शंभूला जोडणाऱ्या या मार्गाची सध्या मोठ्या प्रमाणात दुरवस्था झाली आहे. रस्त्याच्या मधोमध मोठमोठे खड्डे पडले असून अनेक ठिकाणी भेगाही पडल्या आहेत. त्यामुळे वाहनचालकांना वाहन चालविताना मोठी कसरत करावी लागत आहे.

रस्त्याची दुरवस्था, वाढलेल्या झाडांच्या फांद्या आणि मोकाट कुत्र्यांचे कळप या तिन्ही समस्यांमुळे या मार्गावर अपघाताचा धोका वाढला आहे. संबंधित विभागाने तातडीने रस्त्याची पाहणी करून खड्डे व भेगा दुरुस्त कराव्यात, रस्त्यालगतच्या वाढलेल्या झाडांच्या फांद्यांची छाटणी करावी तसेच मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी वाहनचालक व नागरिकांकडून होत आहे.

दरम्यान, अपघातानंतर दोन्ही जखमींना तातडीने अमरावती येथील डॉ. गौरव मिलके यांच्याकडे उपचारासाठी नेण्यात आले. डॉक्टरांना दूरध्वनीवरून अपघाताची माहिती देण्यात आल्यानंतर त्यांनी तात्काळ उपचाराची व्यवस्था केली.या मार्गावर दररोज कामानिमित्त मोठ्या संख्येने नागरिकांची ये-जा सुरू असते. त्यामुळे आणखी




एखादी गंभीर दुर्घटना घडण्यापूर्वी प्रशासनाने या मार्गाची तातडीने पाहणी करून रस्त्याची दुरुस्ती, झाडांच्या फांद्यांची छाटणी आणि मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

## श्री महाकाल गणेशोत्सव मंडळात विविध स्पर्धांचे आयोजन

**अंजनगाव बारी-**मासोद येथे 'मासोदचा राजा, जय श्री महाकाल गणेशोत्सव मंडळा'च्या वतीने यंदा 'एक गाव, एक गणपती' उपक्रमांतर्गत गणेशोत्सव उत्साहात साजरा करण्यात येत आहे. मंडळाचे हे दुसरे वर्ष असून, यानिमित्त आरोग्य शिबिरासह मुला-मुलींसाठी संगीत खुर्ची, मटकी फोड, लिंबू-चमचा तसेच विविध शैक्षणिक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. विजेत्यांना बक्षीस वितरण करण्यात आले. २४ सप्टेंबर रोजी सायंकाळी ६ ते रात्री १० वाजेपर्यंत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. तर २५ सप्टेंबर रोजी अनंत



चतुर्दशीच्या दिवशी गावातून मिरवणूक काढून गणरायाचे विसर्जन करण्यात येणार आहे.मासोद येथे 'एक गाव, एक गणपती'ची सुमारे २० वर्षांची परंपरा राहिली आहे. गणेशोत्सव यशस्वी करण्यासाठी मंडळाचे कार्यकर्ते व बालगोपाळ परिश्रम घेत असून, गावकऱ्यांचेही सहकार्य लाभत आहे.

## श्री.गणेशाचा नेमका काळ कोणता?

**श्री.** गणेश किंवा गणपती संकल्पनेचा इतिहास आणि उगम, सुमारे ३,५०० ते ४,००० वर्षे किंवा त्याहूनही जुना मानला जातो. ही संकल्पना एकाएकी निर्माण न होता. शतकानू शतके झालेल्या सांस्कृतिक बदलांमधून विकसित झाली आहे.

वैदिक काळ (इ.स.पूर्व १५०० ते १२००)ऋग्वेदामध्ये,'गणपति' किंवा 'ब्रह्मणस्पती' असा उल्लेख आढळतो. त्या काळी 'गण' म्हणजे समूहाचा किंवा देवदूतांच्या टोळीचा प्रमुख (अधिपती) असा त्याचा अर्थ होता. तो ज्ञान आणि बुद्धीचा अधिपती मानला जात असे ऋग्वेदात 'गणानां त्वा गणपतिं हवामहे...' हा प्रसिद्ध मंत्र आढळतो. येथे 'गणपती' या शब्दाचा अर्थ 'गणांचा (समूहाचा) प्रमुख किंवा रक्षक' असा आहे. वैदिक काळात ही संकल्पना प्रामुख्याने बृहस्पती किंवा इंद्राशी जोडलेली होती.

**इ.स.पूर्व ७ वे ते ४ थे शतक-** 'मानवगृह्यसूत्र' आणि 'याज्ञवल्क्य स्मृती' सारख्या ग्रंथांमध्ये 'विनायक' नावाच्या चार अमूर्त शक्तींचा (किंवा आत्म्यांचा) उल्लेख आढळतो. जे मानवी जीवनात अडथळे निर्माण करायचे. नंतरच्या काळात हे चार विनायक एकत्र येऊन एकच 'विनायक' (विघ्नहर्ता आणि विघ्नकर्ता) बनले.

**गुप्त काळ आणि पुराण काळ (इ.स. ४ थे ते ६ वे शतक)-** आज आपण ज्या स्वरूपात गणपतीला पाहतो (गजमुख, लंबोदर, विघ्नहर्ता), त्या स्पष्ट आणि आधुनिक संकल्पनेची स्थापना गुप्त साम्राज्याच्या काळात झाली.या काळात गणेश ही स्वतंत्र आणि मुख्य देवता म्हणून प्रस्थापित झाली. महाभारत लिहिणारे 'लेखनिक' म्हणूनही गणेशाची संकल्पना याच काळात दृढ झाली.पुढे 'गणेश पुराण' आणि 'मुद्गल पुराण' यांसारख्या ग्रंथांमध्ये गणेशाच्या कथा आणि तत्त्वज्ञान सविस्तर मांडले गेले.इतिहासाचार्य वि. का. राजवाडे यांच्या मते गणपतीच्या उपासनेचा इतिहास केवळ १३०० वर्षांपुरता मर्यादित नाही; तो त्यापेक्षा किमान एक हजार वर्षे अधिक जुना आहे. म्हणजे आजपासून जवळ जवळ २५०० वर्षे जुना राजवाड्यांनी हा मुद्दा १९०५ मध्ये सरस्वती मंदिर मासिकात प्रसिद्ध केलेल्या लेखात मांडला होता.



**राजवाड्यांचा मुख्य युक्तिवाद**

बाणभट्टाचे 'हर्षचरित' - इ.स. ७व्या शतकातील या ग्रंथात गणपतीसंबंधी उल्लेख आढळतो. त्यामुळे गणपतीची उपासना त्या काळात निश्चितच अस्तित्वात होती. 'गाथासप्तशती'- सातवाहनकालीन प्राकृत गाथासंग्रहात गणपतीच्या सोंडेचा उल्लेख असल्याचे राजवाडे दाखवतात. हा उल्लेख अत्यंत महत्त्वाचा आहे, कारण तो गणपतीच्या प्रतिमेची कल्पना बरीच जुनी असल्याचे सूचित करतो.आपस्तंबांच्या परंपरेतील मंत्र -'तत्पुरुषाय विद्महे वक्रतुंडाय धीमहि'या स्वरूपातील गणेशमंत्राचा संदर्भ देऊन, राजवाडे गणपतीची संकल्पना आणखी प्राचीन काळात नेते.

**भारताबाहेर गणेश उपासना -** भारताबाहेर अनेक देशांमध्ये भगवान गणेशाच्या प्राचीन आणि भव्य मूर्ती सापडतात. आशियाई देशांमध्ये सनातन धर्माच्या आणि बौद्ध धर्माच्या प्रसारामुळे, गणपती बाप्पाची पूजा वेगवेगळ्या रूपात केली जाते.भारताबाहेर ज्या मुख्य देशांमध्ये गणेशाच्या मूर्ती आणि मंदिरे आढळतात.इंडोनेशिया हा मुस्लीम बहुल देश असला,तरी तिथे गणपतीला खूप मोठे स्थान आहे.ज्वालामुखीच्या काठावरील गणपती आहे.पूर्व जावा मधील माउंट ब्रोमो या जिवंत ज्वालामुखीच्या, अगदी काठावर गणपतीची एक प्राचीन मूर्ती आहे. स्थानिक लोक ज्वालामुखीचा कोप होऊ नये, म्हणून आजही या बाप्पाची पूजा करतात.प्रमबाणन मंदिर येथील ९ व्या शतकातील प्रसिद्ध शिवमंदिरात गणेशाची मूर्ती आहे. इंडोनेशियाच्या चलनात २०,००० रुपयाच्या नोटेवर देखील, भगवान गणेशाचा फोटो छापलेला होता.तो २००८ साली काढला गेला.

**थायलंड -** थायलंडमध्ये गणपतीला 'फ्रा फिकानेत' म्हटले जाते. इथे कला आणि यशाची देवता म्हणून त्यांची, श्री गणेशवर मोठी श्रद्धा आहे.चाचोएंगसाओ या शहराला, थायलंडचे 'गणेश शहर' म्हणतात. इथे गणपतीच्या तीन महाकाय मूर्ती आहेत, ज्यामध्ये सुमारे १५० फूट उंच बसलेली मूर्ती आणि ३९ मीटर उंच उभी असलेली मूर्ती जगप्रसिद्ध आहे.

**जपान -** जपानमध्ये गणपतीला 'डकांगितेन. किंवा शोटेन या नावाने ओळखले जाते.टोकियो मधील प्रसिद्ध मात्सुचियामा शोदेन मंदिरासह, संपूर्ण जपानमध्ये गणपतीची सुमारे २५० मंदिरे आहेत.

येथे गणपतीचे रूप थोडे वेगळे आहे.एकमेकांना मिठी मारलेल्या जोडप्याच्या रूपात असते.

**कंबोडिया** - येथे जगप्रसिद्ध अंगकोर वाट मंदिर परिसराच्या उत्खननात ५ व्या शतकापासूनच्या प्राचीन गणेश मूर्ती सापडल्या आहेत. इथे गणेशाला 'प्रह केनेश' म्हटले जाते.

**अफगाणिस्तान** - अफगाणिस्तानमधील काबूल जवळील गार्डेझ या ठिकाणी, 'गार्डेझ गणेश' नावाने ओळखली जाणारी एक प्रसिद्ध प्राचीन मूर्ती सापडली होती. ही मूर्ती ५ व्या ते ६ व्या शतकातील असल्याचे मानले जाते.

**म्यानमार / बर्मा -** येथील प्राचीन श्वेसांडॉ पॅगोडा च्या कोपऱ्यांवर गणपतीच्या मूर्ती बसवलेल्या आहेत. यामुळे स्थानिक लोक याला 'गणेश पॅगोडा' म्हणूनही ओळखतात.

**चीन-**उत्तर चीनमध्ये झालेल्या उत्खननात इ.स. ५३१ मध्ये, गणपतीची एक अत्यंत प्राचीन दगडी मूर्ती सापडली आहे, जी सध्या तिथल्या संग्रहालयात जतन केलेली आहे.

याशिवाय नेपाळ, श्रीलंका, मॉरिशस, मलेशिया, अमेरिका आणि लंडनच्या संग्रहालयांमध्येही भारताबाहेरील अनेक प्राचीन गणेश मूर्ती पाहायला मिळते.तसेच भारतात मध्ये देवापासून तर पुराणांनी पर्यंत,श्री गणेशाचा उल्लेख आढळून येतो.सार्वजनिक धार्मिक उत्सवातूनच ते शक्य होते.

त्यावेळी धार्मिक उत्सवांना इंग्रजांचा विरोध ही नव्हता.लोकमान्य टिळकांनी ही गोष्ट हेरली.स्वातंत्र्य चळवळीच्या जन प्रबोधनासाठी,लोकमान्यांनी सार्वजनिक गणेशोत्सवाची सुरुवात केली.या सार्वजनिक गणेशोत्सवा मधून, धार्मिक प्रबोधना सोबत, स्वातंत्र्य चळवळीचे प्रबोधन ही सुरू झाले.

लोकमान्य टिळकांच्या सार्वजनिक गणेशोत्सवा पासूनच,श्री गणेशाचे मातीच्या पार्थिव मुर्ती पुजनाला सुरवात झाली.आज सार्वजनिक स्वरूपात नव्हे तर, घरोघरी श्री.गणेशाच्या मातीच्या पार्थिव मुर्तीचे पुजा, दहा दिवस मोठ्या उत्साहात व मनोभावे केल्या जाते.

**राजाभाऊ देशमुख,**
**चांदूरबाजार**

जनमाध्यम
एक प्रतिष्ठित सवय


# ४८ कोटींचा दंड थकीत; क्रशर मात्र 'फुल्ल'!

## बोजा चढवून महसूल प्रशासनाची जबाबदारी संपली का?

### -जप्ती-लिलावाची फाईलही विहित नमुन्यात जाणीवपूर्वक अडकली

### -तहसीलदार यांच्या कार्यप्रणालीवर उठताहेत प्रश्नचिन्ह

**गाजीपूर-रुदाळी खाण फाईल्स**

**ॲड. समीर ठाकूर**

**अकोला :** शासनाची तब्बल ४८ कोटी रुपयांची दंडाची थकबाकी; मालमत्तेवर बोजा; जप्ती आणि लिलावाची प्रक्रिया विहित नमुन्याची ढाल पुढे करीत वेळ मारून नेण्याचा केविलवाणा प्रयत्न; मात्र दंडग्रस्त चांडक यांचे दोन - दोन क्रशर सुरू .... अकोट तालुक्यातील या प्रकाराने महसूल प्रशासनाच्या कार्यपद्धतीवरच गंभीर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सरकारच्या तिजोरीत पैसा जमा होत नाही आणि थकबाकीदाराचा व्यवसाय सुरू असल्याचे चित्र असेल, तर नेमकी कारवाई कुठे होतेय? असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.

एकीकडे कोट्यवधींच्या दंडवसुलीची जबाबदारी महसूल प्रशासनावर, तर दुसरीकडे संबंधित दंडग्रस्ताचे क्रशर सुरू असल्याचा आरोप. त्यातच नव्याने दुसरे क्रशर उभारण्यात आल्याची माहिती समोर येत असल्याने या संपूर्ण प्रकरणाची आणि अकोट तहसिलदारांची सखोल चौकशी करण्याची मागणीच आता यानिमित्ताने जोर धरू लागली आहे.

मालमत्तेवर बोजा चढविणे ही वसुलीच्या प्रक्रियेतील बाब असू शकते; परंतु त्यातून शासनाच्या तिजोरीत ४८ कोटी रुपये जमा झाले, असे होत नाही. मग आजपर्यंत प्रत्यक्ष किती रक्कम वसूल झाली? याचा स्पष्ट हिशेब प्रशासनाने द्यावा. केवळ मालमत्ता पत्रक, सात बाऱ्यावर बोजा चढवून मोकळे न होता दंडग्रस्त चांडक यांची किती कोटींची शासकीय कंत्राटी देयके ही या दंडाच्या रक्कमेशी संलग्न करण्यात आली, दंडवसुलीसाठी कागदोपत्री नोटीस लिलावाचा प्रस्ताव तहसीलदार कार्यालयामार्फत पाठविण्यात आल्याचे सांगितले जाते. मात्र प्रस्ताव विहित नमुन्यात नसल्याने पुढील प्रक्रिया अडल्याचा आरोप आहे. यामुळे प्रश्न अधिकच गंभीर बनतो की, ४८ कोटींच्या सरकारी महसुलाच्या वसुलीसाठी प्रस्ताव पाठविणाऱ्या तहसीलदार ( कार्यालय ) यांनाच विहित नमुन्याची माहिती नसेल, तर जबाबदार कोण?

?त्यातच भरीस भर म्हणून 'विहित नमुना मिळाल्यानंतर प्रस्ताव पाठवू' अशी भूमिका घेतली जात असेल, तर वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या दिरंगाईची कारणे तपासली गेली पाहिजेत आणि जबाबदारी निश्चित करीत संबंधित अधिकारी वर्गावर कारवाईचा बडगा उगारला गेला वगळता कोणते उद्योग सील करण्यात आले, त्यातून किती दंडाची रक्कम वसूल करण्यात आली याचा खुलासा दस्तरखुद्द तहसीलदार यांनी करावा अशी मागणी जोर धरत आहे.

**जप्ती-लिलावाचा प्रस्तावही कार्यालयीन 'खोळंब्यात'**

या प्रकरणात संबंधित दंडग्रस्ताच्या मालमत्ता जप्ती आणि पाहिजे जेणेकरून तेव्हाच अशा प्रकारची दिरंगाई करण्याची हिंमत पुढे कोणी दाखविणार नाही.

### ■ दंड थकीत असताना दुसरा क्रशर कसा उभा राहिला?

संबंधित व्यक्तीवर एवढी मोठी दंडाची थकबाकी प्रलंबित असताना दुसरा क्रशर उभारण्यात आला असेल, तर हा योगायोग आहे की प्रशासनाच्या देखरेखीतील अर्थपूर्ण दुर्लक्षित त्रुटी, हा तपासाचा विषय आहे. नवीन क्रशरची जमीन कोणाच्या ( आदिवासी बांधवांच्या ) नावावर आहे? परवानगी कोणाच्या नावाने? अर्जदार कोण? संबंधित व्यक्तीशी त्याचा संबंध काय? शासनाची थकबाकी लक्षात घेऊन संबंधित विभागांनी पडताळणी केली का? या सर्व बाबींची चौकशी झाली पाहिजे.

### ■ क्रशर सुरू असल्यास परवानग्यांची तपासणी झाली का?

या प्रकरणातील सर्वांत महत्त्वाचा मुद्दा म्हणजे संबंधित सुरू असलेली दोन - दोन क्रशर. जर क्रशर प्रत्यक्ष सुरू असेल, तर प्रशासनाने त्याची वैधता तपासली आहे का? आवश्यक परवाने आहेत का? खनिज कुठून येते? वाहतुकीची कागदपत्रे आहेत का? प्रदूषण नियंत्रणासंबंधी आवश्यक संमती आहे का? नव्याने उभारण्यात आलेल्या क्रशरसाठी स्वतंत्र मंजुरी घेण्यात आली आहे का? क्रशर साठी लागणारे खनिजाचे वैध स्रोत कोणते ? या प्रश्नांची उत्तरे कागदोपत्री उपलब्ध असली पाहिजेत. आणि जर सदर क्रशर वैध असेल तर कागद दाखवा; अवैध असेल तर कारवाई का नाही ? असा यक्ष प्रश्न यानिमित्ताने उपस्थित होत आहे.

### ■ फाईलमधील प्रत्येक दिवसाचा हिशेब द्या

या प्रकरणात दंड निश्चित झाल्यापासून आजपर्यंतच्या प्रत्येक टप्प्याचा हिशेब आता समोर येणे गरजेचे आहे. दंडाचा आदेश कधी? वसुलीची नोटीस कधी? उच्च न्यायालयाने दिलेली कालमर्यादा किती ? अपील कधी? अपीलचा निकाल कधी? बोजा कधी? जप्तीचा प्रस्ताव कधी? आणि प्रत्येक टप्प्यावर फाईल किती दिवस कोणत्या अधिकाऱ्याकडे होती? ४८ कोटींच्या वसुलीचा प्रश्न असेल तर फाईलच्या प्रत्येक पानाचा हिशेबही द्यावा लागेल.

### ■ वरिष्ठांच्या अहवालात 'सगळे आलबेल' दाखविण्याचा प्रयत्न नको-

या प्रकरणी वरिष्ठ पातळीवरून अहवाल मागविण्यात आल्याची माहिती आहे. त्यामुळे आता या अहवालात केवळ 'कार्यवाही सुरू आहे' अशी जुजबी नोंद न करता प्रत्यक्ष परिस्थिती मांडणे गरजेचे आहे. वसुलीत नेमकी किती दिरंगाई झाली? कोणत्या टप्प्यावर अडथळा निर्माण झाला? प्रस्तावात त्रुटी कोणी ठेवल्या? संबंधित क्रशरची सद्यस्थिती काय? आतापर्यंत किती महसूल वसूल झाला? या प्रश्नांची उत्तरे अहवालात असली पाहिजेत. अन्यथा वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठविला जाणारा अहवाल हा वस्तुस्थिती मांडण्याऐवजी दिरंगाईवर पडदा टाकण्याचा प्रयत्न ठरू शकतो, अशी शंका निर्माण होण्यास वाव राहील.

# २०० जिल्ह्यांत अध्यात्मवर आंतरराष्ट्रीय ऑलिम्पियाड



### -३ कोटींची बक्षिसे होणार वितरित
### -पाच गटात देशव्यापी नोंदणी सुरू

**अमरावती/प्रतिनिधीः-** देशात पहिल्यांदाच अध्यात्म आणि संस्कृतीवर आधारित ऑलिम्पियाडचे आयोजन करण्यात येत आहे. भारतीय ज्ञान परंपरेला समाहित करत एक समग्र पाठ्यक्रम तयार करण्यात आला आहे. या मध्ये वेद, उपनिषद, ब्रह्मसूत्र, रामायण, गीता, ऋषी परंपरा, संत परंपरा, जैन, बौद्ध, शीख सह इतर भारतीय दर्शन, चिंतन, मत-पंथ यांचा समावेश करण्यात आला आहे. या ओलंपियाडची नोंदणी सुरू झाली असल्याची माहिती आज मंगळवार २२ सप्टेंबर रोजी झालेल्या पत्रकार परिषद मध्ये उद्योजक चंद्रकुमार उर्फ लप्पी जाजोदिया यांनी दिली. त्यांनी सांगितले की,भारतवर्षीय दर्शन-चिंतन-मत-पंथाचा अध्यात्म अभ्यास ही (पान २ वर)



# अखेर कमलेशची झुंज संपली; उपचारादरम्यान मृत्यू




**कुऱ्हा/प्रतिनिधीः-** शेंदुरजना माहुरा (ता.तिवसा) येथे १७ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजताच्या सुमारास अपघातात गंभीर जखमी झालेल्या कमलेश अरुण चिरडे (वय २७, रा. कुऱ्हा) यांची मृत्यूशी सुरू असलेली झुंज अखेर संपली. अमरावती येथील पंजाबराव देशमुख रुग्णालयात उपचारादरम्यान मंगळवारी, २२ सप्टेंबर रोजी दुपारी १ वाजताच्या सुमारास त्यांचा मृत्यू झाला.

मिळालेल्या माहितीनुसार, १७ सप्टेंबर रोजी शेंदुरजना माहुरा येथे अपघात झाला. या अपघातात कमलेश चिरडे यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती. अपघातानंतर त्यांना तातडीने उपचारासाठी अमरावती येथील पंजाबराव देशमुख रुग्णालयात दाखल करण्यात आले. त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाल्याने डॉक्टरांनी शस्त्रक्रिया केली होती.

शस्त्रक्रियेनंतरही कमलेश यांची प्रकृती चिंताजनक होती. डॉक्टरांच्या देखरेखीखाली त्यांच्यावर उपचार सुरू होते. कुटुंबीय आणि नातेवाईक त्यांच्या प्रकृतीत सुधारणा होण्याची आशा बाळगून होते. मात्र, उपचार सुरू असतानाच मंगळवारी दुपारी १ वाजता त्यांनी अखेरचा श्वास घेतला. कमलेश यांच्या निधनाची बातमी समजताच कुऱ्हा परिसरात हळहळ (पान २ वर)

## वडिलोपार्जित जमिनीचा रक्तरंजित वाद

# धाकट्या भावाच्या हल्ल्यात मोठ्या भावाचा मृत्यू



**यवतमाळ/प्रतिनिधीः-** वणी तालुक्यातील मंदर येथे वडिलोपार्जित जागेच्या हक्कावरून सख्ख्या भावांमध्ये सुरू असलेल्या वादाला सोमवारी रात्री रक्तरंजित वळण मिळाले. धाकट्या भावाने मोठ्या भावावर चाकूने हल्ला केल्याची घटना २१ सप्टेंबरच्या रात्री घडली. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या संतोष बुरडकर यांचा चंद्रपूर येथे उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेने मंदरसह परिसरात खळबळ उडाली आहे.

संतोष बुरडकर आणि त्यांचे भाऊ रविंद्र बुरडकर यांच्यात वडिलोपार्जित जागेच्या हक्कावरून काही दिवसांपासून वाद सुरू होता. हा वाद वाढत गेल्यानंतर गावातील तंटामुक्ती समितीच्या माध्यमातून तो सामोपचाराने मिटविण्याचे प्रयत्नही करण्यात आले होते. मात्र, प्रयत्नांनंतरही दोन्ही भावांमधील वाद पूर्णपणे मिटला नसल्याचे समोर आले आहे.

सोमवारी रात्री पुन्हा याच कारणावरून दोघांमध्ये वाद झाला. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले. यावेळी रविंद्र बुरडकर याने संतोष यांच्यावर चाकूने हल्ला केल्याची प्राथमिक माहिती आहे. चाकूचा वार मांडीवर झाल्याने संतोष गंभीर जखमी झाले. मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाल्याने त्यांची प्रकृती चिंताजनक बनली.

घटनेनंतर संतोष यांना तातडीने वणी ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. प्राथमिक उपचारानंतर प्रकृती गंभीर असल्याने त्यांना पुढील उपचारासाठी चंद्रपूर येथे हलविण्यात आले. मात्र, उपचार सुरू असतानाच मध्यरात्री (पान २ वर)

# जिल्हाधिकारी कार्यालयासमोर युवक काँग्रेसने जाळला पालकमंत्री बावनकुळेंचा पुतळा!

## विरोधी पक्षनेते राहुल गांधींवर बेताल वक्तव्य केल्याचा आरोप



**अमरावती/प्रतिनिधीः-** लोकसभेतील विरोधी पक्षनेते खासदार राहुल गांधी यांच्यावर अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन बेताल व प्रक्षोभक विधान केल्याचा आरोप करत अमरावती जिल्हा युवक काँग्रेसच्या वतीने तीव्र शब्दांत धिक्कार करण्यात आला. आज संतप्त युवक काँग्रेस कार्यकर्त्यांनी अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक देत चंद्रशेखर बावनकुळे यांच्या प्रतीकात्मक पुतळ्याचे दहन केले आणि जोरदार घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला. स्वतःच्या निष्क्रियतेवर पांघरूण घालण्यासाठी आणि वरिष्ठ नेत्यांची खुशामत करण्यासाठीच बावनकुळे (पान २ वर)

# भटवाडी परिसरातून २६ वर्षीय तडीपाराला अटक



**अमरावती/प्रतिनिधीः-**

अमरावती शहर व ग्रामीण परिसरातून दोन वर्षांसाठी तडीपार करण्यात आलेला इसम शहरात आढळून आल्याने राजापेठ पोलिसांनी त्याला ताब्यात घेत कारवाई केली. भाग्येश त्र्यंबक जाने (वय २६, रा. भटवाडी, हनुमान मंदिराजवळ, एमआयडीसी रोड, अमरावती) असे कारवाई करण्यात आलेल्या इसमाचे नाव आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, मंगळवारी (२२ सप्टेंबर) राजापेठ पोलीस ठाण्याचे डीबी पथक परिसरात गस्तीवर होते. सार्वजनिक उत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेवण्यासाठी पोलिसांकडून परिसरात पेट्रोलिंग सुरू असताना भाग्येश जाने हा पोलिसांच्या निदर्शनास आला. पोलिसांनी त्याच्याबाबत चौकशी केली असता तो अमरावती शहर तसेच ग्रामीण (पान २ वर)

# 'बोलायचे नाही' म्हणताच फोटो-व्हिडीओ व्हायरलची धमकी

### तरुणीच्या तक्रारीवरून युवकाविरुद्ध पोलिसांत गुन्हा दाखल



**अमरावती/प्रतिनिधीः-** मैत्री व प्रेमसंबंधानंतर बोलणे बंद केल्याच्या कारणावरून तरुणीला तिचे फोटो आणि व्हिडीओ सोशल मीडियावर प्रसारित करण्याची धमकी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी तरुणीने दिलेल्या तक्रारीवरून गाडगेनगर पोलिसांनी विवेक रंजित मंडपे (वय ३०, रा. बेलपुरा, राजापेठ, अमरावती) याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे. पोलिसांकडे दाखल तक्रारीनुसार, आरोपी डिसेंबर २०२५ मध्ये रंगकामासाठी फिर्यादीच्या घरी आला होता. त्यावेळी दोघांची ओळख झाली. पुढे त्यांच्यात जवळीक निर्माण झाल्याचे तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

दरम्यान, १८ सप्टेंबर रोजी रात्री ८.५४ वाजता तरुणीने आरोपीला फोन केला. यापुढे आपल्याला त्याच्याशी बोलायचे नसल्याचे (पान २ वर)

# फोन-पेच्या दोन व्यवहारांनी किराणा दुकानदाराच्या खात्यावर घाला

### परतवाड्यात १ लाख ८८ हजार परस्पर वळते



**अमरावती/प्रतिनिधीः-** मोबाईलवरील डिजिटल व्यवहाराच्या माध्यमातून किराणा दुकानदाराच्या बँक खात्यातून तब्बल १ लाख ८८ हजार ८८८ रुपये परस्पर वळते केल्याची घटना परतवाड्यात समोर आली आहे. विशेष म्हणजे, दोन दिवसांत दोन स्वतंत्र व्यवहार झाल्याने खातेदाराला फसवणुकीची कल्पना उशिराने आली. याप्रकरणी सैफुल्ला बिसमिल्ला शेख (वय ५२, रा. सहारा कॉलनी, मशीदजवळ, गुलजार कॉलनी, परतवाडा) यांच्या तक्रारीवरून अज्ञात व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शेख यांचे बँक ऑफ महाराष्ट्रच्या परतवाडा शाखेत खाते आहे. हे खाते त्यांच्या रेडमी-१३ मोबाईलमध्ये असलेल्या फोन-पे खात्याशी लिंक असल्याचे पोलिसांनी सांगितले. १९ ऑगस्ट रोजी (पान २ वर)

# तीन हजार मीटर केबल चोरीचा तपास उलगडला

### -सोलर प्लांटसह शेतातील चोरीचे चार गुन्हे उघड

**अमरावती/प्रतिनिधीः-**

सोलर प्लांट आणि शेत परिसरातील केबल चोरीच्या घटनांचा तपास करताना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने संशयित टोळीपर्यंत मजल मारली आहे. पोलिसांनी तीन संशयितांसह चोरीची तार खरेदी करणाऱ्या एका भंगार व्यावसायिकाला ताब्यात घेतले असून, चार चोरीचे गुन्हे उघड झाल्याचा दावा केला आहे. कारवाईत १ लाख ४७ हजार ५०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. कु-हा येथील सोलर प्लांटमधून १३ ते १६ सप्टेंबरदरम्यान सुमारे तीन हजार मीटर केबल चोरीला गेली होती. तिची किंमत सुमारे २ लाख ५५ हजार रुपये असल्याचे पोलिसांनी सांगितले. या प्रकरणी कु-हा पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर स्थानिक गुन्हे शाखेने स्वतंत्र तपास सुरू केला. गोपनीय माहितीच्या (पान २ वर)

# जुन्या वादात तरुणाच्या हत्येचा प्रयत्न करणारे चौघे गजाआड

### -गाडगेनगर पोलिसांची धडाकेबाज कारवाई



**अमरावती/प्रतिनिधीः-** गाडगेनगर पोलीस ठाणे हद्दीत जुन्या वादातून एका तरुणावर चाकूने जीवघेणा हल्ला केल्या प्रकरणी पोलिसांनी जलद कारवाई करत एका विधी संघर्षग्रस्त बालकासह चौघांना ताब्यात घेतले आहे. पोलिसांनी गुन्ह्यात वापरलेले हत्यारही आरोपी कडुन जप्त केले आहे.गजेंद्र सुधाकर पवार ( वय २०, लोहार लाईन, विलास नगर)अजय गजानन थोरात (वय २२, रमाबाई आंबेडकर नगर) व ऋतिक सुनील बागडे (वय २६, कपिल वस्तू नगर) अशी अटक आरोपींची नावे आहे. (पान २ वर)

# पांढरीजवळ कारची मोपेडला धडक; दोघांचा मृत्यू

### भातकुली मार्गावर अपघात



**अमरावती/प्रतिनिधीः-** भातकुली-पांढरी रायपूर मार्गावर कार आणि मोपेडची समोरासमोर धडक होऊन झालेल्या भीषण अपघातात दोघांचा मृत्यू झाला. मंगळवारी सायंकाळी सुमारे ५ वाजता पांढरी गावाजवळ हा अपघात घडला. अभिजीत अरुण पार्डीकर (वय ३५) आणि अशोक चंपतराव राऊत (वय ६०), दोघेही रा. आनंदनगर, खोलापुरी गेट, अमरावती, अशी मृतांची नावे आहेत. मिळालेल्या माहितीनुसार, अभिजीत पार्डीकर आणि अशोक राऊत हे मोपेडवरून अमरावतीच्या दिशेने भातकुलीकडे जात होते. पांढरी गावाजवळ समोरून येणाऱ्या कारशी त्यांच्या मोपेडची जोरदार धडक झाली. धडकेनंतर दोघेही रस्त्यावर गंभीर जखमी अवस्थेत (पान २ वर)